शनिवार । ६ फेब्रुवारी १९८२ । एक रुपया

माणूस

# पालापाचोळा मंत्री

'महाराष्ट्र टाइम्स'सारख्या प्रमुख वृत्तपत्राने श्री. बाबासाहेब भोसले यांच्या नवीन मंत्रिमंडळाचे 'पाचोळा' म्हणून 'स्वागत' करावे, याचा या मंत्रिमंडळातील वनमंत्री श्री. दि. दि. चव्हाण यांना विशेष राग आला असावा, हे स्वागत त्यांना फारच झोंबले असावे, असे त्यांनी वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतीवरून स्पष्ट जाणवते. या स्वागताला कृतीनेच उत्तर देण्याचा त्यांचा जणू उद्देश असावा. त्यांनी वनीकरणाचा एक धडक कार्यक्रम तडकाफडकी जाहीर केला व हा कार्यक्रम यशस्वी करून दाखवू शकलो नाही तर मंत्रिमंडळाचा आपण केवळ राजीनामा देऊ, एवढेच नाही तर 'दि. दि. चव्हाण हे नावही लावणार नाही, दि. दि. पालापाचोळा हे नाव लावीन!', असेही त्यांनी वार्ताहरांना सांगितले. (पहा—म. टाइम्स, दि. ३० जानेवारी) या धडक कार्यक्रमानुसार येत्या वर्षात वनखात्याचे उत्पन्न ५६ कोटींवरून १३१० कोटींवर नेण्याचा मंत्रीमहोदयांचा संकल्प आहे! हा संकल्प व त्यामागील प्रेरणा निश्चितच स्वागतार्ह आहे. वसंतराव नाइकांनी भारत—पाक युद्धाच्या वेळी अन्नधान्याच्या क्षेत्रात महाराष्ट्र एका वर्षात स्वयंपूर्ण करण्याची घोषणा केली होती. ती किती प्रमाणात यशस्वी झाली याबद्दल आकडेवारी काहीही असली तरी एक गोष्ट स्पष्ट आहे. नाइकांच्या राजवटीत शेतकऱ्यांना प्रोत्साहन लाभले व महाराष्ट्रात हरितक्रांतीचे पाऊल थोडे वेगानेच पुढे पडले. असे या दि. दि. चव्हाणकृत घोषणेचे झाले तरी यश कमी नाही; कारण ५६ कोटींवरून १३१० कोटींवर वनखात्याचे उत्पन्न एका वर्षात नेणे, हा संकल्प तसा मोठाच आहे. 'एरंडीच्या ३०० कोटी बिया गोळा करून वनखात्याच्या जमिनीत लावण्यात येतील. प्रत्येक झाडापासून वर्षाला ३ ते ४ किलो बिया मिळतील. २५० कोटी झाडांचे १५,०० कोटी रुपये उत्पन्न सहज मिळेल!' असा या संकल्पाचा तपशील मंत्र्यांनी वरील मुलाखतीत सांगितला आहे. तो किती व्यवहार्य—अव्यवहार्य यावर चर्चा व्हावी; पण वृत्तपत्रांतील टीकेला कृतीने चोख उत्तर देण्याची ही शासनाची प्रवृत्ती विधायक व अनुकरणीय म्हटली पाहिजे!

एक धोका मात्र सुरुवातीपासून ध्यानात घ्यायला हवा. राजस्थानात दोन वर्षांपूर्वी असाच वृक्षारोपणाचा एक धडक कार्यक्रम हाती घेतला गेला; पण सारी भिस्त केवळ सरकारी यंत्रणेवर ठेवल्यामुळे हा कार्यक्रम बराचसा कोसळला. सरकार फार तर प्रचार करू शकते, पैसा पुरवू शकते; पण लोकांचे सहकार्य, सहभाग सरकारला उभा करता येत नाही! असा कुठलाही कार्यक्रम राबवायचा तर अगोदर लोकशिक्षण हवे. स्थानिक गरजा आणि लोकमत याचा अगोदर नीट अभ्यास व्हायला हवा. कार्यक्रम चिकाटीने शेवटपर्यंत नेणारी कार्यकर्त्यांची मालिका हवी. अशी कोणतीही पूर्वतयारी, पूर्वनियोजन न करताच राजस्थानात कार्यक्रमाची धडकप्रुतीने सुरुवात झाली. वृत्तपत्रे, समाजसेवी संस्था, शाळा, कॉलेजे, धार्मिक केंद्रे, इतर राजकीय पक्ष या सर्वांचा अंतर्भाव करण्याचा विचारही झाला नाही. सगळीच घिसाडघाई! झाडे लावणे ही फार सोपी गोष्ट आहे. खरा प्रश्न पुढचाच असतो. लावलेली झाडे जगतील-वाढतील कशी हे पाहिले नाही तर सगळाच खटाटोप व्यर्थ ठरतो. ग्रामीण भागात जळणाची समस्या तीव्र आहे. झाड तोडून आणल्याशिवाय रोजचा स्वयंपाकच जर होऊ शकत नसेल तर वृक्षारोपणाची नुसती महती गाऊन उपयोग काय? पर्यायी इंधनाची सोय प्रथम केली पाहिजे. काही ठिकाणी जंगलाचे ठेकेदार आणि सरकारी अधिकारीच वृक्षसंहाराला जबाबदार असतात. अशा ठिकाणी प्रथम चिपको पद्धतीचे एखादे आंदोलन उभे करणेच आवश्यक ठरते. अशी ठिकठिकाणची परिस्थिती ध्यानात न घेता नुसतीच कार्यक्रमाची धडक मारली तर राजस्थानात

जो गेल्या वर्षी अनुभव आला तो महाराष्ट्रात पुढच्या वर्षी येईल. झाडे लावण्याबद्दल राजस्थान सरकारने शेतकऱ्यांना बक्षिसे ठेवली होती. ती बक्षिसे वाटली गेली. झाडांच्या संख्येप्रमाणे ठराविक रोख रक्कम झाडे लावणाऱ्यांना सरकारतर्फे देण्यात येणार होती. तीही देऊन झाली; पण झाडे आहेत कुठे ? ती फक्त कागदावर होती ! असे महाराष्ट्रात होऊ द्यायचे नसेल तर शासनाने वृत्तपत्रे, समाजसेवी संस्था, धार्मिक केंद्रे, राजकीय कार्यकर्ते, या सर्वांचे बळ या मोहिमेमागे उभे करायला हवे. केवळ सरकारी नोकरांवर हा कार्यक्रम सोपवून उपयोगी नाही. ४–६ महिन्यापूर्वी पुण्यात 'ग्रामायन' या समाजसेवी संस्थेतर्फे वनसंवर्धनावर दोन दिवसाचा मेळावा घेण्यात आला होता. अभ्यासक, कार्यकर्ते, सरकारी अधिकारी, मंत्री या सर्वांनाच या मेळाव्यासाठी बोलावण्यात आले होते. या मेळाव्यात भाषण करताना एका अभ्यासकाने असे सांगितले की, खूप ठिकाणी झाडे तोडली जात असली तरी 'देवराया' म्हणून जुन्या काळापासून चालत आलेल्या देवस्थानांच्या बागा मात्र बहुतेक ठिकाणी आजही शाबूत आहेत. म्हणजे धर्मस्थानाची, धार्मिक भावनांची मदत घेऊनही हा वृक्षसंवर्धनाचा कार्यक्रम राबवला जायला हवा. नगरच्या कॉलेजने पारनेर या गावात हा कार्यक्रम कसा यशस्वी केला याचा दूरदर्शनवृत्तांत नुकताच विजय परुळकर यांनी टी. व्ही. वर सादर केला. मंचर कॉलेजनेही माळरानावर, पाऊस पुरेसा नसतानाही खूप वृक्षवाढ करून दाखवली आहे. पुण्याजवळच हडपसरला डॉ' गुजर आहेत. नायगावचे विलासराव साळुंके व त्यांच्या पत्नी सौ. कल्पनाताई साळुंके यांचे कार्य सर्वश्रुतच आहे. अशी मंडळी खूप नसली तरी ठिकठिकाणी आहेत. आपापल्या भागातील लोकजीवनाचा, निसर्गाचा या मंडळीचा सूक्ष्म अभ्यास आहे. या मंडळीच्या शब्दावर लोकांचा विश्वासही आहे. नुकतेच 'वनस्थली' नामक एक ग्रामीण विकास केंद्र पुण्याजवळच्या शिरूर भागात सौ. निर्मला पुरदरे यांच्या प्रयत्नातून स्थापन झाले आहे. 'गाव तेथे बालवाडी' असा या केंद्राचा सध्याचा कार्यक्रम आहे. पन्नास-साठ बालवाड्या आजच सुरू झालेल्या आहेत. या बालवाड्या, त्या चालवणाऱ्या शिक्षिका यांच्यामार्फत वृक्षसंवर्धनाचे केवढे तरी कार्य करता येऊ शकेल ! डॉ. पटवर्धन यांचे आरोग्य दक्षता मंडळ आहे. ग्रामायन संस्थेमार्फतच या मंडळाने गेल्या वर्षी १–२ गावात सुबाभूळ लावण्याचा प्रयोग करून पाहिला. यश शंभर टक्के आहे. जेवढी झाडे लावली तेवढी जगली–जगवली असे संबंधित शेतकरी अभिमानाने सांगतात; पण यासाठी शेतकऱ्याशी अगदी वैयक्तिक पातळीवर संबंध जोडला जायला हवा असतो. त्यांच्या अडचणी-अपेक्षा ध्यानात घेऊन कार्यक्रम ठरवावा लागतो. ही कामे सरकार करू शकत नाही. मधला दुवा म्हणून समाजसेवी संस्था, धार्मिक केंद्रे, शिक्षणसंस्था ही जबाबदारी उत्तम तऱ्हेने पार पाडू शकतील. अशी नीट जुळणी झाली, वृत्तपत्रे व इतर प्रचारमाध्यमे यांचे सहकार्य लाभले तर विकासाचा कोणताच कार्यक्रम फसण्याचे खरे म्हणजे काही कारण नाही. गांधीजी महाराष्ट्राला कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हणत असत. हे मोहोळ अजून नष्ट झालेले नाही. आजही म्हैसाळच्या देवलासारखी, बाबा आमटयासारखी माणसे येथे मातीतून मोती निर्माण करीतच असतात ! अशा सर्वांना एकत्र आणून, त्यांची मदत घेऊन जर वनमंत्र्यांनी आपला कार्यक्रम राबवायचे ठरवले तर त्यांना नाव बदलण्याची वेळच येणार नाही ! उलट दि. दि. चव्हाण या नावापुढे 'पालापाचोळा' ही पदवी म्हणून ते लावू शकतील ! परदेशी मदत घेऊन खतकारखाने वाढवू म्हणणाऱ्या पदवीधरापेक्षा देशातला पालापाचोळा गोळा करू पाहणाऱ्यांना, त्यात वाढ करणाऱ्यानाच खरे पदवीधर म्हणून जेव्हा आपण ओळखू लागू, तेव्हाच हा देश खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वावलंबी व स्वयंपूर्ण होईल !

— श्री. ग. मा.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : छत्तिसावा

६ फेब्रुवारी १९८२

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

मुंबई वार्ता

# ग्रंथाली कार्यक्रम : बाइंडरचे दिवस

गेल्या २६ जानेवारीला 'ग्रंथाली'च्या वाचक-दिनाचा भरगच्च कार्यक्रम साजरा झाला. कार्यक्रमाच्या चहा-पाणी आणि 'झुणका-भाकरी' सकट सगळ्याची जबाबदारी संयोजकांनी उचलल्यामुळे कार्यक्रमाला खऱ्या अर्थानं भरगच्चपणा आला होता. सहा-सात वर्षांपूर्वी काही मोजक्या उत्साही साहित्यप्रेमींनी सुरू केलेली ही वाचक-चळवळ थोडक्या काळात जवळजवळ चार हजार वाचकांपर्यंत जाऊन पोचली आहे! वाचक-दिनाचा हा आताचा कार्यक्रम ग्रंथालीच्या डोंबिवली शाखेनं आयोजित केला होता आणि भरघोस उपस्थितीनं डोंबिवलीकरांनी तो खरोखरच 'संपन्न' केला!

या कार्यक्रमाच्या निमित्तानं झालेल्या दोन महत्त्वाच्या परिसंवादांबद्दल लिहिणं अगत्याचं आहे. यापैकी पहिला कार्यक्रम होता 'बाइंडरचे दिवस' या विषयावर मुलाखतवजा चर्चेचा. कार्यक्रमामध्ये पुष्पा भावे आणि श्रीकांत लागूंनी बाइंडरच्या दिवसांचा आढावा घेणाऱ्या गप्पा कमलाकर आणि लालन सारंग यांच्याशी मारल्या. 'सखाराम बाइंडर' येऊन गाजलं, त्याला आता दहा वर्षं झाली आणि ते आता 'स्मृतीची चाळता पाने' या सदरातही जमा झालं; पण त्या वेळेला या नाटकानं जी खळबळ माजवली होती, त्या संदर्भात दहा वर्षांच्या कालावधीनंतरही वळून पहायला लावील असं हे नाटक आहे. त्यामुळं त्यावर बोलताना इतिहासाच्या कडू आणि गोड आठवणींना उजाळा मिळत होता आणि श्रोत्यांनाही काही साहित्यिक सामान्य ज्ञान, काही गप्पा, 'लिटररी गॉसिप' ऐकायला मिळत होती.

'सखाराम बाइंडर' हे कमलाकर सारंगांनी दिग्दर्शित केलेलं पहिलं नाटक. विजय तेंडुलकरांनी ते खास त्यांच्यासाठी लिहिलं! डॉक्टर लागूंसकट बऱ्याच दिग्दर्शकांचा या नाटकावर डोळा होता; पण सारंगांनी ते कुणाच्या हाती लागू दिलं नाही. हे नाटक एवढी खळबळ माजवेल अशी त्यांना आधी मुळीच कल्पना नव्हती आणि जर असती तर एवढा मोठा आर्थिक धोका असणारा हा प्रकार त्यांनी हाती घेतलाच नसता!

नाटकवाल्यांच्या उलाढालीची, हिकमती हिशेबांची आणि पडद्यामागच्या राजकारणाची चमक सारंग-दांपत्याच्या बोलण्यातून अनुभवाला आली आणि लोकांना ती चांगलीच इंटरेस्टिंग वाटली. तशात शहाण्यानं चढू नये ती कोर्टाची पायरीही त्यांनी या नाटकासाठी चढून पाहिली. कोर्टाच्या व्यापात नोकरीचा क्रमशः बट्ट्याबोळ होत होत एक दिवस ती चक्क सुटली! तसा आर्थिक आणि नैतिक पाठिंबा पुष्कळांचा असला, तरी प्रत्यक्ष लढत एकांड्या शिलेदारासारखी दिली ती सारंगांनीच; पण जमेच्या बाजूही पुष्कळच होत्या. केसचा तपशील ऐकल्यावर वकिलांनी-अशोक देसाईंनी (अंतुल्यांविरुद्धची केस लढणारे) पैसे घेतले नाहीत! खटल्याचं कामकाज बघणाऱ्या गुजराती भाषी न्यायमूर्तींसाठी नाटकाचा खास प्रयोग केला गेला आणि त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी तो रंगून बघितलाही. नाटकाला पाठिंबा देण्यासाठी काही प्रस्थापित लेखक-समीक्षकांनी एक पत्रक काढलं. त्यात हे 'थोर' नाटक आहे, असं म्हटलं होतं. तेव्हा नाटक राहिलं बाजूलाच आणि 'थोर' शब्दाच्या अर्थावरच खडाजंगी वाद सुरू झाले! अखेर केस संपून सारंगांच्या बाजूनं निकाल लागला तेव्हा वर्तमानपत्रांनी मथळे दिले, 'ऑथर विन्स द केस!' 'टाइम्स ऑफ इंडिया'नं पहिल्याच पानावर दिलेल्या या ठळक बातमीत दिग्दर्शक किंवा सारंग यांचा कुठे उल्लेखही नव्हता!

कायद्यानं बंद न पडलेल्या या नाटकावर नंतर गंडांतर आलं ते शिवसेनेच्या मनगटशाहीचं आणि समव्यावसायिकांच्या अवहेलनेचं! सारंग सांगतात, शिवसैनिकांनी पुण्यात, मुंबईत नाटकाचं नुकसान केलं. सेटची नासधूस केली. पुण्यात 'बालगंधर्व'चे दरवाजे नाटकाला बंद झाले! 'रवीन्द्र'मध्ये तर नाटक बघायला आलेल्या एका गुजराती जोडप्याची प्रभादेवीपर्यंत धिंड काढण्यात आली. त्यामुळं अखेर सारंगांनी शिवसेनापतीची व्यक्तिगत गाठ घेतली. त्यांच्यातल्या कलाकाराला आवाहन केलं. त्यांना नाटकाचा प्रयोग दाखवला आणि यात आक्षेपार्ह काही नाही, असं त्यांचं निवेदन वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करवलं, तेव्हा हा हैदोस थांबला!

'सौंदर्याचा ॲटमबॉम्ब' इत्यादी असलेल्या पद्मा चव्हाण एकदा 'बाइंडर' बघायला आल्या होत्या, तेव्हा प्रयोगानंतर लालन सारंगसारख्या 'असल्या बाईला' आपल्या गाडीतून नेण्याचं तिने साफ नाकारलं! लालन सारंग चंपाची भूमिका करतात, ते 'कुंकवाची लाज' राखण्यासाठी-असा एक प्रेमळ आणि कन्सेशनदार गैरसमजही पसरला होता!

दहा वर्षांच्या कालावधीनंतर या सगळ्याच गोष्टींची तीव्रता आणि कडवटपणा आज कमी झाला आहे; पण कलाकारानं कलेच्या स्वातंत्र्यासाठी दिलेला लढा या प्रातिनिधिक महत्त्वासाठी मात्र आजही तेवढाच ताजा आहे! या लढ्यात कलाकार कमी कुठे पडतात? सारंगांच्या एकूण विवेचनावरून लक्षात आलं की, कलाकार असंघटित असतात, असे लढे लढण्याची त्यांची इच्छा, उत्साह आणि तयारी नसते, त्यांच्यामागं संघटनेचं बळ नसतं आणि कलाकाराला खंबीरपणे उभं रहाता यावं, यासाठी अशाच संघटनेची नितांत आवश्यकता आहे!

कार्यक्रमातल्या दुसऱ्या परिसंवादाचा विषय हा तसा आता बहुचर्चित झाला आहे. 'दूरदर्शनचे आक्रमण' हा तो विषय. तरीही हा परिसंवाद श्रवणीय झाला आणि त्यातून एखादा एकमुखी निष्कर्ष निघाला नाही, तरीही मननीयसुद्धा झाला! फारच कमी परिसंवादांबद्दल असं म्हणता येतं; पण या परिसंवादाला ते श्रेय जातं, याची बरीच कारणं आहेत. एक तर परिसंवादात या विषयाचे निराळे आणि अधिक सूक्ष्म पैलू हाताळले गेले. दुसरं म्हणजे, अनुषंगिक

विनोद सोडले, तर संपूर्ण परिसंवाद संचालक डॉ. अशोक रानडयानी म्हटल्याप्रमाणे गंभीर आणि वैचारिक पातळीवरचा झाला आणि त्याची वैचारिक शिस्त वक्त्यानी बऱ्यापैकी पाळली.

प्रास्ताविक बोलताना विजय तेंडुलकरांनी दूरदर्शननं आक्रमण केलेलं नसून 'अतिक्रमण' केलेलं आहे, अशी एक दुरुस्ती सुचविली! 'खरं म्हणजे जातिवाचक शब्द वापरू नयेत आणि त्यातल्या त्यात मी तर नाहीच नाही; पण उपमाच द्यायची झाली, तर 'भटाला दिली ओसरी आणि भट हात-पाय पसरी' असा दूरदर्शनचा प्रकार आहे', इत्यादी म्हटले तर शालजोडीतले आणि म्हटले तर जोडेही त्यांनी हाणले! दादरच्या फेरीवाल्यासारखं टीव्हीचं सतत अतिक्रमण चालू आहे आणि कुटुंबव्यवस्था गिळंकृत करण्याचा सपाटा चालवला आहे इत्यादी सामान्य निरीक्षणं त्यांनी नमूद केली.

अशोक रानडे नेमके आणि अर्थपूर्ण विचार मांडू शकतात; पण ठणठणपाळी शैलीचा विनोदही त्यांना बऱ्यापैकी जमत असल्यामुळे बहुतेक वेळा असल्या हसवाहसवीतच ते फार वेळ घालवतात, असा (आपला माझा माझ्यापुरता) अनुभव आहे; पण या भाषणात विचार-विकासाची शक्यता असणारे अक्षरशः असंख्य ओरिजिनल आणि नवे असे भरघोस मुद्दे त्यांनी मांडले. 'दूरदर्शन आणि श्राव्यकला' अशा निरागस वाटणाऱ्या विषयातून त्यांनी दूरदर्शनवर अगदी सूक्ष्म आणि तडाखेबंद हल्ले चढवले. आपल्याकडे जे ज्ञान येतं, ते पंचसंवेदनांच्या सहाय्यानं येतं आणि या प्रत्येक प्रकारच्या सवेदनांची आपल्याला गरज आहे. डाटा—दृश्यमाध्यमातून येणारी माहिती किंवा डाटा हा मुळातच अन्य माध्यमातून येणाऱ्या डाटापेक्षा तीस प्रतिशत अधिक असतो. दूरदर्शनसारखी माध्यमं अन्य माध्यमांवर अतिक्रमण करतात, त्यातून आपल्या ज्ञानात एक रोगट असमतोल निर्माण होतो. दूरदर्शनवरून होणाऱ्या प्रसारणांना दर्शनाच्या एवढ्या दणकट कुबड्या असतात की, भाषेला काही कामच उरत नाही. संगीताच्या शक्तीची गरज भासत नाही. साधं भावगीतसुद्धा दूरदर्शनवर 'ऐकवलं' किंवा 'गायलं' जात नाही. ते ग्राफिक्सच्या सहाय्यानं 'दाखवलं' जातं. परिणामी आमच्या लिखित आणि मौखिक परंपरा खच्ची होत आहेत. आमची भाषा म्हणजे 'छान', 'नाइस' यासारख्या गोळाबेरीज आणि नेमकेपणा नसणाऱ्या शब्दांची गोळाबेरीज होत चालली आहे. ती साचेबंद आणि कंटाळवाणी होत आहे. आमची स्वतंत्र व्यक्तिमत्त्वं यातून हिरावून घेतली जात आहेत!

## छुपं आणि मुकं आक्रमण

नंतर बोलले र. कृ. जोशी (खरं म्हणजे रकरु जोशी) दूरदर्शन आणि दृश्यकला या विषयावरचं त्याचं भाषण हे खास 'सत्यकथी'य कवितेसारखं किंवा त्याच्या चित्रासारखं दुर्बोध होतं! अक्षराच्या छापील प्रतिमांच्या प्रभावाचं वर्णन करणारी त्याची कविता मात्र अर्थवाही होती. दृश्य आणि श्राव्य किंवा चित्र आणि भाषा अशा दोहोंचाही एकजिनसी मिलाफ प्रत्ययकारी ठरेल, असा त्यांच्या विवेचनाचा रोख होता, तर खाल्ल्या मिठाला आणि टीव्हीवर केल्या कार्यक्रमाला जागून पद्मजा फाटकानी टीव्हीची बाजू बरीच सावरली. दूरदर्शनचं माध्यम आपल्याला अजूनही तसं नवखंच आहे, त्याच्या परिणामकारकतेबद्दल मात्र शंकाच नाही. या परिणामांच्या बरे-वाईटपणाविषयी म्हणायचं झालं तर आपण करतो ते संस्कार, टीव्हीवरून झालं तर ते ब्रेनवॉशिंग, हा चक्क चोरपणा झाला. टीव्हीनं वृद्धांना करमणूक दिली मुलांच्या सामान्यज्ञानात भर टाकली, उत्सुकता, जिज्ञासा शमवली. वर्तमानपत्रातल्या नावाना त्यानं चेहरे दिले. कलाकाराना उत्तेजन दिलं. भाषा जवळ आल्या. शहरी ग्रामीण भेद कमी झाले. सौदर्यशास्त्रीय जाण वाढली. आवडीचा चौफेरपणा आला. पण तरीही हे छुपं आणि मुकं आक्रमणच आहे. कारण या माध्यमावर आपण नको तितकाच विश्वास टाकतो. ही वैचारिक गुलामी असते, आणि 'दर्शक' ती खुषीनं लादून घेतात!

तेव्हा या परिस्थितीचा तुम्हीच काय तो विचार करा, अशा निष्कर्षावर त्यांनी भाषण संपवलं.

समाजकारण, राजकारण, व्यक्ती आणि दूरदर्शन अशा संदर्भात बोलताना गो. पु. देशपांडे यांनी खास मार्क्सवादी दृष्टिकोनातून परिस्थितीचं विश्लेषण केलं. ते म्हणाले, दूरदर्शन म्हणजे अखेरीस काय, तर एक यांत्रिक खेळणं, हे खेळणं कुणाच्या हातात आहे, ते या संदर्भात महत्त्वाचं. दुसऱ्या महायुद्धानंतर त्याचा अधिक प्रसार झाला. भांडवलदरांच्या, शासनाच्या हातातलं टीव्ही हे साधन आहे, आणि ते जनतेवर लादलं जातं. समुदायांची संस्कृती, चेहरामोहरा बदलणं, आपले विचार किंवा आपल्याला अनुकूल विचार लादून लोकांचा बुद्धीभेद करणं हे शासन टीव्हीद्वारा साधत असतं. प्रचलित भाडवलदारी अर्थ आणि राज्यव्यवस्था व्यापारी पद्धतीनं माथी मारली जाते. लोकांना मेंढरांप्रमाणे निर्बुद्ध, गतानुगतिक बनवायचं, तसंच त्यांना समजायचं असा हा एक घातुक आणि ब्रेनवॉशिंग करणारा खेळ आहे, इत्यादी धडाकेबंद आरोप देशपांडयांनी केले. टीव्हीनं वेळ भरून काढावा, मनाला, बुद्धीला मोकळीक मिळू नये, समर्थांनी ज्याला महत्त्व दिलं असा एकान्त मिळू नये अशी रोगट प्रवृत्ती निर्माण केली. लोकांना 'इंडलजन्स ऑफ स्लॉथ ॲंड हेट्रेड ऑफ व्हेकन्सी' वाटणं भाग पाडलं आणि वैचारिक जीवन नष्ट केलं.

आकाशानंदानी मात्र या साऱ्या आरोपांची जी वाट लावली, ती थोरच होती. त्यांचं म्हणणं असं की, फारच बुवा तुमचे आरोप पुचाट. मी केलेल्या तयारीच्या तर ते पासंगालाही पुरत नाहीत दूरदर्शनमध्ये 'दर्शनाला' महत्त्व असतं, कारण ते 'दूरदर्शनच' आहे. लोक बघे झाले, गप्प बसले, आपसात बोलले नाहीत, तर काय झालं? मौनाचं महत्त्व काय कमी असतं? आणि बोलूनचालून 'इडियट बॉक्स' असलेला टीव्ही तुम्ही एवढ्या गांभीर्यानं का घेता? चार्ली चॅप्लिनचा करता का गांभीर्यानं विचार? तसाच टीव्ही पण आहे. शिवाय आपापसात निरर्थक गप्पा आणि कुचाळक्या करण्यापेक्षा टीव्ही पाहिलेलाच बरा आणि आम्ही कसले तुमच्यावर आक्रमण करणार? तुम्हीच तुमचे कस-कसले रटाळसुद्धा कार्यक्रम घेऊन आमच्यावर आक्रमण करता, गरीब बिचारे आम्ही!

काही ठाम निष्कर्ष न काढताच परिसंवाद संपला, कारण समारोप करणाऱ्या तेंडुलकरांनी चक्क मध्येच गुगारा दिला. अर्थात हा विषयही निष्कर्ष काढण्याजोगा नीटनेटका आणि बांधेसूद नव्हेच. सावधानीचा आणि सतर्कतेचा एक सामान्य इशारा देणं एवढंच

या बाबतीत करण्यासारखं आहे. टीव्ही प्रभावी माध्यम आहे, धारदार आणि दुधारी शस्त्र आहे. सारासार विवेक–विचारांच्या जाणीवा बोथट करून त्यांना ते भूल पाडू शकतं, आणि नेमका हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. संस्कार काय किंवा ब्रेनवॉशिंग काय, दोन्हीही खोल रुजावे लागतात, आणि टीव्ही ते रुजवूही शकतो. पण अशा रितीनं टीव्हीच्या ताब्यात स्वतःला देण्यापूर्वी आपल्याला काय संस्कार करून घ्यायचे आहेत ते आपल्याच सारासार बुद्धीनं ठरवायला हवं. आपल्या विचारांना आणि आपल्या बुद्धीला दुसरा पर्याय आपल्यापुरता तरी नाही, आणि नसावाच. तेव्हा ही आपली परिपक्वता आपण वाढवणं आणि आक्रमणातूनही स्वत:ला समृद्ध करणं हे कसं काय जमतंय, ते आपणच पहायला हवं !

—ललिता बर्वे

## गिरणी–कामगारांचा लढा

मुंबईतील सुमारे अडीच लाख सुती कापड गिरणी–कामगाराचा बेमुदत संप १८ जानेवारीपासून सुरू झाला आहे. या संपाचं नेतृत्व डॉ. दत्ता सामंत करत आहेत.

गेली कित्येक वर्षे इंटकप्रणीत राष्ट्रीय मिल मजदूर संघ ही कामगार संघटना गिरणी–कामगारात नेतृत्व करीत आली आहे; पण अलीकडच्या काळात ही संघटना कामगाराचं नेतृत्व करावयाचं सोडून मालकांचं आणि सरकारचंच प्रतिनिधित्व करू लागल्याने कामगाराचा या संघटनेवरील विश्वास उडत चालला होता. बऱ्याच ठिकाणी कामगारांवर वाजवी अन्याय होत होते. मिल मजदूर संघ नेईल त्या ठिकाणी कामगार ओढले जात होते.

एकंदरीत गिरणी–कामगारांना मिल मजदूर संघाचं नेतृत्व झटकून टाकावयाचं होतं; पण मिल मजदूर संघाच्या तोडीची दुसरी कोणतीच संघटना येथे नसल्याने कामगार काहीच करू शकत नव्हते.

आतापर्यंतचा इतिहास हा या प्रकारचा होता; पण सुमारे दीड वर्षापूर्वी शिवसेनाप्रणीत गिरणी–कामगार सेना या क्षेत्रात उतरली. एके काळी मुंबईचा गिरणी–कामगार हा जास्त पगार घेणारा म्हणून ओळखला जात होता. राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या निष्क्रियतेने हा कामगार येथेच राहिला, पण इतर सर्व कामगारांचं राहणीमान जीवनमान सुधारलं, म्हणून गिरणी–कामगार सेनेने याविरुद्ध जोरदार उठाव करण्याचं ठरवलं !

गेल्या दीड वर्षात या सेनेने छोटी-मोठी कामे केली. गिरणी–कामगाराचं जीवनमान सुधारावयाचे असेल तर त्यांच्या पगारवाढीचा विचार करावाच लागेल, ही मागणी सेनेने पुढे रेटली आणि याच्याच पाठपुराव्यासाठी सेनेने १ नोव्हेंबर रोजी 'गिरणीबंद' आंदोलन अभूतपूर्वरित्या यशस्वी करून दाखवले.

पण याच दरम्यान आणखी एक घटना घडली. गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी बोनस कमी दिला, बोनसची बोलणी करताना कामगारांना अंधारात ठेवले, काही कारणावरून काही गिरण्यांत कामगारांनी स्वतः होऊनच काम बंद पाडले. बोनसचा प्रश्न पेटला. आता कामगारांना या कामी साथ देणारा नेता हवा होता. डॉ. दत्ता सामंताचे गिरणी-व्यवसायात इथेच आगमन झाले.

मग डॉ. दत्ता सामंतांच्या नेतृत्वाखाली सात कापड गिरण्यांमध्ये बोनस जाहीर झालेल्या तारखेपासून जो संप सुरू झाला तो अद्यापपर्यंत तसाच आहे ! बोनस वाढवून मिळावा, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. बोनसप्रश्नावरून बंद असलेल्या या सात गिरण्यांत नंतर 'मधुसूदन' ही आणखी एक गिरणी मिळाली.

या आठ गिरण्यांमधील असंतोषाचा स्फोट मग हळूहळू इतर गिरण्यांमध्येही होऊ लागला. सेनेचे १ नोव्हेंबरला जे आंदोलन झाले ते याचमुळे गिरणगावातील वातावरण मग तापू लागलं. लहान-मोठ्या सभा रोज होऊ लागल्या.

याद्वारे गिरणीतील कामगार जागा होतो आहे, हे लक्षात येताच त्या वेळचे मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांनी गिरणी–कामगाराच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी स्वत:च्याच अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नेमली. या समितीद्वारे काही तरी चागले निष्पन्न होईल म्हणून सर्वांनीच मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेचं स्वागत केलं.

कापडगिरणी–कामगारातील असंतोष अत्यंत धगधगत असताना राज्य सरकारने अशी उच्चाधिकार समिती स्थापन केल्याने बेमुदत संपाची हाक देणाऱ्या शिवसेनेने आणि डॉ. सामंतानी संपाच्या आपल्या तारखा पुढे ढकलल्या !

समिती आपला निर्णय आठ आठवड्यांत देईल, असे अंतुलेनी जाहीर केलेले असल्याने सर्वजण त्या मुदतीची वाट पहात होते; पण समितीचे एकूण कामकाज पाहताच व धोरण लक्षात येताच गिरणी मालक संघाने समितीचा कोणताही निर्णय आपणावर बंधनकारक राहणार नाही, असे अध्यक्षाना पत्राद्वारे कळवले. मालक वर्गाप्रमाणेच राष्ट्रीय मिल मजदूर संघानेही समितीबाबत नाराजी व्यक्त केली.

समिताचा अशा प्रकारे बोजवारा उडाल्यानंतर बेमुदत संपाशिवाय डॉ. सामंतांजवळ अन्य पर्याय नव्हता. राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या नेतृत्वाला कंटाळलेल्या कामगारानी आपण होऊनच डॉ. सामंतांपाशी बेमुदत संपावर जाण्याची तयारी दर्शवली होती.

गिरणी–कामगाराचा हा प्रश्न संपाशिवाय सुटावा म्हणून डॉ. सामंतांनी व्यक्तिशः प्रयत्न केले. पण त्यात अपयश आल्यानंतरच त्यानी १८ जानेवारीपासून बेमुदत संपाची घोषणा केली.

डॉ. सामंताच्या घोषणेला कामगारांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. मुंबईतील ६४ गिरण्या आज बंद आहेत. अडीच लाख कामगार आज बाहेर आहेत. यापूर्वी जे संप झाले त्या वेळी ऑफिसमधील स्टाफ संपाच्या वेळीदेखील कामाला येत होता. पण संप जिद्दीने चालावा म्हणून सामंतांनी आज त्यानाही बाहेर बसवले आहे.

गिरणी कामगाराला किमान २५० ते ४०० रुपये वाढ मिळावी, बदली कामगारांना कायम करावे, नविन मशीनरी आणण्यापूर्वी कामगारांना त्यांच्या हक्काचे सर्व देणे द्यावे, कामगाराच्या वेतनश्रेणी निश्चित करुन वार्षिक वाढी, महागाईभत्ता, रजेच्या काळातील प्रवासभत्ता, शिक्षणभत्ता द्यावा अशाही मागण्या डॉ. सामंतांनी केल्या आहेत.

शिवसेनाप्रणित कामगारसेनेने केलेल्या मागण्यांमध्ये २०० रुपये पगारवाढ, १० टक्के घरभाडेभत्ता, ६० रुपये प्रदूषणभत्ता वर्षाला ३०० रुपये रजेतील प्रवासभत्ता, जादा दहा दिवस हक्काची रजा आणि १० दिवस आजारीपणाची रजा वगैरेचा समावेश आहे.

गिरणी मालक संघाच्या हिशेबानुसार सेनेच्या मागण्यांचा वार्षिक खर्च १५० कोटी रुपये आहे, तर सामंत युनियनच्या मागण्या ११५ कोटी रुपये खर्चाच्या आहेत. या मागण्या जर मान्य करावयाच्या झाल्या तर उद्योगाला पगारावर जादा ६६ आणि ५१ टक्के खर्च येईल, असे मालकसंघाचे म्हणणे आहे. इतका जादा खर्च उद्योगाला न पेलणारा आहे. असेही त्यांचे म्हणणे आहे.

मालकवर्ग असे जरी म्हणत असला तरी गिरणी-कामगारांना पगारवाढ मिळायला हवी, याबद्दल दुमत नाही. मालकवर्ग कितीही आटापिटा करत असला तरी त्यांना ही पगारवाढ द्यावीच लागणार.

२॥ लाख कामगार १८ तारखेपासून घरी बसून आहेत. मागण्या पदरात पाडून घेतल्याशिवाय गिरणीमध्ये प्रवेशच करावयाचा नाही, असे डॉ. सामंतांनी सांगितल्यामुळे काही कामगारांनी आपल्या बायका–मुलांना गावाकडे पाठवले आहे. या सर्वांमुळेच मिल मजदूर संघाची व मालकांचीही झोप उडाली आहे. डॉ. सामंतांचं गिरणीक्षेत्रातील आगमन मिल मजदूर संघाला एक आव्हान आहे, तर गिरणी-कामगारांच्या प्रश्नी डॉ. सामंत कितपत यशस्वी ठरतात त्यावर त्यांचं भवितव्य अवलंबून आहे. सर्वांचं लक्ष याकडे आहे. पाहू या काय होते ते !

—मोहन शां. कुलकर्णी

वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# मार्क्सवादी पक्ष

## विजयवाड्याची दिशा

वा. दा. रानडे

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची अकरावी काँग्रेस विजयवाडा येथे नुकतीच झाली, भारतात डाव्या पक्षांमध्ये सर्वांत अधिक पाठिंबा या पक्षाला आहे. दोन राज्यांत त्याच्या हाती सत्ता आहे. केरळमध्येही त्याच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीचे सरकार होते पण काँग्रेस (एस) पक्ष त्यातून बाहेर पडल्याने ते गडगडले. याच वर्षी पश्चिम बंगाल व त्रिपुरामध्ये निवडणुका व्हावयाच्या असल्याने या पक्षाच्या काँग्रेसला विशेष महत्त्व होते.

जगातील व भारतातील कम्युनिस्ट चळवळीपुढील समस्यांचा काही मूलगामी विचार विजयवाड्यास झाला का, या दृष्टीने पाहता या काँग्रेसने निराशाच केली असे म्हणावे लागेल. जगातील कम्युनिस्ट चळवळीपुढील समस्या हा या काँग्रेसपुढे विषयच नव्हता, असे पक्षाचे सरचिटणीस नंबुद्रीपाद यांनी सांगितले. या समस्यांबाबत निश्चित कोणती भूमिका घ्यावयाची याबद्दल पक्षाच्या नेत्यांमध्येच गोंधळ आहे, म्हणून त्याचा विचार टाळण्यात आला असेल तर ते योग्य नाही, विचार टाळल्याने प्रश्न संपत नाहीत, त्यांना सामोरे जाऊनच उत्तरे शोधायला हवीत.

माझ्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा प्रश्न मार्क्सवाद आणि लोकशाही कार्यपद्धती याची सांगड घालण्याचा आहे. भांडवलदारी लोकशाही हे भांडवलदार वर्गाने आपली सत्ता व हितसंबंध टिकविण्यासाठी निर्माण केलेले हत्यार आहे, समाजवादाच्या प्रस्थापनेस ते उपयोगी नाही; त्यासाठी समाजवादी लोकशाहीच आणायला हवी, असे कम्युनिस्ट प्रतिपादत असतात. या बाबतीत मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि कम्युनिस्ट याच्यात फरक नाही. पण या ठोकळेबाज परिभाषेपलीकडे जाऊन या प्रश्नाचा विचार करायला हवा. पोलंडमधील घटनांनी या समस्या जगातील कम्युनिस्ट चळवळी पुढे उभ्या केल्या आहेत. भांडवलदारी लोकशाहीत अनेक पक्षांना निवडणुका लढविण्याची मोकळीक असली तरी आर्थिक विषमता असल्याने खऱ्या अर्थाने खुल्या निवडणुका होत नाहीत. समाजवादी समाजपद्धतीत ही विषमता नसली तरी कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर पक्षांना निवडणुकीस उभे राहता येत नाही. सरकारच्या व कम्युनिस्ट पक्षाच्या धोरणांविरुद्ध मत-प्रदर्शन करता येत नाही. भांडवलदारांच्या प्रतिक्रांतीचा धोका टाळण्यासाठी सुरुवातीच्या काळात कम्युनिस्ट पक्षाची सर्वाधिकारशाही आवश्यक असेल, पण आता त्याची आवश्यकता नाही. तेव्हा नुसती आर्थिक विषमता नष्ट होणे पुरेसे नाही. कम्युनिस्ट देशातही अनेक पक्षपद्धती आली पाहिजे. पोलंडमध्ये सॉलिडॅरिटीच्या रूपाने सुरू झालेला लढा लोकशाहीसाठी आहे पण मार्क्सवाद्यांनी पोलंडबाबत रशियाच्या भूमिकेलाच पाठिंबा दिला आहे.

मार्क्सवादी पक्ष आता रशियाकडे झुकला असल्याचे काँग्रेसमध्ये पास झालेल्या राजकीय ठरावावरून दिसते. कम्युनिस्ट पक्षात फूट पडून १९६४ साली मार्क्सवादी पक्ष स्थापन झाला तेव्हा सुरुवातीला त्याचे धोरण चीनकडे झुकलेले होते. माओच्या धोरणाला त्याने पाठिंबा दिला होता आणि रशियाचे धोरण सुधारणावादी, दुरुस्तीवादी असल्याची टीका केली होती; पण पुढे काही वर्षांनी रशिया व चीन यांपैकी कोणाच्याच भूमिकेस पूर्ण पाठिंबा न देता दोघांपासून सारख्या अंतरावर राहण्याची आणि स्वतंत्रपणे आपले धोरण ठरविण्याची भूमिका मार्क्सवाद्यांनी घेतली आणि आता ती सोडून या पक्षाने रशियाच्या धोरणांना पाठिंबा देण्याचे ठरविले आहे. राजकीय ठरावामध्ये चीनच्या धोरणांवर टीका आहे. अमेरिकेबरोबर युती करून आणि रशियाला विरोध करून चीन साम्राज्यवाद्यांनाच मदत करीत आहे, असे ठरावात म्हटले आहे; पण त्याचबरोबर चिनी नेते आपल्या चुका सुधारतील, अशी आशाही व्यक्त केली आहे.

मार्क्सवाद्यांनी रशियाबाबतच्या आपल्या धोरणात बदल का केला? आतापर्यंतचे आपले धोरण चुकल्याची ती अप्रत्यक्ष कबुली आहे का? रशियन नेतृत्व सुधारणावादी मार्ग अवलंबीत असल्याची टीका मार्क्सवादी आतापर्यंत करीत होते, त्याचे काय झाले? रशियाने तर आपल्या धोरणात बदल केलेला नाही. बदलले आहेत ते मार्क्सवादी; पण आपले आतापर्यंतचे धोरण चुकले, अशी स्पष्ट कबुली त्यांनी दिलेली नाही. तसेच रशिया व चीनपासून सारख्या अंतरावर राहण्याचे धोरण चुकीचे होते का? ते का सोडले याचा उलगडाही केलेला नाही. वास्तविक ते धोरण बदलण्याची काही आवश्यकता नव्हती. रशियाच्या आपणास योग्य वाटतील त्या धोरणांना पाठिंबा आणि अयोग्य धोरणावर टीका, हीच भूमिका पुढे चालू ठेवायला काय हरकत होती? चीनबाबतही अशीच भूमिका

पृष्ठ १७ वर

# बेफिकीर शासन, उदासीन पालक नि नाडलेले प्राध्यापक

अखेरशेवटी प्राध्यापकानी परीक्षांवर बहिष्कार टाकायचे ठरविले आहे. महाराष्ट्रातील सहा विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या संघटनांनी बहुमताने बहिष्काराचे निर्णय घेतले आहेत.

स्वाभाविकपणे या निर्णयावर उलट–सुलट प्रतिक्रिया सुरू झाल्या आहेत. पालक आणि विद्यार्थी रुसले आहेत, रागावले आहेत, काही प्राध्यापकानाही हा निर्णय मनापासून मान्य नाही. बहुसंख्य प्राध्यापकांनाही हा निर्णय मनोमन मान्य नसणार. कारण तेही पालक आहेत.

पण प्राध्यापकांचा नाइलाज झाला आहे. तो समजून घ्यायला हवा. त्यांच्या गेल्या दहा वर्षातल्या मागण्या एक तर रेंगाळत पडल्या आहेत अथवा फार दिरंगाईनंतर अर्धवट पुऱ्या झाल्या आहेत. थोडा तपशील पाहू या.

(१) १–१–७३ पासून म्हणजे नऊ वर्षांपूर्वीपासून प्राध्यापकाना नवी वेतनश्रेणी मिळाली आहे. या वेतनश्रेणीचे पहिले परिपत्रक आले तेच मुळी ७४ च्या अखेरीस आले. त्यातील अटीबाबत प्राध्यापकांनी मांडलेल्या अडचणी आणि शंका यांचा पुरता निरास आजही, अजून झालेला नाही.

(२) ७७–७८ पासून ही वेतनश्रेणी प्रत्यक्षात देण्यास राज्यसरकारने संमती दिली; पण आधीच्या बाकीचे काय? बऱ्याच जणांना ही बाकी ८० साली मिळाली. अनेकांना ती अजूनही मिळायची असणार! या उशीराला कारण काय ? तर तसे काहीच नाही. या उशीराबाबत काही दिलगिरी वगैरे ? अजिबात नाही !

(३) प्राध्यापकाचे लाखो रुपये आठआठ दहादहा वर्षे अडकून पडले. या रकमेच्या व्याजाचे काय ? सध्याच्या आवर्ती ठेवीत साधारण सात वर्षांत रकमेची दामदुप्पट होते. याचा अर्थ, प्राध्यापकाना जितकी रक्कम मिळाली तितकीच, किंवा तीहून थोडी जास्त रक्कम त्याची बुडाली! मग हे एवढे व्याज मिळाले तरी कोणाला ? अर्थात सरकारला! आणि ही काही नवी गोष्ट नव्हे. १–४–६६ पासून ज्या नव्या वेतनश्रेणी आल्या होत्या, त्यांची अंमलबजावणी अशाच क्रमाने झाली होती. म्हणजे, ७३ च्या श्रेणीचा विचार जेव्हा ७५ साली सुरू झाला त्या वेळी ६६ च्या वेतनश्रेणीच्या अंमलबजावणीचे घोळ चालूच होते. म्हणजे पाहा. प्राध्यापकाच्या मालकीची हक्काची रक्कम. ती सरकार व्याजी लावणार आणि दामदुप्पट झाल्यावर प्राध्यापकाच्या हाती फक्त मुद्दल देणार! वर औदार्य मिरवणार ! या साऱ्यात मख्खी एकच : प्राध्यापकांचा मालकी हक्क शक्य तितक्या उशीराने मान्य करायचा!

(४) यासाठी एक घोळ अखडपणे चालवला जातो. तो घोळ म्हणजे आधीच्या श्रेणीतल्याना नव्या श्रेणीत कसे आणि कुठे बसवायचे याचा घोळ !' पहिले नियम. मग दुरुस्त नियम. मग परिपत्रकाची दुरुस्ती. असे अखंड चक्र चालू असते. आजही हे चक्र चालू आहेच. (आम्ही प्राध्यापक म्हणजे मुळात चिकित्सक. त्यातही 'प्लेसमेन्ट'ची बाब विलक्षण जिव्हाळ्याची. आम्ही या अखंड चक्रात आपसुख, हौसेने सापडतो. 'Now, look here, let us consider a case', अशी सुरुवात करून आपली स्वत.-चीच 'केस' समोरच्याकडून सारखी पारखून घेतो. समोरचाही आपल्याकडून स्वत चे हिशेब तपासून घेत असतो.– साधारण तीस-चाळीस वर्षांची प्राध्यापकी. ही तीन तपे तीन 'नव्या' वेतनश्रेणीची चावाचाव करण्यात जातात. तेवढाच विरंगुळा!)पण अर्थात असे सतत बदलते, सतत सरकणारे वातावरण तयार करणे, हे सरकार बरे करीत नाही. संभाव्य अडचणीचा आधीच विचार केला, तर हे टळू शकेल; पण ज्या अडचणी ढोबळपणे कुणालाही दिसतील त्या परिपत्रकांना दिसत नाहीत.

(५) जे आज नोकरीत कायम आहेत, त्यांची नोकरी जाण्याचा प्रसंग येऊ नये हे कोणासही समजेल. तसेच जो ज्या पायरीवर कायम झाला आहे असा कोणीही अचानक खालच्या पायरीवर येऊ नये हेही असेच उघड आहे; पण ७३ च्या नव्या वेतनश्रेणीनी नेमके असेच झालेले होते. त्यात जे लोक भरडले गेले त्यांचे सर्वांचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाहीत. बी. एस्सी. होऊन प्रयोगनिरीक्षक म्हणून तीस-तीस वर्षे उत्कृष्ट काम करणारे प्राध्यापक, गेल्या नऊ वर्षांत, प्रश्न सुटण्याच्या आधीच, सेवानिवृत्त झाले आहेत. सरकारचे निर्णय जसे बदलतील तसे त्यांचे प्रश्न त्याच्या निवृत्तीत कदाचित सुटतील !

६) महाविद्यालयातील ग्रंथपाल हे उच्च शिक्षणाचे कार्य प्राध्यापकांच्या बरोबरीने करतात; पण त्याना प्राध्यापकांच्या बरोबरीची श्रेणी देण्याम सरकारने वर्षानुवर्ष खळबळ केली. गतवर्षी ही समानता तत्त्वतः मान्य झाली आहे. अंमलबजावणी मात्र १-१-७३ पासून नाही. तो घोळ अजून चालूच आहे!

७) शारीरिक-शिक्षण संचालकाची स्थिती ग्रंथपालापेक्षाही वाईट आहे. त्याना अजूनही प्राध्यापकाशी समानता मिळालेली नाही. बुद्धी आणि शरीर यांची एकात्मता ही गोष्ट नव्याने समजून द्यायला हवी, अशातली परिस्थिती आज नाही. पण, शारीरिक शिक्षण या विषयाला महाविद्यालयांतच काय, शाळांतही अजून इतर विषयांच्या बरोबरीने मान मिळत नाही. हा विषय कष्टाने आत्मसात केलेल्या शिक्षकांची आणि प्राध्यापकाची उपेक्षाच होते. ७३ च्या वेतनश्रेणीतही अशी उपेक्षा त्यांच्या वाट्याला आली. या उपेक्षेतून ज्या शंका, ज्या अडचणी पुढे आल्या

त्यांचे निरसन अजून झालेले नाही.

८) १०+२+३ च्या हट्टाने व घाईने ११ वी–१२ वी चे वर्ग एका बाजूने शाळांना आणि दुसऱ्या बाजूने कॉलेजांना जोडले गेले. त्यामुळे शेकडो शिक्षक-प्राध्यापकांच्या ज्या अडचणी उभ्या राहिल्या त्या सात वर्षांनंतरही कायम आहेत !

९) प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचा वेतनश्रेणीचा प्रश्न खरे तर प्राध्यापकाच्या वेतनश्रेणीबरोबरच सोडवायला हवा होता. शिक्षण हे एकसंध क्षेत्र. त्यातले प्रश्न सोडवताना या एकसंधतेचे भान असायलाच हवे. पण तसे झाले नाही. वेगळ्याच यंत्रणेने, वेगळ्या वेळापत्रकाने त्याची वेतनश्रेणी ठरविली. त्यातले प्रश्न अजून कायम आहेतच.

हे केवळ काही ढोबळ मुद्दे झाले. बारीकसारीक पण महत्त्वाचे मुद्दे अनेक आहेत. या साऱ्या समस्यांच्या बाबत जो अनिश्चितपणा आणि जो काळकाढूपणा चालू आहे त्यामुळे सारे प्राध्यापक अगदी टेकीस आले आहेत. आणि जसे सरकारचे, तसेच जनतेचे, विशेषत: पालकांचे, लक्ष आपल्या असहाय अवस्थेकडे वेधून घेण्यासाठी त्यांनी ही परीक्षा-बहिष्काराची घोषणा केली आहे !

◻

एरवी हा बहिष्कार बरोबर नाही, हे प्राध्यापकांना माहीत आहेच.

प्राध्यापकाचा पगार कोण देते ? तर संस्थाचालक. संस्थांना पैसा कोण पुरवते ? तर सरकार. आता परिक्षेवरील बहिष्काराने संस्था काय किंवा सरकार काय, यांना काडीची झळ पोचणार नाही. म्हणजे पगारदात्या मालकास अडवणे व त्याची कोंडी करणे, हा जो संपाचा मुख्य हेतू तो या संपाने साध्य होणार नाही. प्राध्यापकांना हे साधे गणित समजत नाही काय ? त्याना ते समजते, पण ते म्हणतील–

' आमच्या संपाने संस्थांवर किंवा सरकारवर प्रत्यक्ष असा काही परिणाम होणार नाही हे आम्ही जाणतो. विद्यार्थ्यांना आणि त्यामुळे पालकाना या संपाची झळ पोचणार, हेही आम्ही जाणतो. त्याचे दु:ख आम्हाला आहे. कारण आमचीही मुले या झळ लागणाऱ्या विद्यार्थ्यांत आहेत. या विद्यार्थ्यांना त्रास व्हावा असे आम्हास कसे वाटेल ? पण अशी थोडी कोंडी झाल्याने पालक जागे होतील आणि आमच्या प्रश्नांची जाण दाखवून ते नीट समजून घेतील अशी आम्हाला आशा वाटते. पालक अशा रीतीने जागे व्हावे, त्यांनी आग्रह धरून संस्थांचे व विद्यापीठाचे कारभारी आणि शासन यांच्याकडे त्यांची कार्यपद्धती बदलण्याचा नेट लावावा, अशी आमची इच्छा आहे. कारण असा काही नेट लावल्याशिवाय नुसत्या ठरावांनी, किंवा अर्जेविनंत्यांनी हे उच्चपदस्थ शासक बदलतील–सुधारतील असे दिसत नाही.'

प्राध्यापकांचे हे म्हणणे रास्त दिसते.

येथे शेतकऱ्यांचे ' रस्ता–रोको' आंदोलन आठवते. किंवा मुंबईस गिरणगाववासीयांचे ' रस्ता–रोको' आदोलन आठवते. मित्रवर्य डॉ. गो. मा. पवार याच्याबरोबर कोल्हापुराच्या दिशेने एस. टी.ने चाललो होतो. भुइंजच्या अलीकडे दगडांची रांग. गाडी थांबली. पलीकडे रस्त्याच्या मधोमध गोल करून शेतकरीमंडळी बसली होती. त्यांच्यात जाऊन विचारले.

' किती वेळ हा बंद चालणार ?'

' वरून आदेश येईपर्यंत. ' सहज उत्तर आले.

' पण आमचं महत्त्वाचं काम आहे. त्याचा खोळंबा होऊ दे का ?' सहानुभूती मिळवण्यासाठी आमचा प्रश्न.

' तुम्ही शहरातली माणसं. तुमची थोडी अडचण होऊच दे, तरच तुम्हाला आमची मोठी अडचण समजेल !'–उत्तर कायदेशीर होते. न्यायाचेही होते.

' पण आम्हाला समजून काय उपयोग ? आम्ही थोडेच सरकार आहोत ?'-आमचा तात्त्विक प्रश्न.

' बऱ्याच लोकांची अडचण झाली म्हणजे सरकारला बरोबर कळतंय. एरवी सरळ वाटेनं हल्ली कळेनासं झालं आहे !'–त्यांनी अनुभविक उत्तर दिले.

आपणा साऱ्यांना हे उत्तर पटेल. कारण आपणा साऱ्याचा अनुभव तोच आहे. लोकमताच्या किंवा लोकप्रक्षोभाच्या मार्गाने जे अर्ध्या तासात होते, ते सनदशीर, तंत्रशुद्ध मार्गाने अर्ध्या आयुष्यातही होत नाही! लोकमताचा आणि लोकप्रक्षोभाचा पाठिंबा प्राध्यापकांना मिळावा अशी प्राध्यापकांची संपामागची कल्पना दिसते.

◻

येथे एक वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. सामान्य लोकमताचा पाठिंबा प्राध्यापकांना फार कमी मिळतो. प्राध्यापकांचे काम कमी, वेतन जास्त आणि आरामही जास्त–अशी त्यांची सर्वसाधारण धारणा असते. ते म्हणतात–

' बहुतेक बुद्धिमान मुले डॉक्टर, नाही तर इंजिनियर, नाही तर कलेक्टर, नाही तर एलायसीत अधिकारी, नाही तर बँकेत अधिकारी होतात. प्राध्यापकाची निवड शेवटी शेवटी होते आणि ती निवड झालेली मुले दुय्यम किंवा सुमार दर्जाची असतात. यांना दिवसाचे कामाचे तास नेमून दिलेले नसतात. इतर व्यवसायात कसे आठ-दहा तास सलग खेचून काम असते. शिवाय यांना वर्षात चार महिने सुटी असते ती वेगळीच ! आणखी म्हणजे याच्या कामाच्या फळावर याच्या कामाची परीक्षा होत नाही. म्हणजे किती विद्यार्थ्यांना किती ज्ञान मिळाले यावर यांची आवक कधी अवलंबून नसते. क्लासवाल्यांचे कसे ? जो उत्तम शिकवतो, टिपणे देतो, तयारी करून घेतो त्याच्याच क्लासला गर्दी होते. प्राध्यापकांचे तसे नाही. त्यांनी ' तास घेतले ' आणि ' शिकवले नाही ' तरी (कायम झाल्यावर) चालते. याखेरीज काही प्राध्यापक वर्गात नीट शिकवीत नाहीत आणि नंतर मुलांना शिकवणीला बोलावतात –असे प्रकार वेगळेच!'

हे आक्षेप बहुतेक नागरिकाच्या आणि पालकांच्या मनात असतात. हे आक्षेप येथे मुद्दाम दिले आहेत. या आक्षेपाचा विचार आम्ही प्राध्यापकांनी अंतर्मुख होऊन प्रांजळपणाने आणि आत्मपरीक्षणाच्या वृत्तीने केला पाहिजे. त्याला पर्याय नाही!

पण त्याबरोबर हेही खरे की, हे सारे आक्षेप प्राध्यापकांच्या क्षेत्रालाच लागू पडतात असे नाही. ते साऱ्याच क्षेत्राना लागू पडतात.

साधे डॉक्टरीचे क्षेत्र घेऊ या. यातल्या गमती कळण्यासाठी अरुण लिमयांचे ' क्लोरोफॉर्म' किंवा अनिल अवचटांचे लेखच वाचायला हवेत असे नाही. रोगी म्हणून आपल्याजवळ आपला अनुभव असतो तो आठवावा !

डॉक्टर होणारे सारे बुद्धिमान असतात हेच आधी खरे नाही. कारण तेवढी तेज-

बुद्धी प्रत्येकात असती तर आपण डॉक्टर व्हायला नको होतो हेच अनेकांना समजले असते. श्रेष्ठ बुद्धिमत्तेची मुलेच वैद्यकीय शिक्षणाकडे जातात हेही खरे नव्हे. खूप गुण मिळविणारी मुले जातात, जाऊ शकतात इतकेच त्यातले तथ्य; पण खूप गुण म्हणजे बुद्धिमत्ता नव्हे !

कामाचे तास घ्या. सर्व डॉक्टर सारखेच आणि खूप काम करतात का ? तर तसे दिसत नाही. फॅमिली डॉक्टरांची पद्धती लोप पावली आहे. रोग्याच्या घरी 'व्हिजिटस्' जवळजवळ संपल्या आहेत. प्राध्यापकांच्या साप्ताहिक ४० तासांपैकी निम्मा वेळ संशोधनात व मार्गदर्शनात जावा अशी अपेक्षा असते. किती डॉक्टर ज्ञान अद्ययावत राहण्यासाठी संशोधन करतात ? कितीजण नागरिकांना मोफत मार्गदर्शन करतात ? प्राध्यापकांची सध्याची नगण्य श्रेणी (७००-१६००) राहूच दे; परंतु २५०० ते ३५०० अशी श्रेणी घेऊन रोज सहा तास, येतील त्या रोग्यांवर इलाज करणे डॉक्टरलोक पत्करतील काय ?

वर्गात मुद्दाम वाईट शिकवायचे आणि मुलांना शिकवणीला बोलवायचे, असा आक्षेप प्राध्यापकांवर घेतला जातो. चांगल्या इस्पितळात मानद जागा मिळवायची आणि त्या आधाराने खाजगी व्यवसाय वाढवायचा, असा आक्षेप डॉक्टरांवर घेतला जातो.

प्राध्यापकाच्या निर्लेप कर्तव्यबुद्धीवर विद्यार्थ्यांचे व्यक्तित्व अवलंबून असते. डॉक्टरांच्या अशा कर्तव्यबुद्धीवर रोग्यांचे प्राण अवलंबून असतात. अशा एखाद्या वेळी, 'हा आजार मला उलगडत नाही, तुम्ही कुणा दुसऱ्याला दाखवा', असा निर्लेप, प्राजळ सल्ला किती डॉक्टर देतात ? बहुतेकजण स्वतःच्या विविध पर्यायांचे प्रयोगच रोग्यावर चालू ठेवतात.

आता आपण काय म्हणू की, सगळेच डॉक्टर्स असे नसतात. सगळीच इस्पितळे धंदेवाईक नसतात. हृदय, नाक, कान, घसा, डोळे, एक्सरे–इत्यादी तज्ज्ञांच्या लुबाडणाऱ्या सोनेरी टोळ्या सर्वत्र नसतात. तर हे मान्यच होईल !

आपणाला हेही मान्य करायला हवे की, प्राध्यापकांतही सर्वच प्राध्यापक दोषी नसतात. जसे डॉक्टर चांगले असतात तसे प्राध्यापकही चांगले असतात आणि या चांगल्याचे प्रमाण साधारणपणे सारखेच असते. म्हणून व्यक्तीची तुलना होऊ शकते; पण व्यवसायांची तुलना करता येणार नाही. ◻

इथे पुन्हा आपण बहिष्काराच्या मुद्द्याकडे येतो. डॉक्टरलोकदेखील हल्ली संप करतात. या संपांमुळे रोग्यांची गैरसोय होते, हालही होतात; पण डॉक्टरांचा संप रोग्याविरुद्ध नसतो, तसाच प्राध्यापकांचा संपही विद्यार्थ्यांविरुद्ध किंवा पालकांविरुद्ध नाही. विद्यार्थ्यांची आणि म्हणून पालकांची या संपामुळे अडचण होणार यात शंका नाही; पण या अडचणीच्या वेळी तरी त्यांनी प्राध्यापकांची अगतिकता समजून घ्यावी अशी प्राध्यापकांची अपेक्षा आहे.

शिक्षणक्षेत्रात विद्यार्थी आणि प्राध्यापक हे, खरे तर सर्वांत महत्त्वाचे घटक मानले जायला हवेत; पण सध्याची स्थिती तशी नाही. शिक्षणक्षेत्रातील सध्याचे चालक व व्यवस्थापक विद्यार्थ्यांना घाबरतात (महत्त्व देत नाहीत) आणि प्राध्यापकांना सर्वांत कमी महत्त्व देतात, त्यांची उपेक्षा आणि अवहेलना करतात. प्राध्यापकांचीच नव्हे तर प्राध्यापनात विनंतीपूर्वक निमंत्रित करून सहभागी करून घेतलेल्या विद्वानांचीही उपेक्षा होते ! शिक्षणक्षेत्रात प्रत्यक्ष शिक्षणालाच आज सर्वांत कमी महत्त्व मिळते. त्याचाच हा परिणाम आहे.

विद्यापीठाच्या कारभारातील एक प्रकार जनतेने समजून घ्यावा असा आहे. परीक्षक म्हणून प्राध्यापक जे काम करतात, त्या कामाचे हक्काचे शुल्क त्यांना दोन-दोन वर्षे मिळत नाही ! प्रश्नपत्रिका काढणे, उत्तरपत्रिका तपासून देणे, परीक्षांचे निकालपत्र तयार करणे, अशा कामांच्या शेवटच्या तारखा ठरलेल्या असतात. त्या पाळल्या नाहीत तर दंड होतो. या दंडाचे कोष्टकही तयार आहे. हे सारे आवश्यकच आहे; पण याबरोबर शुल्क मिळण्याची शेवटची तारीखही नमूद हवी. ते मात्र नाही !

नोकरी करणाऱ्या प्राध्यापकांचेच नव्हे, तर मानद काम केलेल्या विद्वानांचे शुल्कही दोन–दोन वर्षे दिले जात नाही ! इंग्लंडमधील एका विद्वानांनी पीएच. डी. चा एक प्रबंध दोन वर्षांपूर्वी तपासला त्यांना अजून शुल्क मिळालेले नाही ! पंचाहत्तरीनिमित्ताने नुकतेच ज्यांचे सत्कार झाले अशा विख्यात साहित्यिकांना साधे शे-दीडशे रुपये गेल्या वर्षभरात मिळालेले नाहीत !

विद्यापीठाजवळ पैसे नाहीत असे नाही. विद्यापीठाच्या जिपा पळवण्यासाठी महाग पेट्रोल खरीदायला पैसा आहे; कार्यकारिणीच्या सदस्यांचे हजारो रुपयांचे भत्ते तावडतोब द्यायला पैसा आहे; मंत्रिमंडळाला हजारो रुपयांचे जेवण द्यायला पैसा आहे; विद्वानांचे शंभर–दोनशे रुपये द्यायला मात्र पैसा नाही ! पैसा कशाला नसेल ? पैसा आहे; पण न मागता वेळेवर तो विद्वानाला मिळावा अशी, विद्यागौरवाची वृत्ती नाही !

अशी विविध स्वरूपाची अक्षरशः शेकडो उदाहरणे आहेत. शासनातील व शिक्षणक्षेत्रातील या शिक्षणविरोधी वृत्तीसंबंधी स्वतंत्रच लिहायला हवे. या वृत्तीने प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर वर्ग कसा नाडला गेला आहे, एवढेच आज स्पष्ट केले आहे.

◻

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

# या यज्ञाला सर्व विचारी नागरिकांनी विरोध केलाच पाहिजे

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

ललिता बर्वे यांच्या 'मुंबई वार्ता'मध्ये विज्ञानानंदस्वामींच्या १००८ सत्यनारायण समारंभाचा वृत्तांत वाचला. निदान काही सुबुद्ध नागरिक आणि विज्ञाननिष्ठ संस्था या ढोंगबाजीला विरोध करायला पुढे सरसावल्या याचा आनंद वाटला. पण त्याच वेळी असेही वाटले की, या सर्व गोष्टी पार पडेपर्यंत थांबून मग त्यावर मल्लीनाथी करण्याऐवजी आधीपासून वृत्तपत्रांनी त्या विरुद्ध आघाडी उघडायला हवी होती !

हे सत्यनारायणवाले नुसतीच खोटी आश्वासने देतात असे नाही, तर ती पारही पाडत नाहीत. पुण्यात याच स्वामींनी १०८ सत्यनारायण ठोकले होते, त्यात पूजा करणाऱ्या प्रत्येकाला त्याचा मानसिक ग्राफ, भविष्य आणि साधनामंत्र दिला जाईल असे सांगितले होते, पण अनेकांना त्यातले काहीही मिळाले नाही.

याच धर्तीचा आणखी एक प्रकार मुंबईत लवकरच होऊ घातला आहे. त्याबद्दल नागरिकांना वेळीच सावध करण्याकरता हा लेख लिहित आहे. ५ जानेवारीच्या ' टाइम्स ऑफ इंडिया 'मध्ये एक जाहिरात झळकली. त्यात मुंबईच्या गिरगाव चौपाटीवर ५।६।७।८ फेब्रुवारी रोजी एक १०८ कुंडी गायत्री महायज्ञ होणार असल्याची घोषणा होती. ' Event of the Year' असे त्याचे वर्णन होते,कारण संयोजकाच्या म्हणण्यानुसार १०८ कुंडे असणारा एवढा मोठा यज्ञ मुंबईत अद्याप कधीही झाला नाही. आश्चर्य म्हणजे या कार्यासाठी दिलेल्या देणग्यावर आयकर खात्यातर्फे १००% वजावट मिळणार आहे. हे वाचून मी जरा चिडलोच, आणि लगेचच ' टाइम्स 'ला एक पत्र लिहिले. पत्रात लिहिले होते–

' आपल्या लोकांची फार पुरातन काळी अशी समजूत होती की, स्वर्गस्थ देव-देवतांना आहुती दिल्यामुळे इहलोकात आपल्याला समृद्धी लाभते. ही समजूत पूर्णपणे खोटी, अशास्त्रीय आणि निराधार आहे हे पुन:पुन्हा सिद्ध झालेले आहे. यु. एस. ए., रशिया, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, कॅनडा इ. देश एकही यज्ञ न करता पराकोटीची समृद्धी उपभोगीत आहेत आणि गेली हजारो वर्षे जिथे हजारो यज्ञ होत आहेत त्या भारतात मात्र दारिद्र्य, निरक्षरता, गलिच्छपणा, निष्क्रियता, सामाजिक अन्याय, साथीचे रोग यांचे थैमान चालू आहे, ही एकच गोष्ट असल्या यज्ञाचे निष्फलत्व सिद्ध करायला पुरेशी आहे.

'आमची अशी समजूत होती की, सामाजिक उपयुक्ततेच्या कार्यांसाठी दिलेल्या देणग्यांना आयकर सवलत मिळते. या यज्ञापासून कोणते सामाजिक फायदे होणार आहेत याचा आयकर खाते खुलासा करेल काय ?'

हे पत्र अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. पण या पत्राची प्रत मी यज्ञाच्या संयोजकांना पाठवली आणि त्यांचा खुलासा मागवला. त्याचे तात्काळ उत्तर आले. त्यात त्यांनी यज्ञाबद्दलची बरीच माहितीपत्रके आणि त्यांच्या संस्थेच्या कार्याची माहिती कळवली होती. हा यज्ञ दोन संस्थांमार्फत होत आहे. एक आहे गायत्री परिवार ट्रस्ट. प्राचीन परंपरांचा पुनरुच्चार करून धार्मिक विचारांचा फैलाव करणे असा या ट्रस्टचा हेतूच दिलेला आहे तरीही याना कर-सवलती कशा मिळतात आश्चर्य आहे ! दुसरी एक संस्था आहे, ग्रामीण विकासार्थ काम करणारी. यांच्यातर्फे गुजरात राज्यात १२४ खेड्यांत विकास-कामे चालवली जातात. त्यात सुधारित शेती, उपसा जलसिंचन, वृक्षारोपण, संकरित गायी इत्यादि कार्यक्रम आहेत.

संयोजकाच्या म्हणण्यानुसार त्याच्या यज्ञात तीळ, तांदूळ किंवा तूप जाळले जाणार नाही. तर हिमालयातील वनस्पतीपासून बनवलेली खास ' सामुग्री' जाळण्यात येईल. आणि यामुळे मुंबई शहरात दाटलेले प्रदूषण दूर होणार आहे !

या यज्ञवाल्याचे मी एक बघून ठेवले आहे. जेव्हा अन्नटंचाई होती त्या वेळी धान्य मुबलक पिकण्याकरता यज्ञ होत. रोगराई होती त्या वेळी ती नष्ट करण्याकरता यज्ञ करीत. सध्या प्रचलित चलनी विषय आहे प्रदूषण. मग सगळे मंत्रवाले आणि यज्ञवाले आपण प्रदूषण दूर करू शकतो असा दावा करू लागतात. या हिमालयीन वनस्पती जाळण्याने तरी प्रदूषण दूर होते कशावरून ? यावर कोणी controlled trials घेतल्या आहेत का ? त्याचे निष्कर्ष शास्त्रीय कसोट्या लावून तपासले आहेत का ? संयोजकांच्या म्हणण्यानुसार त्याचे कोण स्वामी आहेत ते या विषयावर संशोधन करण्याकरता ' रिसर्च इन्स्टिटयूट' चालवतात. हा आणखी एक सामान्यांना आकर्षक वाटणारा शब्द ! कुठल्याही विषयावर'रिसर्च'चालू आहे म्हणजे तो भलताच भारी विषय वाटतो. त्यातल्या त्यात परदेशात ' रिसर्च ' चालू आहे म्हटले की आवाजच बंद ! मग तो ओंकारध्वनी असो गायत्रीमंत्र असो किंवा रामनाम जप असो! ' रिसर्च' करणे वेगळे आणि त्यातून योग्य निष्कर्ष सिद्ध होऊन मग ते मान्य करणे वेगळे, हे कोणाला माहीतही नसते. त्यामुळे सर्रास असे नुसते ' रिसर्च' (खरे वा काल्पनिक) विरोधकांच्या तोंडावर फेकले जातात. आता या प्रदूषणाच्याच बाबतीत साधे तर्कशास्त्र चालवा.

(१) हल्ली कारखानदारी व यांत्रिक वाहने वाढल्यामुळे प्रदूषण प्रचंड वाढले आहे. प्राचीन काळी प्रदूषण नव्हते.

(२) यज्ञ केल्याने ते दूर होऊ शकते.

(३) प्राचीन काळी ऋषी, मुनी, राजे, धनाढ्य लोक शेकडो यज्ञ करीत.

आता प्रदूषणच नव्हते तर इतके यज्ञ तरी कशाला करीत ?

दुसरी साधी गोष्ट. कोणतीही वस्तू जाळली की कार्बन डाय ऑक्साइड व अर्धवट

जळल्यास कार्बन मोनॉक्साइड हे विषारी वायू तयार होतात. मग ते धान्य असो, लाकडे असोत वा हिमालयीन वनस्पती असोत. १०८ कुंडे ५ दिवस अहोरात्र काही ना काही गोष्टी उगीचच जाळत रहाणार त्याने हवा शुद्ध कशी होईल ? उत्तर तयार आहे – तुम्हा अश्रद्ध लोकांना ते कळणार नाही.

या पुढचा प्रकार तर आणखीच निंद्य आहे. या यज्ञाच्या संयोजकांतर्फे जो मागेल त्याला मंत्रलेखनपुस्तिका पुरवण्यात येणार आहेत. त्यात गायत्रीमंत्र हजार, दोन हजार, पाच हजार तुम्हाला जमेल तितक्या वेळा लिहून काढायचा ! आता हा अव्यापारेषु व्यापार करण्यात फुकट वेळ का घालवा असा प्रश्न कुणाला पडला तर त्यालाही उत्तर तयार आहे. पूर्वी रेल्वे स्टेशनवर जसे चहा प्यायल्यामुळे होणाऱ्या फायद्यांची यादी लावलेली असे तशी गायत्रीमंत्रलेखनापासून होणाऱ्या फायद्यांची जंत्री संयोजकांनी पुरवली आहे. त्यानुसार अशा कारकुनीमुळे (१) सर्व भौतिक गरजा भागतात. (२) बेकारांना काम मिळते किंवा स्वतःचा उद्योग सुरू करता येतो. (३) घरगुती बेबनाव मिटतात. (४) निरनिराळ्या संकटांतून वा कठीण परिस्थितीतून पार पडता येते. (५) दुर्गुणांचा नाश होऊन संयम, सच्चरित्र, आत्मनियमन, उद्योजकता, चिकाटी, औदार्य इ. गुण अंगी भिनतात. (६) मन भरकटत नाही. मातेच्या मांडीवर सुखाने लोळणाऱ्या बालकासारखा आनंद लाभतो. (७) भौतिक सुखाबद्दलची आसक्ति कमी होऊन सात्त्विक विचाराने मन भरून जाते. (८) हे मंत्र लिहून ठेवलेले स्थान अध्यात्मिक वातावरणाने भारले जाते. तेथे पाऊल टाकताच भर उन्हातून बर्फाच्या कारखान्यात शिरल्यासारखा दिलासा मिळतो. आता इतके प्रचंड फायदे जर एक संस्कृत ओळ नुसती काही हजार वेळा लिहून मिळणार असतील तर कोण नको म्हणेल ? कष्ट, धडपड, अभ्यास, व्यासंग यापेक्षा एखादा मंत्र, अंगठी, स्तोत्र वा गुरुबाबाचा आशीर्वाद अशा 'शॉर्टकट 'ने जर आमचा उद्धार होणार असेल तर तो आम्हा भारतीयांना हवाच असतो ! साहजिकच अशा उपक्रमाला हजारो बकरे बळी पडतात ! पुन्हा जर कुणी आम्ही २५००० वेळा मंत्र लिहूनही आमच्या परिस्थितीत काहीच फरक पडला नाही अशी तक्रार केलीच, तर त्यालाही उत्तर तयार असते. 'तुम्ही सश्रद्ध अंत:करणाने मंत्रलेखन केले नसणार !' म्हणजे Heads I win, tails you lose अशातलाच प्रकार. श्रद्धा मोजण्याचा मीटर कांही अस्तित्वात नाही, त्यामुळे प्रश्नच संपतो.

माझा यापुढचा प्रश्न असा की, जर नुसत्या गायत्रीमंत्राने एवढ्या किमया घडू शकतात तर याच्याच भगिनी प्रतिष्ठानाला खेड्यामध्ये लिफ्ट इरिगेशन, झाडे लावणे आणि संकरित गायी असले भौतिक मार्ग वापरून समृद्धी आणण्याची धडपड का करावी लागते ? नुसत्या मंत्रलेखनपुस्तिका गोठ्यात ठेवायच्या. २ लिटर दूध देणारी गाय २० लिटर दूध देऊ लागलीच पाहिजे !

खरे तर असल्या भाकड मंत्रोपचाराने प्रदूषण दूर होते वा सुख-समृद्धी लाभते यावर संयोजकाचाही विश्वास नसणार. अडाणी, भोळसट, श्रद्धाळू लोकांना भूलथापा मारून त्यांच्याकडून पैसा गोळा करण्याचे साधन म्हणून ते या उपायांचा अवलंब करत असावेत. यातलाच थोडासा पैसा ग्रामीण विकासाकरता खर्च करायचा. म्हणजे करसवलत चालूच ! 'हजारो रुपये खर्च न करता यज्ञ करता येतो, हे आम्ही सिद्ध करणार आहोत', असे संयोजक सांगतात; पण ही १०८ कुंडे, मंडप, मंत्रलेखनपुस्तिका यांना काय खर्च पडणार नाही ? या यज्ञाच्या स्मरणिकेत जाहिरातीचा दर आहे ५००० रुपये पान ! आणि मुखपृष्ठाला २५००० रुपये !! स्टॉक एक्सचेंजच्या इमारतीत या ट्रस्टचे कार्यालय आहे हे सांगितले म्हणजे एवढा पैसा कोण खर्च करत असेल, याचे आश्चर्य वाटायला नको.

आता माझा सर्वांत महत्त्वाचा आक्षेप. सध्या विद्यार्थ्यांनादेखील आवश्यक वह्या, योग्य वेळी, योग्य किंमतीत मिळू शकत नाहीत. कागदाची किंमत दिवसेंदिवस वाढते आहे. मध्यमवर्गीयच काय, पण श्रीमंत माणसालाही ग्रंथ विकत घेण्याची ऐपत उरलेली नाही. अशा वेळी कागदासारखी एक मौल्यवान राष्ट्रीय संपत्ती अशा फालतू, अंधश्रद्धा जोपासणाऱ्या आणि पूर्णपणे अशास्त्रीय फंडवर वाया घालवणे हे राष्ट्रद्रोही कृत्य समजले पाहिजे !

असा अपव्यय थांबवा, म्हणून मी महाराष्ट्र राज्याच्या नागरी पुरवठा मंत्र्यांना पत्र पाठवले. त्यांचे उत्तर येण्यापूर्वी मुख्यमंत्रीच स्थानभ्रष्ट झाले ! नव्या मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवले आहे. पाहू काय करतात. आयकर अधिकाऱ्यांना पत्र लिहिले, त्याचे उत्तर नाही. 'महाराष्ट्र टाइम्स 'ला लेख पाठवला तोही अद्याप प्रसिद्ध झाला नाही. इतर वृत्तपत्रांना पत्रे पाठवली आहेत. पैकी 'केसरी 'त एक प्रसिद्ध झाले. इतरत्र होतील असे वाटते. मुंबईच्या महाराष्ट्र रॅशनॅलिस्ट असोशिएशनला लिहिले आहे; पण कोणा तरी कायदेतज्ज्ञाने कोर्टातर्फे या दुरुपयोगाचा 'स्थगिती हुकूम' आणला पाहिजे. पूर्वी नाण्यांचा उपयोग दागिन्यात करण्याविरुद्ध कारवाई केली जाई. त्यापेक्षा हा जास्त नुकसानीकारक प्रकार आहे.

प्रत्येक सुजाण नागरिकाने 'अशा प्रकारे वह्यांची नासाडी करणाऱ्या या यज्ञाला आमचा विरोध आहे. शासनाने यावर बंदी घालावी!' अशी कार्डे मुख्यमंत्र्यांना पाठवावी. सह्यांची मोहीम काढावी. शक्य तर संयोजकांशी चर्चा करून त्यांना यापासून परावृत्त करावे. मुंबईत अनेक विज्ञानचळवळी आणि युवक संघटना आहेत. त्यांनीही सहाय्य करावे. नाही तर एकदा समारंभ पार पडल्यावर त्यावर 'फोकस' आणि पंचनामा करून काय उपयोग ? ☐


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य वहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

श्यामची संसारकथा

# नवीन वर्षाचे संकल्प व ' श्याम '

फिरोझ रानडे

' काय लिहिता आहात सकाळ सकाळचे एवढे उठून ?' राधाने चारपायीवरून पडल्यापडल्याच मेजाशी लिहित बसलेल्या पाठमोऱ्या श्यामला बघून म्हटले. ते कानी पडताच श्यामने दचकून हातातली लेखणी तशीच खाली ठेवून दिली.

लग्नानंतर माणसाला 'खाजगी' नावाचे म्हणून काही आयुष्य रहात नाही हेच खरे. श्यामच्या मनात विचार आला. आता नवरा काही जगावेगळी गोष्ट करत असला व बायकोने त्याला असे विचारले तर ते कोणीही समजू शकतो. पण एखादा दिवस दररोज करत असलेली दाढीसुद्धा नवरा एक पंधरा मिनिट वा अर्धा तास आधी करू दे, ' आज लवकरशी दाढी होतीय ?' ह्या प्रश्नरूपी श्रीखंडात संशयरूपी केशर मिसळून नवऱ्याला खायला घातलेच गेले म्हणून समजा. एवढ्या मोठ्या पांढऱ्याशुभ्र चक्क्याचे अगदी चिमूटभर केशरसुद्धा कसे रंग पालटून टाकते. त्याचप्रमाणे बायकांच्या सर्व प्रश्नात केशर असते, ते त्याचा रंग बदलते आणि नवऱ्याचा रंग बिघडवते !

आता हेच बघा ना. सकाळी उठून काही लिहिणे ही काही अगदी जगावेगळी गोष्ट नाही. पण ती आपला नवरा जर करत असेल तर मनाशी 'असेल काही तरी लिहित' वा जुन्या वळणाची असेल तर, ' असतील काही तरी लिहित' असे कोणी बाई मनाशी म्हणत नाही. ती जनाशी स्पष्ट व उघडपणे विचारते ' सकाळी सकाळी काय लिहिता आहात एवढे ?'

आताचेच बघा ना. राधाने चांगले झोपायचे सोडून हा केशर-मिश्रित प्रश्न विचारायाची काही गरज होती का ?

सकाळचे जेमतेम सहा वाजले होते. अजून राधा तास-दीड तास काही उठत नाही ह्या आत्म व राधा-विश्वासात श्यामने लिहायला सुरुवात केली होती. पण विश्वासघात करणे हा बायकांचा, जसा पदार्थ-विज्ञानात म्हणजे physics मध्ये वेगवेगळ्या पदार्थांचे गुण-धर्म असतात तसाम्पदार्थविज्ञानी-गुण physical property असतो.

एखाद्या संध्याकाळी मित्रांबरोबर मद्राशाकडे चांगले मसाला डोसा वगैरे खाऊन बाहेरख्यालीपणाचे वर्तन करून यावे. घरी येताच मोठ्या आत्मविश्वासाने ' आज अगदी बरं वाटत नाही आहे. भूक म्हणून नाही बघ !' म्हणावे व बायकोने नवऱ्याकडे पहाताच विश्वासघात झालाच म्हणून समजावे. बायकांना नवऱ्याची प्रकृती ठीक आहे की नाही, हे कोणतीही नाडी न पहाताच समजते. त्या करता त्यांना मोजावे लागत नाहीत छातीचे ठोके, नाही बघावी लागत जीभ ! त्या फक्त तोंड पाहूनच रोग-निदान करतात. त्यांनी नवऱ्याकडे नुसते बघितले की नवऱ्याचा आत्मविश्वास नुसताच डळमळतो असे नाही तर तो अगदी जमीनदोस्त होत असतो.

'बरं नसायला काय झालंय ? चार घास खाऊन घ्या बरे वाटेल ! आज तुमच्या आवडीचे परोठे केले आहेत. '

इतके दिवस आपण परोठे कर, परोठे कर म्हणून बायकोच्या मागे लागलो होतो आणि तिला परोठे करण्याची बुद्धी आजच व्हावी ना ? असा करुणामय, पण रागाचा प्रश्न नवरा स्वतःलाच विचारतो. पण आता परोठ्यापासून सुटका नसते. मसाल्या-डोशाची तोंडाला आलेली चव परोठ्याने मारावी लागते. ते आवडीने व आग्रहाने खावे लागतात व त्याने नवरा खरंच आजारी पडतो !

' काय लिहिता आहात सकाळ सकाळचे एवढे उठून ?' हा राधाचा प्रश्न कानी येताच एकाग्रपणे लिहित असलेला श्याम दचकला होता. त्या दचकण्यातच त्याने हातातली लेखणी खाली ठेवली होती.

श्याम दचकला आहे हे पहाताच श्रीखंडातले केशर-प्रमाण वाढले व कधी नव्हे ते लबालबा राधा उठली. श्यामच्या जवळ आली व व त्याच्या खांद्यावरूनच तो काय लिहितो आहे ते बघितले. तो रोजनिशी लिहित आहे बघून तिचा इंटरेस्ट नाहीसा झाला व नाक उडवत ती म्हणाली, ' रोजनिशीच लिहिता आहात होय?' परत चारपायीवर जाऊन पडली व डोळे मिटून घेतले.

राधाचे नाक उडवणे एखादा A चा U झालेला सेन्सॉर सिनेमा पहाणार काय ? म्हणून कोणी विचारता जसे नाक उडवले जाईल त्या पद्धतीचे होते. संसारातल्या रोजनिशा अशाच A च्या U केलेल्या सेन्सॉरित असतात !

नवीन वर्ष सुरू झाले की त्याबरोबर नवीन वर्षाच्या शुभ-कामना पत्रिका, दिनदर्शिका, दैनंदिन्या ह्यांच्याबरोबरच मनात अगदी उंच-बळून जर कोणती गोष्ट येत असेल तर ती म्हणजे नवीन वर्षाचे संकल्प ! नवीन वर्ष येताच आता पुढील वर्ष वाया घालवता कामा नये, काही तरी केले पाहिजे, काही संकल्प सोडले पाहिजेत असे विचार मनात न येणारा माणूस विरळा ! श्याम हा काही विरळा माणूस नसल्यामुळे त्याचेही मनात असले ' संकल्प-विचार ' उचंबळून आले असल्यास नवल नाही.

आदल्या दिवशीच कोणी तरी श्यामला छानशी, सुबकशी, नाजूकशी-त्या 'गार्डन'च्या जाहिरतीतल्या मुलीप्रमाणे-रोजनिशी आणून दिली होती. किती तरी वेळ श्याम तिला कुरवाळत राहिला होता. तिला म्हणजे ' गार्डन ' मुलीला नाही रोजनिशीला ! त्याच्या बाळपण व तरुणपण ह्यामधले जे एक ' पण ' असते ते श्याम आता काही वेळा करत उपभोगू लागला होता.

मग त्याच्या मनात आले की अशा नाजूक रोजनिशीत का कचेरीचे जाडे-भरडे कार्यक्रम लिहावयाचे ? ते म्हणजे मग ही 'गार्डन' साडी कोणा स्त्री-पात्राला नेसवल्यासारखे होईल ! कचेरीच्या नोंदीकरता तशीच-जाडीभरडी-सरकारी रोजनिशी-मार्च-एप्रिल महिन्यात येईल ती वापरता येईल ! ह्या विचाराने श्यामने ती 'साजूक' घरी आणली होती.

बहुतेक मध्यम व उच्चतर-मध्यम वर्गातल्या घरातून होतो तसा श्यामच्या घरातही

वर्षातून एकदा जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भांडणाचा एक 'गोड' कार्यक्रम होत असतो. श्यामने कचेरीतून नवीन रोजनिशी वगैरे आणली रे आणली की एक बायको, एक मुलगी व दोन मुले ह्यांच्यात ती रोजनिशी घेण्याकरता भांडण लागत असे! प्रत्येकजण आपणाला रोजनिशीची कशी नितांत गरज आहे हे अटीतटीने सांगत असे.

बायकोला त्यांच्या महिला–मंडळाचे कार्यक्रम वगैरे लिहावयाचे असतात. मुलीला काही लिहावयाचे वगैरे नसते म्हणजे तिच्या जीवनात लिहिण्यासारखे काही घडत नसते असे नाही. उलट खूप काही घडत असते. बोलून–चालून ही महाविद्यालयात जाणारी एक तरुणी असते; पण ते सगळे लिहिणे भयावह असते. तिला ती रोजनिशी फक्त जवळ ठेवण्याकरता हवी असते.

मुलांना त्यांच्या शाळेचा अभ्यास वगैरे लिहावयाचा असतो. जर रोजनिशी दिली गेली नाही तर त्याचे फार मोठे शैक्षणिक नुकसान होणार असते. ते जर नापास झाले तर त्याची जबाबदारी चौरसपणे त्यांच्यावर रहाणार नाही, पालकांवर राहील हेही ते जाहीर करून टाकतात.

ही रोजनिशी कोणालाही द्या. प्रत्यक्षात काय होते तर रोजनिशीचे पहिल्या पानावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनिक्रमांक–उंची–मोजायला सोपी व हौशीची गोष्ट म्हणून ती लिहिली जात नाही!

पण आजची रोजनिशी मनमोहक तर होतीच म्हणून तर त्याने ती घरातल्या कोणालाही न दाखवता लपवून ठेवली होती; पण मनमोहकपणाबरोबरच त्या रोजनिशीने त्याच्या पूर्वीच्या म्हणजे फार पूर्वीच्या भावना उचंबळल्या होत्या. ती रोजनिशी बघताच त्याने नवीन वर्षाचे काही संकल्प केले होते व ते पार पाडण्याआधी ते लिहून काढणे आवश्यक होते व श्याम त्या सकाळी सकाळी उठून तेच लिहीत बसला होता.

लग्नापूर्वी श्याम मोठ्या निष्ठेने रोजनिशी लिहीत असे. स्वातंत्र्यानंतर देशभक्तांची निष्ठा मोडली, तर श्यामची पारतंत्र्यानंतर! ती का व कशी मोडली हे ज्यांनी श्यामची पूर्वीची प्रकरणे वाचली असतील त्यांना ज्ञात आहेच. किंबहुना त्यातल्या काही प्रकरणांमुळेच त्याचे दैनंदिनी लिहिणे बंद पडले एवढे सांगितले म्हणजे पुरे!

नियमितपणे रोजनिशी लिहिण्याचे वय फार पुढचे. त्याच्या आधी एक रोजनिशी फक्त ठेवण्याचे म्हणून वय असते. त्यात क्वचितच नोंदी केलेल्या असतात. हे वय महाविद्यालयात जाण्याचे असते. ह्या रोजनिशीवस्थेच्या आधी माणसाची एक अवस्था असते. ती अवस्था म्हणजे सानेगुरुजींच्या वर्गात असण्याची, साधारण ११ ते १५ ह्या वय-गटातली! ह्या वयात रोजनिशी लिहिण्याइतके बळ आलेले नसते; पण काही तरी लिहावे असे वाटण्याइतके कळ आलेले असते.

त्या वयात एक १६० पानाची Exercise Book म्हणून वर हत्तीचे चित्र छापलेली वही विकत घेतली जाते. त्यात मुख्यत्वे करून सानेगुरुजी, आपटेगुरुजी व खाडेकरगुरुजी ह्यांच्याच सुभाषितांची रेलचेल असते. काही थोर विलायती लोकांची सुभाषिते त्यांच्या भाषेत वा मराठीत लिहिलेली असतात. यदुनाथ थत्ते ह्यांच्या 'पुढे व्हा!' मधली निवडक वाक्ये असतात. त्याचप्रमाणे सुभाषचंद्रांचे, 'तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो!' हेही वाक्य असते. साधारणपणे पंडित नेहरू वा महात्मा गांधींची वचने ह्या वहीत नसतात. त्या वयात नेहरूंचे पंडितपण वा गांधींचे महात्मापण विशेष जाणवत नाही हे त्याचे कारण असेल!

वहीच्या पहिल्या पानावर अगदी वरच्या बाजूस मध्यभागी 'Now or Never' हा संदेश जीवनाचा संदेश म्हणून लिहिला जातो; पण दुर्दैव असे की, फक्त हा संदेशच Now लिहिला जातो,बाकी सगळ्या गोष्टी Never ह्या सदरात टाकल्या जातात!

असे काही संदेश लिहून झाले की, माणूस म्हणजे त्या वेळचा मुलगा संकल्प सोडण्याच्या मागे लागतो. त्या वयात असले संकल्प वर्षाच्या पहिल्या दिवशी वगैरे करावयाचे नसतात. कोणा गुरुजींचे वा आचार्यांचे भाषण ऐकले. सुदैवाने देश त्या वेळी पारतंत्र्यात होता त्यामुळे चांगली चांगली भाषणे होत की, मन उफाळून येत असे! आता स्वस्थ बसावयाचे नाही. स्वत:ची उन्नती करून घेतलीच पाहिजे, असे विचार अस्वस्थ करून टाकतात. उन्नती करून घ्यावयाची म्हणजे जीवन शिस्तबद्ध असले पाहिजे. अभ्यास चांगला असला पाहिजे म्हणजे इंग्रजी चागले असले पाहिजे. अशा विचाराने डोके भरून जाते व त्या भरलेल्या डोक्याने व भारलेल्या मनाने संकल्प सोडले जातात!

ह्या संकल्पात अगदी आवश्यक गोष्टी म्हणजे 'सकाळी लवकर उठणे', 'व्यायाम करणे' ह्या संकल्पांबरोबरच भारी भारी संकल्प असतात. असे 'कधीही खोटे न बोलणे,' 'गप्पात वेळ न घालवणे' ह्या तऱ्हेचे. असे सात-आठ संकल्प 'सोडले' जातात. मराठी भाषेत काही शब्द मोठे चपलख बसणारे. पु. ल. म्हणतात त्याप्रमाणे 'मराठी माणूस नेहमी धंद्यात 'पडतो' त्याचप्रमाणे संकल्प नेहमी 'सोडले' जातात, 'धरले' जात नाहीत!

आता शिस्तबद्ध जीवन जगावयाचे म्हणजे दररोजच्या जीवनात शिस्त हवी. तेव्हा पुढील वर्षाची निदान परीक्षा होईपर्यंतची दिनचर्या पक्की केली जाते. ती त्या Now or Never वहीतच लिहिली जाते. त्या दिनचर्येचा तोंडावळा साधारणपणे असा असतो :

सकाळी ५ वाजता उठणे
५ ते ५॥ प्रातर्विधी व व्यायाम
५॥ ते ६॥ इंग्रजी–spelling
६॥ ते ७॥ गणित
७॥ ते ८॥ इतिहास, भूगोल वगैरे
८॥ ते १० शाळेची तयारी
१० ते ५ शाळा
५ ते ६ जनरल वाचन
६ ते ८॥ शाखा, जेवण वगैरे
८॥ ते ९॥ पदार्थविज्ञान–रसायनशास्त्र
९॥ ते १०॥ परत इंग्रजी–निबंध वगैरे
१०॥ ते ११॥ मराठी, अर्धमागधी

हे लिहून झाले की त्याकडे मोठे आदराने व समाधानाने बघितले जाते. दिवसाचा एक क्षणही वाया जाणार नाही आहे, ह्याचे समाधान वाटते. थोर व मोठे होण्याकरता इतकी साधी गोष्ट करावी लागते, ह्याचेही कौतुक वाटते.

तोपर्यंत रात्रीचे फक्त नऊ वाजलेले असतात. खरं म्हणजे आखलेल्या दिनचर्येप्रमाणे आता पदार्थविज्ञान वा रसायन–शास्त्राचा अभ्यास व्हावयास पाहिजे,पण वर आखलेला कार्यक्रम उद्यापासून अवलंबावयाचा असतो, आजपासून नाही ह्या विचाराने माणूस म्हणजे त्या वेळचा

मुलगा झोपून जातो.

सकाळी उठून बघतो तो त्याचे प्रातर्विधी सोडून बाकी सर्व विषय म्हणजे व्यायाम, इंग्रजी–spelling वगैरे झोपेतच होऊन गेलेले असतात ! तेव्हा आता फक्त प्रातर्विधी करुन शाळेला जायचे बाकी असते. तो ते करतो. रात्री परत नऊ वाजता आज काही कार्यक्रमाप्रमाणे जमले नाही, पण उद्यापासून मात्र अगदी हयगय करावयाची नाही असे म्हणून परत तो त्या रात्री लवकर झोपतो. आता माणूस हयगय काय मुद्दाम का करत असतो? ती आपोआप होत असते. ह्या नियमाप्रमाणे परत दुसरे दिवशी आपोआप हयगय होते. तो उशिरा उठतो व परत दुसऱ्या दिवशी पासून अगदी हयगय न करता आखलेली दिनचर्या अंमलात आणावयाची,असा निश्चय करतो. अशी काही वर्षं जातात.

महाविद्यालयाची कायदेशीर ४ वर्षे वा बेकायदेशीर ५ ते ६ वर्षे अशी अत्तरासारखी उडून जातात व अत्तरासारखीच आयुष्यभर सुवास ठेवून जातात. त्या काळात सर्वसाधारण कोणीही दैनंदिनी लिहित नाही. या काळात इतके काही होत असते की त्याला शब्दात पकडणे शक्य नसते व लाभाचे पण नसते. आता श्यामसारखे अधून–मधून लिहितात व मग लग्न झाल्यावर पस्तावतात.

नोकरी लागली की कंपन्यांच्या रोजनिशा मिळू लागतात वा सरकारी रोजनिशी मार्चएप्रिलमध्ये जाग आली की मिळते. अर्थात त्यात काय लिहायचे, हा प्रश्नच, पण एखादवेळी काही काम करावयाचे राहून गेले की साहेब चापतो व त्या निमित्ताने रोजनिशीत लिहिणे सुरु होते. पण त्याला का रोजनिशी म्हणावयाचे ? ती रोजंदारी झाली.


ती 'गार्डन' रोजनिशी श्यामच्या समोर होती. राधाने परत तण्णावुन दिली होती. श्यामने हातात परत लेखणी घेतली. पण लिहिणार काय ? म्हणजे लिहायला काहीच नव्हते असे नाही. गेल्या पाच महिन्यापासून श्याम लेखकु झाला होता. त्याला एक–दोन खुषीपत्रे पण आली होती. पुष्कळ लोकांनी आपण फार मोठे माप श्यामच्या पदरात घालतो आहोत, ह्या भावनेने 'बऱ्या असतात हो तुमच्या कथा !' असे थोडासा 'बाणा' सोडून म्हटले होते. तर काही लोकांनी कथेतल्या अगदी जुजबी गोष्टींबद्दल वाद घातला होता.

मात्र काल कचेरीत एक प्रसंग घडला. श्याम कँटिनला जात असता. त्याच्या ऑफिसच्या दुसऱ्या खात्यातल्या श्रेणी तीन–चार 'गार्डन' मुली त्याच्याकडे पाहून आपसात कुजबुजल्या–'हेच ते श्याम फलाणे बरं का' ! हे ऐकताच श्यामचे सगळे शरीर खूप वर्षांनंतर मोहोरले होते !

आता असे प्रसंग वरच्यावर येणार, तेव्हा त्याची नोंद वेळच्या वेळी झाली म्हणजे पुढे कोणा दिवाळी अंकात आत्मचरित्रात्मक लेख लिहावयाला सोपे पडेल, ह्या हेतूनेच श्यामने आता रोजनिशी लिहायला घेतली होती. ते काही क्षण तो राधाचे वास्तव्य अगदी विसरुन गेला होता. पण ती आहे चांगली भक्कमपैकी आहे हे आताच सिद्ध झाले होते.

श्यामने राधाकडे बघितले. झोपेत ती भगवान बुद्धाच्या पुतळ्यासारखी दिसत होती. पण तिचा भगवान बुद्धासारखा अहिंसेवर म्हणावा तेवढा विश्वास नाही, हे श्यामला माहीत होते. त्यामुळे रोजनिशीत काही लिहावे किंवा लिहू नये अशा संभ्रमात तो पडला.

श्यामची रोजनिशी चांगदेवांच्या पत्राप्रमाणे कोरीच राहिली, हे काय वेगळे सांगायला पाहिजे ? □

रंग माझा वेगळा

सुरेश भटांची कविता
हा मराठी कवितेतला एक स्वयंभू प्रवाह आहे.
विशेषत: त्यांनी हाताळलेला मराठी गझल
हा काव्यप्रकार म्हणजे केवळ उर्दू गझलची
मराठी सावली नाही.
तर एक स्वतंत्र निर्मिती आहे.
श्री सुरेश भटांच्या
स्वत:च्या आवाजात
त्याच्या काही निवडक कविता
आता कॅसेट टेप्सवर उपलब्ध.

अलूरकर म्युझिक हाउस
४, स्वप्न नगरी, कर्वे रोड, पुणे ४११००४ फोन – ३०६६२.

" सर्व प्रमुख रेकॉर्डस् व पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध. "

# अमृताची फळे-अमृताची वेली !

चंद्रशेखर मराठे

अमृताची फळें, अमृताची वेली
तेचि पुढें चाली, बीजाचीहि ॥ १ ॥
ऐसियांचा संग, देई नारायणा
बोलावा वचना, जयाचिया ॥ २ ॥
उत्तम सेवन, सीतळ कंठासी
पुष्ट कांती तैसी, दिसे वरी ॥ ३ ॥
तुका म्हणे तैसे, होईजेते संगे
वास लागे अंगे, चंदनाच्या ॥ ४ ॥

विठ्ठलापाशी मागणे मांडताना श्रीतुकाराममहाराज म्हणतात, 'देवा, मला फळ, वेली व बीज, सर्वच अमृताचे हवे.हे अमृत कसे मिळेल ? ज्यांच्या वचनात ओलावा आहे अशाचा सहवास म्हणजे अमृतच ! चवीला उत्तम, पिण्यास थंड व कांति पुष्ट करणारे असे हे सहवासामृत लाभल्यास, चंदनाच्या वासाप्रमाणे माझ्या अंगांगी हे अमृत भिनून राहील !'

आपण सामान्य जीव. आपल्याला अमृत कोठे मिळेल ?

आपल्या सर्वांच्या भाग्याने असा अमृतकुंभ आपल्या मायबोली मराठीत उपस्थित आहे. श्री. जी. ए. कुलकर्णी यांच्या साहित्याच्या रूपाने आपल्याला नवजीवन देऊ शकणारे शब्दामृत हवे तितके उपलब्ध आहे.

जी. ए. हे मराठी साहित्यामधील एक जादूचे नाव आहे. लेखकांचे लेखक, कथाकारांचे कथाकार म्हणून निर्विवाद मान्यता पावलेले जी. ए. हे एक गूढतम व्यक्तिमत्त्व आहे. साहित्यिक वा सामाजिक हालचालींमध्ये अभावाने दिसणारे जी. ए. एक मनस्वी कलावंत आहेत. ते मितभाषी, त्रयस्थ असे गृहस्थ आहेत; पण असे म्हणावे तर जी. ए. आपल्या परिचितांना पानेच्या पाने भरून विदग्ध पत्रे पाठवतात. त्यांना नवकथाकार म्हणावे तर ते 'दूत'सारखी स्थळकाळातीत अद्भुतकथा लिहून, नवकथेच्या कोडीपलीकडे छलांग मारतात ! (डिसेंबर १९८१ च्या सत्यकथेच्या अंकात, सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. धों. वि. देशपांडे यांनी 'दूत' या कथेचे प्रदीर्घ रसग्रहण केले आहे.) जी. एं. ना प्रा. गंगाधर गाडगीळ 'भोवऱ्यात अडकलेला प्रतिभावंत' म्हणतात. अनेक समीक्षक जी. एं. ना अनेक प्रकारची विशेषणे लावतात; पण जी. ए. या साऱ्या वर्णनांच्या पल्याड आहेत ! 'काजळमाया' या कथासंग्रहाला अकादमी-पुरस्कार जाहीर झाल्यावर, त्याच्या प्रकाशनकालासंबंधी काही वाद निर्माण झाला. जी. एं. नी काय करावे ? त्यांनी सरळ तो पुरस्कारच नाकारला !

असा हा मानधन, मौनी पण मिस्किल माणूस ! झगमगत्या नवरत्नहारासारखी याची शब्दकला. तिने डोळे दिपून गेले नाहीत तर जाणवते त्यांची महासागरासारखी अथांग तत्त्वचिंतकता ! कथांमध्ये घडीव, शिल्पासारखे प्रसंग, पाहता पाहता जिवंत होऊन तुम्हाला झपाटून टाकणारी असंख्य पात्रे. अशा या कथाकारावर लिहायचे काय ? नेतिनेति म्हणायला लावणारे जी. ए. 'एखादे वेळी जेवण म्हणजे अर्थात् कोंबडीचे ! नाही तर बाकीचे जेवण काय आहे आपले 'यज्ञकर्म'' असे म्हणण्याइतके मानुष व रसिक होतात. बरोबरीच्या मुलीची पोलकी ताठ तटतटू लागलेली पाहून त्यांनी सॅन्फोराइज्ड् कापड वापरावे, असा सल्ला देणाऱ्यांची मनसोक्त खिल्ली उडविण्याइतके मिस्किल होतात. हे सारे स्मरूनच मी त्यांच्या कथाविश्वाला माझे बोबडे बोल न्याय देऊ शकतात का, हे पाहण्याचे धाडस करीत आहे.

माझ्यापुरते बोलावयाचे तर जी. एं. ची प्रत्येक कथा हा एक जबरदस्त अनुभव असतो. भटकत भटकत एखाद्या बोगद्यात शिरावे, त्यातील शांत काळोखाने अंगावर शहारा यावा; एकाकी, मूक, स्तब्ध बसलेल्या अनोळखी पाखरांपैकी एखाद्यानेच पंख फडफडवीत बंदिस्त गिरकी घ्यावी आणि चिर्र करून शब्द करावा; कपारीतून पाझरणाऱ्या पाण्याच्या धारांची कुजबुज कानी यावी; एखाद्या तीक्ष्ण किरणाने या धारांचे सप्तरंग झळाळून उठावेत आणि हा थंड अंधार कधी संपणार असे वाटतानाच बोगदा संपून वळणदार वाट सोबतीला लाभावी म्हणजे कसे वाटते ? अगदी तसेच जी. एं. ची कथा वाचताना वाटते. भीती, एकाकीपणा, अनोळखीपणा, सौंदर्याच्या दर्शनाने येणारे गहिरे, पुलकित भाव आणि धीर सुटता सुटता मदतीला येणारी आश्वासकता अशा नोकदार भावनांची उधळण जी. एं. ची कथा वाचताना मनात होते, याबद्दल मला वाटते, कोणाचेही दुमत होणार नाही. त्यांची कथा ही इंग्रजीत ज्याला 'हॅपनिंग' म्हणतात त्या तोलाची असते.

जी. एं. ची प्रत्येक कथा म्हणजे सत्याचा अविरत शोध ! हे सत्य कसे ? जसे कवी डॉम मॉरिस म्हणतात—'ट्रुथ इज नॉट ॲन एक्सॅक्टिटपूड—इट व्हेरीज फ्रॉम पर्सन टू पर्सन !' (सत्य म्हणजे केवळ नेमकेपणा नव्हे. सत्य हे व्यक्तिव्यक्तिगणिक पृथक असते.) जी. ए. शोधतात ती त्यांच्या पात्रांची सत्ये आणि त्यात ते खूपदा यशस्वीही होतात. त्यांची पात्रे तुमच्या—आमच्याइतकी खरी असतात. त्यांना किरकोळ आवडी—निवडी असतात. तसेच जीवनाचे गहन तत्त्वज्ञानही असते. यश असते, अपयश असते, क्षुद्रपणा असतो. काव्यात्मकता असते. संत असते, मिजास असते; एकाकी गुदमरलेपणही असते. नियतीबद्दल अनिवार कुतूहल असते. पापाची दहशत असते आणि मांसाची दुर्बलताही असते. कोणी चार क्षणात आयुष्य भोगून जाते, तर कोणी वर्षानुवर्षे आंधळी वाटचाल करीतच राहते !

जी. एं. च्या शंभरावर कथा मी वाचल्या आहेत. त्या सर्वांत मला सुंदर वाटणारी कथा म्हणजे 'माणूस नावाचा बेटा' ही होय ! 'सत्यकथा' मासिकाच्या ऑगस्ट १९५९ च्या अंकात ही कथा प्रसिद्ध झाली. अडतीस क्राउन साईझ पानांची ही कथा आहे. कथेचा नायक आहे दत्तू जोशी नावाचा इंग्रजीचा स्कॉलर, तत्त्वज्ञानाचा एम. ए. कॉलेजचा पहिला फेलो ! शाळामास्तर !

कथेची सुरुवात होते 'शाळेतला शेवटचा तास सुटायला 'तब्बल' दहा मिनिटे असताना, मुंग्यांच्या रांगेवर दत्तूचा पाय चुकून पडून.'

आणि शेवट होतो ' त्याच्या, झोपेने जडावलेल्या डोळ्यांपुढे शाळेतील मुग्यांची लावलचक रांग दिसत असताना...' चिडलेल्या मुंग्यांभोवती क्षणाची खळबळ, पण पुन्हा काळा ठिपका. पांढरा ठिपका. काळा! पांढरा, काळा—आणि त्या लयीत दत्तूचा दिवस संपतो !

दत्तू त्याच्या आयुष्याला वैतागला आहे. वरवर तुच्छतावादी वाटणारा दत्तू आत, खोल कोठे तरी कवीमनाचा आहे. तो अतिशय संवेदनाशील आहे. अस्सल व हिणकस जोखण्याची त्याची शक्ती अफाट आहे. सारे कळूनसुद्धा, त्याला मद्दडपणाने नको त्या व्यक्तींमध्ये व प्रसंगांमध्ये गुतावे लागते. नेमका उपहास, विखारी उपरोध, निव्वळ विनोद आणि सणसणीत जीवनासक्ती यांच्या सहाय्याने दत्तूच्या मनात, सभोवताली सतत रनिंग कॉमेंटरी चालू असते. जीवनामधील योगायोगासंबंधी त्याला भयचकित अशी निखळ सहसंवेदना आहे. असा हा दत्तू, प्राय:, जी. एं. चेच कथागत रूप आहे. हे विधान अर्थातच तारतम्याने घ्यावयाचे, हे सागायला नकोच !

' स्वतः शाळेत असताना इंजिनियर होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा दत्तू; कुणा गणा—गणपाची पोरे, शालिनी मानेचे वितळत असलेल्या हिऱ्याप्रमाणे डोळे; बर्मिंगहॅमचे कारखाने; भिंतीवर मध्येच चुकचुकणारी पाल आणि वर्गात मागून घेतलेल्या भूगोलाच्या पुस्तकातील मोराचे पीस—या साऱ्यांत काय दुवा आहे कोणास ठाऊक पण शाळेच्या खोलीच्या त्या चार भिंतीच्या बादलीत, त्यांचा एक ढिगारा जमला होता खरा !'

दत्तूला हे कोडे पडते. दहावीच्या वर्गाला शिकवण्यासाठी दत्तूने बालकवीच्या 'औदुंबर' कवितेची सकाळपासून तयारी केली होती; पण ती सारी फुकट गेली. एक पुढारी निधन पावल्याने, त्याच्या दुखवटयाच्या सभेमुळे शब्दांनी सजवून ठेवलेल्या मराठीच्या तासाचा खुर्दा झाला !'

त्यानतर आठवडयाच्या परीक्षेचे पेपर वेळेवर दिले नाहीत म्हणून खुळया कोंबडीचा चेहरा असलेला सुपरवायझर इंगळे उगाचच गुरगुरला. कॉमन रूममध्ये येऊन पुस्तके, डस्टर वगैरे कपाटात फेकून देऊन दत्तूने चारमिनार शिलगावली. तेवढयात शाळेचे तीन लाइफमेंबर आत आले. आज मीटिंग आहे व तिला हजर रहायला पाहिजे; हे दत्तूच्या ध्यानात आले व कुठे तरी दीड-दोन तास निवांतपणे घालवण्याचे त्याचे स्वप्न जागच्या जागी ठार झाले ! पण मीटिंग कॅन्सल झाली आणि दत्तू ताबडतोब शाळेतून निसटला! त्याला प्रथम आठवण झाली ती चहाची ! नकळत खिसा चाचपीत तो बाजूच्या हॉटेलमध्ये शिरला. तेथे त्याला नाईक भेटला. बिचारा फार चागल्या स्वभावाचा, सर्वांना शेंगदाणे द्यायचा, फुकट सिगारेट वाटायचा. गाढवासारखी रमी खेळून पैसे देऊन जायचा ! नाईकला त्याच्या आजारी अल्सेशियन ' किंग 'च्या चिंतेत चूर सोडून दत्तू हॉटेलात शिरला. चहाचे बिल देताना दत्तूने खोटी आणेली उडप्याकडे खपवली. मनात विचार आला, ' काही लाज नाही वाटत ? कपभर चहा पितोस आणि खोटा आणा देतोस ?' दुसरे मन फिस्कारते, ' होय, देतो खोटा आणा ! त्या उडप्याने तरी चागला चहा दिला आहे कशावरून ? मग काय चुकले त्याला बुडवण्यात ? बुडवणार, हज्जारदा बुडवणार !'

मग दत्तू बाहेर पडला. पण कोपरा वळून येतो न येतो तोच थबकला. तेथल्या कट्टयावर एक बाई बसली होती. त्याचे मन चरकले ते तिच्याबरोबर असलेल्या छोटया मुलीकडे पाहून. ती आपल्या आईला चिकटून बसली होती आणि तिच्या मांडीवर डोके ठेवून शांतपणे समोरच्या प्रकाशाकडे, लोकांच्या गर्दीकडे पहात होती. दत्तूला वाटले, मागच्या दिव्यांच्या प्रकाशात अंधारवडावर बसलेले हे दोन पक्षी ? का ? काय ? कसे ? थोडया वेळाने तो रस्त्यावर आला व त्या नेहमीच्या गर्दीत त्याला 'स्वत:पासून सुरक्षित ' वाटले. चौकातल्या पुस्तकांच्या दुकानात आशाळभूतपणे 'पॅटन प्लेस' पुस्तकाकडे दत्तू पहात असताना, खांद्याला अडकवलेली पिशवी हिंदकळत कवियत्री वसंतकुमारी साळे, मांसाच्या हप्त्याहप्त्याने दुकानातून खाली उतरली. कॉलेजमध्ये स्मार्ट दिसणारी वसंतकुमारी व्हराडयातून टकटक सँडल्स वाजवीत चालली की दत्तूसारख्या पोरांच्या मनात आयँबिक पेंटॅमीटरमध्ये, आडपडदा नसलेली इच्छासुनीते उमटायची. ती कशीबशी बी. ए. झाली. तोपर्यंत तिच्या प्रत्येक भागाला स्वायत्तता मिळाल्यामुळे ते मांस मोकाट वाढून बसले.

पिशवीतून आपल्या कवितांचा संग्रह काढून वसंतकुमारीने दत्तूला दाखवला व पुढचे प्लॅन्स सागितले. यानंतर एक चरित्र, एक कादंबरी ! तिच्याविषयी वाटणाऱ्या अनुकंपेमुळेच दत्तू फार चिडला व फाडदिशी तिच्या मुस्कटात द्यावी असे त्याला वाटले. त्याने कसाबसा तिचा निरोप घेतला.

आपल्या तंद्रीत चालताना दत्तूचे पाय नेहमीच्या सरावाने क्लबाच्या रस्त्याला लागले. पुलावरून डाव्याबाजूला वळताना त्याने सरावाप्रमाणे पुलाकडे पाहिले. तो नेहमीचा महारोगी भिकारी तेथे होताच. जवळून जाताना दत्तूने अंग चोरले व स्वतः महारोगी असल्याप्रमाणे तो अगदी दुसऱ्या कडेने चालू लागला. तेवढयातही एक गोष्ट त्याच्या नजरेतून सुटली नाही. त्या भिकाऱ्याच्या बाजूला बसलेली, कराकरा डोके खाजवणारी बाई गरोदर होती !

क्लबमध्ये काही वेळ काढून दत्तू बाहेर आला. ' ह्या, ह्या, नमस्कार !' म्हणत हातात नेहमीची पिशवी घेऊन दाढीवाले केतकर शास्त्री उभे होते. शास्त्रीबुवाचे बोलणे शेवग्याच्या झाडातून डिंक टिपकल्याप्रमाणे सुरु झाले. ते म्हणाले, ' सगळीकडे मांगल्य भरुन राहिले आहे.' शास्त्रीबुवांनी बऱ्याच आडवळणाने दत्तूकडे तीन रुपये मागितले. घरी न राहण्याचे ठरवून त्याने शास्त्रीबुवाना सकाळी आठ वाजता येण्यास सागितले व आपली सुटका करून घेतली. दत्तू घरी आला. मोहनचा हात धरुन त्याला ओढीत आणीत सुधा बाहेर आली. नेहमीचा तक्रारीचा खास अंक तयार होता. त्याने उगाचच वर्तमानपत्र उचलले. ते त्याच्याचप्रमाणे चिंधी होऊन गेले होते. शेजारच्या माधवरावानी ते वाचायला नेले होते म्हणून ते तसे झाले होते.

माधवराव आपल्या अपरोक्ष येऊन जातो ! दत्तू एकदम कावराबावरा झाला. तो उतावीळपणे सुधाला हाक मारणार तोच पदराला हात पुशीत तीच बाहेर आली. दत्तूने तिच्याकडे निरखून पहात विचारले 'दुपारी माधवराव आले होते वाटतं ?'

'तर काय ! दररोज येतात' हात झाडीत सुधा त्रासिकपणे म्हणाली. 'येतात, उगाच तासन् तास बडबडत बसतात.' काय बरे बोलतो इतके ? की सुधा नाटक करीत आहे.

जेवण कोंबून दत्तू अंथरुणावर पडला खरा, पण नजरेसमोरची भुतावळ स्थिरावेना.

'एकाकी मुलीचा चेहरा, बैलाच्या पाठीवरचे आवाळू, भिकारणीचे पोट, बहिणीला लागलेली लाथ, मांडीवर डागलेला डाग,...कोण खुळखुळून टाकते या कवड्या ? का ? कशा ? केव्हा ? कुठे ?'

'आणि या प्रश्नांना जर उत्तरे नाहीत, तर हे प्रश्न तरी नागफण्याप्रमाणे का निष्कारण उभे राहतात ?'

'अनुभवांच्या पायऱ्या चढत चढत वर निळ्या आभाळाच्या छत्रीखाली चिरंतन ज्ञानाचे स्मित घेऊन बुद्धाप्रमाणे रहावे किंवा काहीच समजले नसल्यामुळे सदा हसणारी (केतकरशास्त्र्यांची) छोटी जयू व्हावे. मला रस्त्याकडेचा दगड कर म्हणजे साऱ्या सुखदु:खाची लाट निर्विकारपणे वरून जाऊ देईन किंवा गणपतनानाची चालू क्षणातच जगण्याची धुंदी हवी. मागे प्रेमाने, दु:खाने पहाणे नको ! समोर भविष्यात आशेचा गळ नको. विनतक्रार गाडी ओढणारा बैलदेखील व्हावे; पण हे अर्धवट, दुबळे, माणसाचे आयुष्य नको !'

'साऱ्या प्रश्नाचे या अंधारात कुठे तरी स्विच आहे. ते तरी हाताला लागावे किंवा हे सारे प्रश्न तरी चिरडून टाकावेत. फक्त साधा, जाड कातडीचा, नुसते जठर व मोठे आतडे असलेला प्राणी कर !'

'आपण सारी माणसे ! आपल्या क्षुद्र बुद्धीने या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची घमेंड बाळगणारे. अंगुस्तानाचे रहाटगाडगे करून पॅसिफिक उपसणारे. खेळातील घड्याळाचे काटे फिरवून रेडियोच्या संगीताची वाट पहाणारे. हातावर एखादे झगझगीत नाणे पडते काय याची वाट पहात लाल गुलमोहराखाली बसलेली, आंधळ्या, चाचपडणाऱ्या बोटांची माणसे !'

'दत्तू उगाचच चिडला, अस्वस्थ झाला व त्याने रागाने दिवा घालवला. बराच वेळ तो पोकळ, पेंढा भरलेल्या अंगाने पडून होता. उद्या एक तारीख ! उद्यापासून तो अतिशय हुशार जाधव आणि लीला कामत शिकवणीला येणार–तो खुलला ! स्वत:शीच थोडा हसलाही. मग उद्या ती बालकवींची 'औदुबर' हीच कविता सांगावी. पुन्हा ऐलतटावर, पैलतटावर हिरवाळी घेऊन तो निळासावळा झरा वाहू लागला. चार घराचे गाव चिमुकले जागे झाले. त्या तंद्रीत त्याचे डोळे जडावले.'

'जीवनासक्तीचे धागे इतका वेळ बाजूला उभे राहून सारा खेळ पहात होते, ते पुढे झाले व त्यांनी त्याला गुरफटून टाकले. सुटण्याची इतकी धडपड करूनही पुन्हा उद्यावर विश्वासून तो त्या जाळ्यात अंग आखडून झोपला. जडावलेले डोळे मिटण्यापूर्वी त्याला क्षणभर, शाळेतील मुंग्यांची रांग दिसली. चिडलेल्या मुंग्याभोवती क्षणाची वळवळ; पण पुन्हा काळा ठिपका–पांढरा ठिपका. काळा, पांढरा, काळा आणि त्या लयीत त्याचा दिवस संपला !'

मित्रांनो, 'माणूस नावाचा बेटा' ही कथा येथे संपली !

इतक्या सुंदर पुन:प्रत्ययानंतर काही कोरडे विवेचन करण्यास माझे मन धेत नाही. ते काम सवडीने पुन्हा केव्हा तरी !

जी. एं.च्या 'तुती' या भावसुंदर कथेमध्ये नाना, भाऊ व सुम्मीला म्हणतात, 'कसं असावं ? आमच्या गावची नदी. नदीकाठच्या वांग्यांची भाजी, गाडगंभर घट्ट चुन्यासारखं दही आणि शेतातून तोडून आणलेल्या ताज्या हिरव्या मिरच्या ! या अशी गंमत येते माकडांनो ! या सुगीला जाऊ या हं शेताकडे....'

जी. एं.च्या अमृताच्या फळाची सुगी निरंतर, नित्यनूतन चालू राहावी, हीच माझी आस आहे !

□


## अभ्यासकास उपयुक्त शेतकऱ्यास प्रेरक

"श्री. विजय परुळकर यांनी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्यांवद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्मयात भर टाकणारे आहे."

–प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

# योद्धा शेतकरी

**ले. : विजय परुळकर**

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
किंमत : रुपये छत्तीस

नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पंचरंगी मुखपृष्ठ

फिनिक्स निवड

# PICASSO

His life and work
a classic biography
by Roland Penrose
(Pages 517, £ 2.95, about Rs. 55/–)

आतापर्यंत मला पिकासोचं एकही चित्र कळलेलं नाही; पण आत्तापर्यंत त्याचे नाव अक्षरशः हजारो वेळा वाचण्यात आलं आहे. त्याच्या मृत्यूनंतर अजूनही वाचण्यात येते.

एका मासिकात जर्मेन ग्रिअरची (फीमेल यूनक फेम) मुलाखत वाचली. अगदीच फ्रँक वाटली. ती म्हणते, 'आपली संस्कृती चित्रकलेला अवास्तव महत्त्व देत आहे.' ती पुढे म्हणते कशी, 'आणखी शंभर वर्षांनी बघा. चित्रकलेला तेव्हा तेवढं महत्त्व नसेल. मला पॅब्लो पिकासोचा ग्रेटनेस वगैरे मान्य नाही.' मला मात्र या बाईचा ग्रेटनेस मान्य आहे! कारण तिचं म्हणणं पटतं.

पण नंतर विचार येतो, हे जग पिकासोला खांद्यावर घेऊन इतकं का नाचलं? आपल्याला काही तरी कळत नसावं खास. सर्वच गोष्टी सर्वांना कधी कळल्यात? आपल्याला कळत नाही म्हणून तो ग्रेट नसेल, हा समज काढून टाकावा. त्याची पुस्तके वाचावी. त्याचे चरित्र वाचावे. मी त्याचे पुस्तक नेहमी दुकानात बघत असे; पण काय, महाराष्ट्रात पुस्तकाच्या बाबतीत सारे ढप्प! श्री. गोविंद तळवलकरांचा 'विकली'मधला लेख वाचला! 'रोमँटिक' नावाखाली! 'Decline and fall of Maharashtra' हे त्या लेखाचे नाव. महाराष्ट्रातील इतर शहरांचे सोडा, पण खुद्द मुंबईत चांगलं म्हणावं असं एकही पुस्तकाचं दुकान नाही, असं तळवलकर म्हणतात. प्रभाकर पाध्यांचा 'सोबत' (दिवाळी)मधील लेख वाचला. विचारवंताचे हाल वगैरे. आपल्या लोकांनी सांगितलं की पटतं. चांगली इंग्रजी पुस्तकं गोळा करणं हे खरंच अवघड आहे!

पिकासोचा क्युबीझम हा एक अजब प्रकार आहे. अर्धं जाग्या किंवा अर्धं झोपेच्या ट्वायूलाइट झोनमध्ये कदाचित असं क्युबीझम सापडेल. कदाचित अती जर्जर झालेल्या मनात ते सापडेल. कदाचित अती आजारी माणसांना ते कळेल. तुमचा उजवा साईडफेस डाव्या प्रोफाइलपेक्षा मोठा आहे का? तुमचा एक हात तुमच्याच शरीराला अजगरासारखा विळखा घालतो असं तुम्हाला सतत वाटतं काय?

......तर मग तुम्हाला मॉडर्न आर्ट कळेल.

......तुमचं अस्तित्व सररीॲलिस्टिक नाइटमेअर आहे का?

......तर कदाचित तुम्हाला मॉडर्न आर्ट कळेल!

आणि कदाचित अती अफाट कल्पनाशक्ती असलेल्यांना ते कळत असेल! धंदेवाईक पेटर्सना ते कळत असेल. कलेच्या शौकिनांना ती कितपत कळते?

एक गोष्ट मात्र निश्चित. माझ्या भिंतीवर मी पिकासोचं चित्र लावणार नाही. हे पुस्तक वाचूनही. व्हॅन गॉग, सेझॉन, रेंब्रा, तुलू लोट्रेक वगैरेंची चित्रं लावणार नाही. व्हॅन गॉगचं 'सनफ्लॉवर' लावलं तर घेरी येईल! त्याचं 'व्हीट फील्ड' लावलं तर मूर्च्छा येईल! मी, आपलं एक गुलाबाचं भलं मोठं फूल (दवाच्या थेंबांसकट) लावून ठेवलं आहे; पण त्यानंही माझं TM वगैरे रुळावर येत नाही!

असं म्हणतात की, पेंटिंग ही एक टू डायमेन्शनल दृक्‌भाषा आहे. मग कोणतीही भाषा न शिकता येते का? चायनीज की जपानीज ही चित्रांचीच भाषा आहे ना? म्हणून तर सामान्य जनांना यातलं काही कळत नसेल.

पण टू डायमेन्शनल भाषेची गोडी लावणार कोण? ('माणूस'मधील मुंबई वार्ताकार ललिता बर्वेनी अधिक प्रयत्न करावे.) ती फक्त पेटिंगचं टेक्निक शिकणाऱ्यांनाच कळते का? आणि इतर लोक स्नॉबरी म्हणून त्याचा एवढा ऊहापोह करतात का?

वर्तुळ हे दोन डायमेन्शनमधे काढलेलं असतं; पण ती असते वन-डायमेन्शनल गोलाकार आकृती (चेंडूसारखी). ही दोन डायमेन्शनमधे असते. लोलक हा तीन डायमेन्शनचा असतो. क्यूब म्हणजे सहा समान चौरस बाजू असलेली वस्तू–शुगर क्युब्ज, फासे वगैरे. अनभिज्ञ माणसाना पीकासोचा क्युबीझम हा 'शुगर क्युबीझम' खास वाटणार नाही!

टॅम्पॉरा, फ्रॅस्को, ऑइल वॉटर-कलर, शाई, गॉश, एनकॉस्टिक, कॅसीन, सिंथेटिक, मिडियम्स, मिक्स्ड मिडियम्स, ही पेंटिंगची मिडियम्स. म्युरल्स, ईझल व पॅनेल पेन्टिंग, मिनिएचर पेंटिंग, मॅन्युस्क्रिप्ट इलस्ट्रेशन, स्क्रॉल पेटिंग, स्क्रीन पेन्टिंग, पॅनोरामाज, मॉडर्न फॉर्म्स, सिंबॉलिझम हे झाले पेंटिंगचे फॉर्म्स.

आहे ही 2–D दृक्‌भाषा शिकण्याची कुवत? या जन्मी तरी सोडून द्या नाद!

एकदा 'ग्वार्निका'समोर कित्येक मिनिटं डोळे ताणून बसलो; पण डोक्यात प्रकाश पडेल तर शपथ! 'ग्वार्निका' चाकं असलेल्या पेटाऱ्यात भरून चार लोक हालवत आहेत, असं चित्र पाहिलं होतं. तेव्हा या चित्राच्या प्रचंड आकारानंच भारावून गेलो होतो! फ्रँकोने पिकासोला स्पेनबाहेर हाकलून लावलं हे सर्वविदित आहेच. स्पेनचं १९३६चं यादवी युद्ध हे ग्वार्निकाचं जनक होतं. असं म्हटलं जातं की, युद्धाचे दुष्परिणाम या मास्टरपीसमध्ये चित्रित केले आहेत. हिटलर फ्रँकोधार्जिणा होता. त्याने फ्रँकोला आधुनिक विमानं देऊन ग्वार्निका या शहरावर डाइव्ह् बॉंबरचा आधी प्रयोग केला.

विसाव्या शतकातला सर्वांत मोठा कलावंत, अशी पिकासोची ख्याती आहे. आर्किटेक्चर, थिएटर डिझाइन, पोस्टर डिझाइन, मॉडर्न लिव्हिंग, सिरॅमिक्स, प्रिंट मेकिंग, स्कल्पटर अशा विविध कलांना त्यांनी हात लावला. त्यांच्या कलेस एक प्रकारचा जंगलीपणा आहे, संस्कृतीच्या आदिकालातील काही तरी आहे, विद्येचे पुनरुज्जीवन होण्याअगोदरचा मसाला आहे. पिकासोचा हाफ चड्डीवाला (RSSशी संबंध नसलेला) फोटो पाहिला की, मुल्कराजची आठवण येते. १२-८-१९७३च्या 'इलस्ट्रेटेड विकली'मधील मुल्कराज आनंद याचे खंडाळा येथील ड्यूक ऑफ वेलिंग्टनच्या आसपास असलेल्या त्यांच्या घराजवळ काढलेले फोटो थोडेसे पिकासोसारखे वाटतात. छातीवर पांढरे केस, तोकडी हाफ पँट, दंड वगैरे साम्य स्ट्रायकिंग वाटलंय तुम्हाला? इथे पण विद्येच्या पुनरुज्जीवनाचा प्रकार आहे की काय? त्याचं व्यक्तिमत्त्वही तसंच होतं

हेही सर्वांना माहीत आहेच. त्याच्या एका मित्राने पिकासो – 'A Volcano in continuous eruption ' असं म्हटलं होतं. २६ वर्षांचा असताना जॉर्जेस ब्रॅक याच्या सहकार्याने तो क्युबीझमचा जनक बनला आणि एकदम प्रकाशझोतात आला.

१९०७ ते १९१४ या काळात क्युबीझम जन्माला आले. त्याचा मुख्य आद्यप्रणेता सेझान हा होता. वस्तु आपल्याला दिसतात तशा त्या चित्रित न करता त्याचे अॅनॅलिसिस करून एक किंवा अनेक प्रणालीच्या स्तरावर त्या माडल्या जातात. हा एक चित्रकलेचा नवा आविष्कार व चित्रकलेच्या इतिहासातील 'कोसला !' क्यूब्ज व इतर भूमितीच्या 'फॉर्मस्'ची एक अमूर्त मांडणी, असंही थोडक्यात क्युबीझमचे वर्णन करता येईल. म्हणूनच उजव्या व डाव्या प्रोफाइल्समधील फरक !

दोन महत्वाचे मुद्दे असे आहेत की : (१) क्युबीझमच्या पहिल्या टप्प्याला पॉल सेझानमुळे गती मिळाली. (२) दुसरं म्हणजे पुष्कळ लोकांच्या मनात क्युबिझमचा जनक म्हणजे फक्त पिकासोच आहे,असं होतं व आहे. चूक. जॉर्जेस ब्रॅक यानेसुद्धा क्युबिझमला चांगलाच हातभार लावला होता. चित्रकलेची एक परंपरागत व्याख्या म्हणजे निसर्गाचं प्रतिबिंबित चित्रण करणं. ही साधीच कला बहुतेकांना समजते व आवडते. या परंपरेला क्युबिझमने धक्का दिला व एका न चोखाळलेल्या मार्गानेच ते वाटचाल करायला लागले. आपण ज्याला 'प्रिझम' (prism) किंवा त्रिकोणाकृती भिंग वा घन वा लोलक म्हणतो त्यातून प्रकाशाचं पृथक्करण होतं, तसंच क्युबिझम चित्रकलेचं पृथक्करण करतं किंवा एका विशिष्ट पृथक्करणाच्या मालिकेत क्युबिझम सामावलेलं असतं असही म्हणता येईल.

फर्नांड लीजर, रॉबर्ट डेलने, ज्युआ ग्री, रॉजर द ला फ्रॅस्नाये, मार्सेल ड्युकॅप, अल्बर्ट ग्लाझीस व ज्या मेटझीजर वगैरे अनेक कलाकारानी पुढे क्युबिझम अंगिकारली व विस्तारली. ती १९२० साली आर्किटेक्ट (चंदीगढवाले !) ली कार्बूझीयरने आपल्या व्यवसायात आणली. (Cubist aesthetic)

फ्रान्स्वा जीलो या बाईने पिकोसावर १९६४ मध्ये एक पुस्तक लिहिलं होतं. 'Life with Picasso' असं त्या पुस्तकाचं नाव हे [illegible] त्याच्या एका अमेरिकन पत्रकाराच्या सहाय्याने तिने हे पुस्तक लिहिलं. पिकासोच्या हृदयावर चऱ्हे पडणं हा एक तसा चमत्कारिक प्रकार म्हणावा लागेल. सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर त्याला एक Out and out extrovert च म्हणावा लागेल. या पुस्तकाने पिकासो थोडा का होईना, पण खचला खरा ! फ्रान्स्वा जीलोंने या पुस्तकात पिकासोच्या अहंगंडावर तोफ डागली आहे.

अहंगंडाविषयी अनेक गैरसमज प्रचलित आहेत. मी इतरांपेक्षा वेगळं करून दाखवीन, या जिद्दीमागे मी इतरांपेक्षा वेगळा आहे, ही भावना असावी लागते. 'Whatever worthwhile there is in the world, has been accomplished by egoism या विधानात बरंच सत्य आहे. गॅलब्रेथ पण नव्हते का म्हणाले, 'Modesty is a vastly overrated virtue !' तात्पर्य म्हणजे, जिथे जिथे ओरिजनॅलिटी आहे, जिथे जिथे मीडिऑक्रिटी नाही, जिथे जिथे सर्जन करण्याची कुवत आहे, तिथे तिथे ईगो कमी-अधिक प्रमाणात असणारच. पिकासोसारख्या जिनियस माणसाच्या इगोवर ऊहापोह करणं अगदी व्यर्थ वाटतं.

आन्द्रे मालरॉ व पिकासो याची सारखी खडाजंगी होत असे !

मॉडर्न आर्टचं चित्र उलटं लावलं काय, साईडला लावलं काय किंवा सुलटं लावलं काय, सारखंच दिसतं, असं म्हणणारे पुष्कळ लोक आहेत. त्यांचा त्यात दोष नाही. हे पुस्तक वाचून मला मॉडर्न आर्टबद्दल वाटणारा उपहास दूर झाला. मॉडर्न आर्ट आपल्याला कळत नाही. त्याबद्दल आपण कुठेतरी कमी पडत आहोत ही भावना पण नाहीशी झाली. ग्रीक आणि लॅटिन तुम्हाला शिकल्याशिवाय कसे येणार ?

–जे. एन. पोंडा

मार्क्सवादी पक्ष : पृष्ठ ४ वरून


ठेवता आली असती. रशिया व चीनपासून सारख्या अंतरावर राहण्याच्या धोरणाने आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत आपणास कोणी मित्र नाहीत, आपण एकाकी पडतो, असे वाटल्याने मार्क्सवाद्यानी हा बदल केला असणे शक्य आहे. रशियाला पाठिंबा देण्याची भूमिका मार्क्सवाद्यांनी घेतली असली तरी रशिया अजून मार्क्सवादी पक्षास आपला मित्रपक्ष मानण्यास तयार नाही. मार्क्सवाद्याच्या कॉंग्रेसला रशियन कम्युनिस्ट पक्षाचा कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हता!

राजकीय ठरावातील भूमिकेबाबत पश्चिम बंगालच्या नेत्याचे काही मतभेद होते. परिषदेसाठी राजकीय ठरावाचा एक वेगळा मसुदा त्यांनी पाठविला होता; पण अखेर मूळचा मसुदाच काही किरकोळ फेरफारासह कॉंग्रेसने मंजूर केला. जनता सरकारला जुलै १९७९ मध्ये मार्क्सवाद्यांनी पाठिंबा काढून घेण्यात चूक झाली, हे पक्षाने कबूल करायला हवे का ? हा प्रश्न गेले काही महिने पक्षात वादाचा विषय झालेला होता; पण राजकीय ठरावात त्याचा काही उल्लेख केलेला नाही; पण वस्तुनिष्ठ आत्मटीकेचे दृष्टीने तो उल्लेख हवा होता. चरणसिंगानी जनता पक्षात फूट पाडली आणि मार्क्सवाद्यानी पाठिंबा काढून घेतला, त्यामुळे मोरारजीचे सरकार गडगडले व इंदिरा गांधीना सत्तेवर परत येण्याची संधी मिळाली, हे तर खरेच आहे. मोरारजी-सरकारमध्ये कितीही दोष असले तरी पण इंदिरा *गांधीच्या एकाधिकारशाहीपेक्षा* ते बरे म्हणून ते टिकविले पाहिजे. सरकार पाडण्यास आम्ही तुम्हाला पाठिंबा देणार नाही, असे मार्क्सवाद्यानी चरणसिंगाना सांगितले असते तर त्यांनाही आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा लागला असता. इतिहासाचा एक धडा म्हणूनच *या गोष्टीकडे आता पहावयाचे* व भावी काळात त्या चुका टाळावयाच्या.

विरोधी पक्षाचे ऐक्य, विलीनीकरण याबाबतच्या हालचालीना पुन्हा वेग आला आहे. डाव्या व लोकशाहीवादी पक्षाची आघाडी उभारण्याचे मार्क्सवाद्याचे धोरण आहे. कम्युनिस्टांशी त्याचे मतभेद कमी झाले असून पक्षाचे विलिनीकरण होण्याचीही शक्यता आहे. डाव्या व लोकशाहीवादी पक्षाची आघाडी पुन्हा उभी राहीलही; पण पूर्वीच्या आघाड्या का भंगल्या, त्यापासून धडा घेऊन त्या चुका सुधारल्याच पाहिजेत! इंदिरा कॉंग्रेसला एकच प्रभावी पक्ष निर्माण होत नाही तोपर्यंत संयुक्त आघाडीशिवाय पर्याय नाही. आघाडीचा फायदा केवळ आपल्या पक्षाचे बळ वाढविण्यासाठी करावयाचा नाही. मतभेदापेक्षा मतैक्याच्या मुद्द्यावरच भर द्यावयाचा, ही पथ्ये पाळल्यानेच आघाड्या यशस्वी होऊ शकतील ! □

# महानगर

## पिंपरी-चिंचवड विशेषांक



मोरया गोसावींचे चिंचवड गाव.

पंचवीस । तीस वर्षांपूर्वी फक्त धार्मिक चेहरा-मोहरा असलेले पुण्याजवळचे एक खेडे. एककेंद्री, एकमार्गी जीवन. देवस्थानच्या अवतीभवती उभे राहिलेले;

पण आज ते एक महानगर झालेले आहे. म्हणजेच येथील माणसांचे जीवन बहुकेंद्री होत आहे.

एककेंद्री धार्मिक गावापासून बहुकेंद्री महानगरापर्यंत ही वाढ कसकशी होत गेली ?

शे-पाचशे वस्तीच्या या गावात आता हजारो कामगारांनी गर्दी केलेली आहे. झोपडपट्ट्यांची दाटी रोज वाढत आहे.

त्यांचे प्रश्न कोणते ?

कामगार आले म्हणजे कारखानदार आलेच !


लहान किंवा मोठे. त्यांच्या अडचणी कोणत्या ?

खेडेगावाचे महानगरात रूपांतर होत असताना येथील सर्वसामान्य माणसावर कुठले ताण पडले ?

त्याच्या मनोभूमिकेत बदल झाले का ?

महानगर संस्कृतीची वैशिष्टचे कोणती ? या संस्कृतीतला माणूस कसा असतो ?

कोणत्या समस्यांना त्याला सामोरे जावे लागते ?



साहित्यात, चित्रपटात, सामाजिक क्षेत्रात
या महानगरीय संस्कृतीतल्या माणसांची
चित्रे-चरित्रे कशी शब्दांकित होतात ?
कारखानदार-कामगार नेते,
राजकीय कार्यकर्ते, समाजसेवक,
साहित्यिक-पत्रकार,
विचारवंत-सर्वसामान्य नागरिक
या सर्वांचा सहभाग असलेला

# माणूस

## महानगर पिंपरी-चिंचवड विशेषांक

या विशेषांकानिमित्त
' माणूस ' साप्ताहिकाचे
यापुढील दोन आठवड्यांचे
अंक प्रसिद्ध होणार नाहीत.

**विशेषांक प्रसिद्धी : फेब्रुवारी तिसरा आठवडा**

## याशिवाय



जनआरण्य, सीमाबद्ध, कोरस, कलकत्ता-७१,
घरौंदा, चक्र, गमन, अल्बर्ट पिंटो को गुस्सा
क्यों आता है........
महानगरात घुसमटणारी
तरीही जगणारी, जगायला आलेली
माणसं चित्रित करणारे हे मोजके चित्रपट.
या चित्रपटांतून
सत्यजित रे, मृणाल सेन, के. अे. अब्बास,
मुझफ्फरअली, सईद मिर्झा यांसारख्या
प्रतिभाशाली दिग्दर्शकांनी चित्रित केलेल्या
महानगरीय जनजीवनाचा परिचय करून
देणारा खास सचित्र लेख !

# फिल्मोत्सव '८२ – धावता आलेख

## राजा पोखरापूरकर

तसं बघितलं तर कलकत्ता हे शहर फक्त दोनच गोष्टींसाठी प्रसिद्ध. एक म्हणजे रसोगुल्ला आणि दुसरी गोष्ट म्हणजे 'रे'. पण या वर्षी इथे आंतरराष्ट्रीय फिल्मोत्सवानं आगळीच बहार आणली. थंडीचा मोसम म्हणजे कलकत्त्यातील निरनिराळ्या उत्सवांचा मौसम. या वर्षी तर पुस्तकं, संगीत, क्रिकेट यांनी उत्साहाला नुसता ऊत आला होता.

खरं म्हणजे फिल्मोत्सव प्रत्यक्ष चालू होईपर्यंत कोणालाच नीटशी कल्पना नव्हती. कोणते चित्रपट दाखविले जाणार आहेत, कोण प्रतिनिधी–पाहुणे येणार आहेत, असं कुतूहल सर्वत्र होतं. अशा अस्ताव्यस्त पसरलेल्या वातावरणातसुद्धा फिल्मोत्सवाचं आकर्षण कलकत्त्याच्या 'बाबू मोशाय'ना पूर्वीपासूनच होतं. हो, या चित्रपटांच्या काही जागा 'पब्लिक' म्हणजे सामान्य प्रेक्षकांसाठी ठेवल्या होत्या. त्याचं बुकिंग खरं सुरू झालं ते ३० डिसेंबरपासूनच. सकाळी सात वाजल्यापासून लोक रांगेत ताटकळत उभे राहिलेले आढळले. अर्थात त्यातील प्रत्येकाला आपणास बराच वेळ उभं राहावं लागणार आहे, याची कल्पना होतीच पण त्याबरोबरच बऱ्याच जणांकडे तिकीट लवकर मिळावं म्हणून आणलेल्या वशिल्याच्या, सॉरी, ओळखीच्या चिठ्ठ्याही होत्याच ! बाकी काहीही म्हणा, साधारण मवाली दिसणारा पोरगा आणि उफाड्याची मुलगी जर शाल पांघरून रांगेत उभी राहिलेली आढळली, तर इतकी सभ्य दिसायची की सोयच नाही ! हो, तुम्ही बाकी काहीही विसरलात तरी हरकत नाही, पण शाल विसरू नका. शालीचा उपयोग थंडीसाठी न होता (कारण थंडी अशी नव्हतीच म्हणा) फक्त घरंदाजपणा दाखवण्यासाठी होतो, हे मात्र निश्चितच आढळून आलं. अर्थात ही सर्व धडपड फिल्मोत्सव '८२ च्या चित्रपटांची तिकिटं मिळविण्यासाठी. तसं पाहिलं तर दहा वाजता तिकिटविक्री सुरू झाली आणि ११ वाजता खिडकी बंद पण झाली. तरीही तिकीट न मिळालेल्या प्रत्येकाला वाटत होतं की, त्याचा चान्स अगदी थोडक्यात हुकला !

स्पॅनिश चित्रपट 'ब्लड वेडिंग'चा विख्यात दिग्दर्शक कारलास साऊरा यांच्या हस्ते फिल्मोत्सव '८२ चं उद्घाटन होणार होतं, पण ते येऊ शकले नाहीत. अर्थात त्यामुळं निराशा पदरी आली ती फक्त फिल्मोत्सवाच्या कार्यकर्त्यांच्याच. इतरांना त्याचं विशेष काही वाटलं नसावं. म्हणून प. बंगालचे गव्हर्नर बी. डी. पांडे यांनी उद्घाटन करायचं ठरलं आणि अध्यक्षपदी केन्द्रीय नभोवाणीमंत्री श्री. वसंतराव साठे बसले. या समारंभाला राज्याचे मुख्यमंत्री ज्योती बसू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तीन जानेवारीला झालेल्या या समारंभाच्या आधी आलेल्या डेलिगेटस्‌ना कार्यक्रम कोणते आहेत, केव्हा आहेत हे अजून नक्की कळलं नव्हतं पण रवींद्र सदनच्या जवळच असलेल्या आलिशान पत्रकार कक्षात मात्र सर्व माहिती व्यवस्थित होती. एकंदरीत या वेळेस पत्रकारांना एखाद्या लाडक्या अपत्याची वागणूक दिली गेली. कदाचित डेलिगेट आणि वार्ताहर अशा दोन वेगवेगळ्या तथाकथित जाती निर्माण केल्या असल्यानं असं झालं असावं. पत्रकार–परिषदा 'शिशिरमंच'मध्ये घेण्यात आल्या. किंबहुना ४० टक्के उत्तम चित्रपट आणि ६० टक्के उत्तम 'पत्रकार परिषदा' असंच या सोहळ्याचे गणित बनले होते.

रवींद्रसदन, ग्लोब, मेट्रो, इलाइट, नवीना पॅरडाइज, सोसायटी, न्यू एम्पायर, सरला मेमोरेयल हॉल या ठिकाणी एकदमच चित्रपट दाखवले जात. 'सोसायटी' या चित्रपटगृहात विदेशी चित्रपटातील 'गोदार्द' रोलमाझ गुने आणि मिर्काआॅस जान्स्को यांचे चित्रपट दाखवण्यात आले, तर न्यू एम्पायरमध्ये जुने गाजलेले व नवीन भारतीय चित्रपट दाखविण्याची व्यवस्था केलेली होती. या वर्षी सरला रे मेमोरियल हॉलमध्ये खास १६ एम. एम. चित्रपट दाखवण्यात आले.

कायद्याचा अभ्यास करून नंतर चित्रपटव्यवसायात पडलेला जान्स्को हा दिग्दर्शक प्रथम पुढे आला तो त्याच्या 'राउंड-अप'मुळं. अर्थात मला तर जान्स्कोच्या कोणत्याही चित्रपटातून त्याला नेमकं काय सांगायचं होतं हे स्पष्टपणे कळलंच नाही. किंबहुना, त्याच्या प्रत्येक चित्रपटात थोडीशी विषयक्लिष्टता असली, तसंच काही गोष्टींची, तत्त्वांची इथं मिसळ झालेली असली तरी तो एक अत्युत्कृष्ट दिग्दर्शक आहे, एवढं मात्र ठामपणे वाटलं. 'टायरंटस् हार्ट' या चित्रपटात त्याने वापरलेलं गाणं एक संदेशवहनाचं माध्यम म्हणून असल्याचं लक्षात येतं. १३ व्या–१४ व्या शतकातलं हे हंगेरियन गाणं बासरीसारख्या वाद्यावर स्पष्ट करण, या कल्पकतेचं कौतुक करावंसं वाटतं. अर्थात अशा गाण्याचा भावार्थ लक्षात घेऊनच त्याची मजा लुटता येते. मग अशा वेळी त्याचं भाषांतर करणारी 'सब–टायटल्स' किती तोकडी असतात हे लक्षात येतं. चित्रपटाद्वारे सत्याचा शोध घेणारा दिग्दर्शक म्हणून जान्स्कोकडे बघता येऊ शकेल. स्वतः जान्स्कोला मात्र चित्रपट म्हणजे कला आहे, असं वाटत नाही.

### संगीत-नृत्यमय शोकांतिका

'ब्लड वेडिंग' हा कारलास साउरा दिग्दर्शित (स्पेन) एक वाखाणण्याजोगा चित्रपट होता. फेडरीक लोरकाच्या नाटकावर आधारलेल्या बॅले नृत्यावरील हा चित्रपट म्हणजे एक शोकांतिकाच आहे. एक लग्न झालेलं जोडपं आणि त्याच्या लग्नाच्या पार्टीच्या वेळी वधूचा पूर्वीचा प्रियकर येतो. अर्थात त्याचंही लग्न झालेलं असतं, पण लग्नापूर्वीची प्रेयसी भेटते म्हणून तो तिच्याबरोबर नाचायला जातो, पण ते तिच्या नवऱ्याला सहन होत नाही; म्हणून त्या दोघांची जीवघेणी मारामारी आणि त्यातच दोघांचाही अंत ! अर्थात यात दिसणारं बॅले नृत्याचं कौशल्य, चेहऱ्यावरचे हावभाव, आणि जोडीला असणारं संगीत म्हणजे डोळ्यांना जवळजवळ ७२ मिनिटांची मेज-

वानीच ! संपूर्ण फिल्मोत्सवामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रॉपर्टीचे स्तोम न माजवता रिकाम्या स्टूडीओत फक्त नट, दिग्दर्शक आणि छाया चित्रकार यांचीच सांगड घालणारी कलाकृती असं या चित्रपटाबद्दल म्हणता येईल.

## छोटा विषय—सखोल मांडणी

फिल्मोत्सवामध्ये साधारणपणे अश्लील चित्रपट जास्त असतात, असा एक समज प्रेक्षकांमध्ये पसरलेला असतो. त्याला योग्य असा चित्रपट म्हणून 'अनिमा' चित्रपटाकडे बोट दाखवता येईल. अर्थात या चित्रपटाचं कौतुक करण्याचं कारण म्हणजे, यात वापरलेली कलात्मक दृष्यं. कोणतीही कठीण संवेदना दृष्यस्वरूपात सादर करणं हे दिग्दर्शकासमोर एक आव्हानच असतं 'अनिमा'मध्ये प्रत्येक पुरुषाला स्त्री हवी असते, पण ती वेगवेगळया रूपात हवी असते. पुरूषाच्या दृष्टीकोनातून पूर्ण स्त्री कोणती, याच्या कल्पनाही वेगवेगळया असू शकतात. अर्थात प्रत्येकाची 'पूर्ण स्त्री'ची कल्पना साकार होत असताना त्याला ती देवी, वेश्या, माता पवित्रता, मांत्रिक आणि दुर्दैवी, जीव अशा अनेक वेगवेगळया स्वरूपात दिसू शकते. एका तरुणाचं मन या निरनिराळया मानसिक स्थित्यंतरातून जात असताना स्त्रीच्या आजूबाजूच्या परिस्थितीनुरूप ती शृंगारिकतेपासून औद्योगिक जाणीवेपर्यंत कशी बदलत जाऊ शकते, याचं चित्रिकरण केलेलं आहे. अविवाहित तरुण मन जर रामासारखं मानल तर १८३० मधील तारुण्यावस्था आणि १९२० मधील तारुण्यावस्था यात आढळणारी एकाकीपणाची भावना यात दाखविली आहे; यात एक मन शोकांतिका व्यक्त करत, तर दुसरं विकास-सकल्पनाच्या मागे धावतं. जवळजवळ ८५ मिनिटाच्या या चित्रपटात दिग्दर्शकानं किती सखोल विचार केलेला आहे, हे दिसून येते. संपूर्ण चित्रपटात संवाद म्हणून फार तर चार-पाचच वाक्यं असतील. मानवी मनावरचा स्त्रीचा पगडा आणि आजूबाजूच्या स्थित्यतराचा त्यावरील परिणाम परिणामकारकरित्या दृश्य केलेला आहे.

पण संपूर्ण चित्रपट पाहिल्यानंतर शेवटी कुठे तरी मूळ दिग्दर्शक विषयापासून दूर गेल्याचं जाणवतं. तरीही टायटस लिबेर या ऑस्ट्रियन दिग्दर्शकाचा हा चित्रपट आवर्जून निश्चितपणे पाहण्यासारखा आहे. एखादा छोटासा विषय घेऊन त्यावर किती सखोल विचार करता येतो आणि चित्रपटातून तो विषय किती समर्थपणे मांडता येतो याचा एक नमुना म्हणजेच 'अनिमा फॅन्टास्टिक सिंफनी'. तंत्रकौशल्यात हा चित्रपट त्या मानाने बराच उजवा म्हणता येईल. पण ८५ मिनिटं नुसता रंगीत-चित्राचा खेळ पाहिल्यानंतर या चित्रपटाचा मनावर कितपत परिणाम होईल, याची शंकाच आहे.

याबरोबर बेल्जियमच्या ह्यूगो क्लाऊस यांनी दिग्दर्शित केलेला 'फ्रायडे' हा एक लक्षात राहण्यासारखा चित्रपट. आपल्या मुलीबरोबर अतिप्रसंग केल्यामुळे दोन वर्षं तुरुंगवास मिळालेल्या जॉर्जची अनपेक्षितपणे सुटका होते आणि घरी परतताना त्याला बाहेरचं जग पूर्णपणे बदललेलं आढळते. धास्ती घेतलेला जॉर्ज जेव्हा पत्नीला (जेनी) भेटतो तेव्हासुद्धा त्याच्या पदरी निराशाच येते. तो तुरुंगात असताना इकडे त्याच्या पत्नीने दुसऱ्याशी (इरीक) संधान बाघलेलं असतं. त्याचे आणि तिचे संबंध बरेच पुढे गेलेले असतात. अर्थात हा मानसिक धक्का पचवतानाचं जॉर्जचं कसब प्रत्यक्ष पडद्यावर पाहणं उत्कृष्ट ठरतं. साहजिकच जॉर्ज आणि जेनी यांच्यातील पती-पत्नीचे संबंध फक्त नावालाच उरलेले असतात. हे संबंध तोडण्याचा प्रयत्न जॉर्ज करतो, पण त्याला तेही जमत नाही. त्याचं जेनीवर खरं प्रेम असतं. या भावनिक कल्लोळात शेवटी जॉर्जच तोडगा काढतो. तो असं सुचवितो की, इरीक आणि जेनी यांनी शेवटची एक रात्र एकत्र काढावी. यावर त्या दोघांचाही प्रथम विश्वास बसत नाही, पण जॉर्ज त्याना समजावून सांगतो. इरीक आणि जेनी रात्र एकमेकाच्या सान्नीध्यात घालवत असताना जॉर्ज संपूर्ण रात्र बाहेर फिरून काढतो. परत आल्यावर तो इरीक आणि जेनीनी काय मजा केली, हे खोदून खोदून विचारतो, पण दोघंही उत्तर देत नाहीत. इरीक परत जातो. जॉर्ज आणि जेनी आपल्या ससाराचे तुटलेले धागे जोडण्याचा प्रयत्न सुरू करतात. जवळजवळ ९० मिनिटांच्या या प्रदीर्घ चित्रपटात कुठेही कंटाळा येत नाही, हे त्याचं मुख्य वैशिष्ट्य. साधारण गुन्हेगारी प्रकृतीचा माणूस तुरुंगवासातून परत आल्यानंतर स्त्रीच्या भावनाचा इतक्या त्रयस्थपणाने विचार करू शकतो, म्हणजेच तुरुंगवास नवीन माणूस घडवू शकतो, हे दाखविण्याचा एक प्रयत्न ! फ्रँक ॲर्डनबुमने साकार केलेला जॉर्ज दाद घेऊन जातो. अशा प्रकारच्या समस्यांची विश्लेषणात्मक उकल पडदयावर आकर्षकपणं मांडली आहे ! 'बर्लिन फेस्टीवल'मध्येही हा चित्रपट दाखविला गेला होता.

## व्रात्य मुलांची समस्या

याबरोबरच 'पिक्झोट' नावाचा चित्रपट मनावर ठसा उमटवणारा होता. ब्राझीलमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाला हेक्टर बॅबेनिकोचं दिग्दर्शन लाभलं होतं. पाच लहान व्रात्य मुलं साउ पाऊलो या ठिकाणी पाठविण्यात येतात. (आपल्याकडे आपण या मुलांना 'बालगुन्हेगार' असे संबोधन देऊन टाकतो; पण प्रत्यक्षात लहान मूल हे खऱ्या अर्थानं गुन्हेगार होऊच शकत नाही, या कल्पनेतून त्यांना व्रात्य म्हटलं.) हा चित्रपट म्हणजे या 'व्रात्य' मुलांचीच गोष्ट. वास्तवतेवर आधारलेला हा चित्रपट मनोरंजक ठरला, तो त्याचं चित्रण करण्याच्या खुबीमुळं. सदैव गुन्हेगारी वातावरणात वावरणाऱ्या मुलांच्या मनावर आणि वर्तनावर काय परिणाम होतात, हे इथं अजिबात अतिरंजित न करता मांडलं आहे. या मुलाना भोगावे लागणारे अन्याय, अपमान आणि म्हणून जगाकडे तिरस्काराने पहायला लावणारी त्याची मनोवृत्ती इथं दिसते. आठ वर्षांचा मुलगा आपापसातील भांडणातून शातपणे एकाच्या पोटात चाकू खुपसतो आणि घाबरून पळून जातो. मग राहिलेले चौघेजण पिक्झोट, डीटो, लिलीका आणि चिको शहरातच गुप्तपणे राहता येईल अशी जागा शोधतात. इथे त्यांचा अमली औषधं, चोरी आणि खून या जगाशी जवळचा संबंध येतो. सरतेशेवटी हे चौघेजण एका वेश्येशी करार करतात. वेश्या आपलं गिऱ्हाईक 'पटवून' खोलीत आणते आणि आयत्या वेळी हे चौघे त्या गिऱ्हाइकाला लुटतात ! यातूनच हे चौघे आणि ती वेश्या एकत्र राहू लागतात. या सहवासाचं फलस्वरूप तिचे डीटोबरोबर संबंध जमतात. अर्थात लिलीकाला हे पसंत पडत नाही. कारण त्याचे आणि डीटोचे समलिंगी संबंध असतात. म्हणून तो डीटोचा मत्सर करू लागतो. त्यामुळे लिलीका त्यांना सोडून निघून जातो. एकदा कठीण प्रसगाच्या वेळी

पिक्झोट आणि डीटो एका माणसाचा खून करतात; पण या प्रसंगामुळे ती वेश्या पिक्झोटवर स्वतःच्या मुलाप्रमाणे प्रेम करू लागते; पण पिक्झोटची मानसिक स्थिती इतकी विकृत झालेली असते की, तो तिला फक्त वेश्याच मानत असतो. त्यामुळं ती पिक्झोटला नाकारते आणि घरातून घालवून देते. पिक्झोट एकाकी अवस्थेत तिचं घर सोडून जातो. लहान मुलाच्या मनावर गुन्हेगारी वातावरणाचा कसा परिणाम होतो आणि प्रेम न मिळालेली मुलं कोणत्या टोकाला जाऊ शकतात, याचं भेदक चित्रण या चित्रपटात पहायला मिळतं. यात वेश्येचं काम करणारी अभिनेत्री मात्र अफलातून आहे! चित्रपटात तसं पाहिलं तर 'सेक्स' फारच कमी आहे; पण हावभावांतून व्यक्त केलेला परिणाम जबरदस्त आहे! लहान मुलांकडून इतक्या गंभीर समस्येवरील चित्रपटामध्ये अभिनय करून घेणं, हे खरोखरच जिकिरीचं!

या महोत्सवात चीननेही आपले चित्रपट पाठविले. त्यांपैकी मेलोड्रामाने भरलेला चित्रपट म्हणून 'टू अॅक्ट्रेसेस'चे नाव घेता येईल. क्झाई जीन यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट ११८ मिनिटांचा होता. १९३५ मध्ये आपल्या सासऱ्याच्या जाचाने त्रस्त झालेली बालवधू झू चूनहुआ घरून पळून जाऊन एका छोटया ऑपेरा समूहामध्ये सामील होते. या समूहाबरोबर फिरत असताना तिला अपार कष्ट करावे लागतात आणि यातच तिची संगीतकार किंसगच्या मुलीशी जवळीक होते. त्या दोघी एकमेकीला बहिणी समजू लागतात. ऑपेरा समूहाचा प्रमुख यूहेहोंग झूवार जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करतो; परंतु किंसग त्याला विरोध करतो पुढे किंसग वृद्धापकाळाने मरतो तेव्हा झू आाण किंसगची मुलगी सुहांग या दोघीना शांघायच्या एका थिएटर कंपनीला विकण्यात येते. युहाग ही थिएटर-मॅनेजर टाँगच्या कृष्ण-कारवायांना बळी पडते आणि झू दुसऱ्या ऑपेरासमूहात सामील होऊन पुढारलेल्या विचारसरणीवर आधारलेले कार्यक्रम सादर करू लागते; पण १९४९ मध्ये झालेल्या स्वातंत्र्य-लढयानंतर सुहांगला ऑपेरात काम करू दिलं जात नाही. एवढंच काय, मॅनेजर टाँग या दोन बहिणींना भेटूही देत नाही; पण अनेक अडचणी येऊनसुद्धा या दोघी शेवटी एकत्र काम करू लागतात. अशा अनेक नाट्यमय घटनांची ही मालिका पहाण्यात फारसा रस वाटत नाही. अशा विषयांवरील एखादे डझनभर चित्रपट आपण हिंदीत पाहिले असण्याची शक्यता आहे. सर्व दृष्टींनी सामान्य, असाच हा चित्रपट म्हणावा लागेल!

## स्त्री आणि सामाजिक न्याय

फिनलंडचा दिग्दर्शक रौनी मोलबर्ग यांचा 'मलिका-ए फिल्म अबाउट टबूज' म्हणजे नग्नतेचा आविष्कार होता. अर्थात यातील समस्या भारतात आढळेल की नाही, याची शंकाच आहे; पण तारुण्यामध्ये नुकतंच पदार्पण केलेली मलीका नावाची मुलगी आणि तिची आई (अॅना) ह्या दोघी एकाच माणसाच्या प्रेमात पडतात. त्याचं नाव दिग्दर्शकाने 'ख्राइस्ट डेव्हिल' असं मुद्दाम ठेवलं असावं. तारुण्यसुलभ भावना आणि लैंगिकतेविषयीची उत्सुकता याबाबतीत मलीकाचं वागणं सयुक्तिक वाटतंही. ती अजून लैंगिकसंबंधाविषयी अजाण आहे. पुरुष हा तिला एकाच वेळी प्रेम करणारा संभोगी आणि पिताही वाटतो. आता हा पुरुष प्रेम करायचं साधन म्हणूनच माहिती आहे. जेव्हा मलीकाला दिवस जातात तेव्हा ख्राइस्ट डेव्हिल निघून जातो. अॅनाला आपला प्रियकर का निघून गेला हे माहीत नसतं, म्हणून ती खचून जाते. मलीका आपल्या तारुण्यसुलभ विश्वाला पारखी होते; पण जिद्दीने जगण्यावरचा तिचा विश्वास कायम असतो. यामुळं तिला 'शुद्ध' करण्याच्या समारंभास ती व्यवस्थित सामना देते. साधारणपणे स्वीकारलेल्या मानवी आदर्शांमध्ये किती फोलपणा आहे, याची जाणीव झाल्यामुळं स्वतःच्या मानसिक सामर्थ्यावर जिवंत राहण्याचा ती निश्चय करते.

ज्या मुलीचा कोणत्याही प्रकारचा गुन्हा नाही तिच्यावर आलेली ही आपत्ती आणि तिच्याशी सामना करताना सामाजिक आदर्श किती वरवरचे असतात हे इथं उत्कृष्टपणे सादर केलेलं आहे. नैतिकता फक्त स्त्रियानीच पाळायची का? पुरुषाच्या स्वच्छंद वागण्याला जर समाज बंधन घालू शकत नाही तर मग स्त्रीचा कोंडमारा कशासाठी? सुरवातीस लैंगिक चित्रपट म्हणून गाजलेला हा चित्रपट खऱ्या अर्थानं यशस्वी चित्रपट म्हणायला हरकत नाही. यातली लैंगिकता ही चित्रपट-धंद्यासाठी नाही, त्याच्यामागं असणारी सामाजिक समस्या बोलकी आहे. यातला सेक्स हा नेहमीच्या वातावरणातील एक भाग आहे, हे लक्षात येतं. एखादी व्यक्ती एखाद्याकडे आकृष्ट का होते, लैंगिक भावना का निर्माण होते याची तर्कांवर आधारित कारणं फार तोकडी आहेत. तो एक 'टबू'-बंधन आहे; पण बंधन आहे म्हणून गुदमरून जाण्याचं कारण नाही. हा विषय ज्या कलात्मक रितीनं हाताळला आहे त्याला तोड नाही. विशेषतः, लिना सुओमु आणि मल्टी तुरुनेन यांच्या भूमिका उत्कृष्ट आहेत. बऱ्याच वेळा सेक्सशी संबंधित चित्रपट दिग्दर्शित करताना संतुलन हातातून जाण्याचीच शक्यता जास्त असते; पण या ठिकाणी लैंगिक समस्येवर तोल सांभाळून चित्रपट दिग्दर्शित केल्याचं जाणवतं. चित्रपटाचे दिग्दर्शक रौनी मोलबेर्ग यांनी शैशवावस्थेतील मुलीच्या भावनिक विकासावर हा चित्रपट असल्याचं सांगितलं. गेल्या वर्षी 'दिल्ली फेस्टिव्हल'मध्ये या दिग्दर्शकाचा तरुण मुलाच्या भावनिक विकासावर आधारित 'प्रीटी गुड फॉर अ ह्यूमन-बिइंग' हा चित्रपट दाखवण्यात आला होता.

हंगेरीचा एक नोंद घेण्यासारखा चित्रपट म्हणजे 'ड्यूटी-फ्री मॅरेज'. जानोस झोमबोल्यी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला. तीन बिनधास्त मैत्रिणींची ही गोष्ट. मारी, अँगी आणि लिली या तिघी सदैव हास्यविनोदानं आपल्या दैनंदिन जीवनाच्या काळज्या विसरून जाण्याचा प्रयत्न करीत असतात; पण एकमेकींची काळजी मात्र त्या बारकाईनं घेत असतात. मारीचा होणारा नवरा स्वीडनमध्ये जाऊन बस्तान बसवतो. मारीसुद्धा त्याच्याबरोबर जाण्यास तयार असते; पण स्वतःचा देश बेकायदेशीररित्या सोडून जाणं तिला आवडत नाही. अन्यथा तिला पाच वर्षं हंगेरीला परत येणं शक्य नसतं. या वेळेस मारीच्या नवऱ्याकडून -डीनीकडून-त्याचा मित्र पेक्का इस्कोटा एक निरोप घेऊन येतो. पेक्काला पाहून अँगी आणि लिली असं कारस्थान रचतात की, पेक्कानं फक्त नावापुरतं मारीशी लग्न

करावं,' म्हणजे त्याच्याबरोबर तिला स्वीडनला जाता येईल. पेक्का तयार होतो. त्याच्याबरोबर ह्या दोघीही स्कँडेनेव्हियाला भेट देण्याचं ठरवतात. अर्थात मारीचा विवाह फिनलंडमध्ये होणार आहे, हे पेक्काकडून त्यांना कळतं आणि मग फिनलंडमधून बॉर्डर ओलांडून स्वीडनमध्ये डीनी जिथं काम करतो तिथं मारीकडे जाता येईल, अशी त्यांची कल्पना असते. पेक्का या तीन मैत्रिणींची मैत्री लक्षात घेऊन त्यांना मदत करायला तयार होतो आणि मारीला लग्नासाठी फिनलंडला आणतो. इकडे डीनीला पण फिनलंडला यायला सांगितलेलं असतं. सुरवातीस सर्व ठरल्याप्रमाणे जमतं. पेक्का फक्त 'अॅग्रीमेंट'चा नवरा असल्याने बाकीच्या गोष्टींना त्याला बंदी असते; पण खरी गडबड होते ती डीनीला फिनलंडला वेळेवर येणं जमत नाही तेव्हा. मग मारीची पंचाईत आणि त्यातच कहर म्हणजे इतका वेळ पेक्काचं हृदय त्याच्या स्वत च्या ताब्यात होतं; पण मारीसारख्या सुंदरीच्या सहवासानं त्याचं तिच्यावर प्रेम बसतं. आणखी दुसरी अडचण म्हणजे, पेक्काला हे लग्न अतिशय गुप्त पद्धतीनं करायचं असतं; पण हे त्याच्याकडच्या लोकाना कळतं आणि पेक्काच्या लग्नासाठी मोठी मेजवानी द्यायचं ते ठरवितात. एकंदरीत पेक्काच्या नशिबी काहीही नसतं; पण सर्व तयारी मात्र जोरात चालू असते. इकडे मारीचे नववधू म्हणून स्वागत केलं जातं. गावजेवणाची तयारी होते. नववधूचा लग्नविधी समारंभपूर्वक केला जातो. हा लग्नविधी मारीला पसंत नसतो. आता मारीपुढे प्रश्न असतो की,पेक्काच्या बाबतीत त्रयस्थ राहता येईल का? पण तिला कळतं की, आपलं हृदय पेक्कासाठी धडकत आहे. चिडलेला पेक्का विवाहवेदीवरून बाहेर निघून जातो. लोकांचा जल्लोष चालू असतोच. सरतेशेवटी मारी पेक्काशीच लग्न करायचं ठरवते.

शंभर मिनिटांच्या या चित्रपटात हलकाफुलका विनोद कथानक पुढं सरकवत राहतो. पेक्काची सुरवातीची मदत करण्याची वृत्ती आणि नंतरचा प्रेमिक, मारीची प्रथम पेक्काकडे बघायची दृष्टी म्हणजे प्रियकराच्या भेटीसाठी टाकलेला गळ, नंतर विवाहाची तयारी म्हणजे गंमत; पण शेवटी मात्र पेक्कावरील प्रेमाचा साक्षात्कार या घटना मजा आणतात. अॅगी आणि लिली सतत बिनधास्त मैत्रिणी दाखविल्या आहेत. विवाहाचा पोषाख मारीला चढवला जातो तेव्हा पेक्काच्या नातेवाइकाचे हावभाव आणि मारीला अडचण होते म्हणून तो पोषाख ती काढून टाकते. या सर्व दृश्यातून मस्त करमणूक होते. यात वापरलेले ट्रॅकिंग शॉट्स आणि लोकेशनवरचं चित्रीकरण वाखाणण्याजोगं आहे, असा विषय इतक्या सहजतेनं हाताळला, हेही कौतुकास्पदच!

## जपानची तंत्रकुशलता

फेस्टीव्हलमध्ये जपानी चित्रपटांचं अस्तित्व फक्त भव्यता आणि तंत्रकुशलतेमध्येच जाणवतं. केई कुमाई दिग्दर्शित 'बुद्धिस्ट फॉम चायना' हा चित्रपट त्याची ग्वाही देणारा. 'तुग' मापनानुसार ७३३ मधे ५८० लोकांना घेऊन चार जहाजं चीनहून निघतात. आतापर्यंतच्या आठ प्रवास-यात्रांपैकी फक्त एकच यशस्वी झालेली असते. आठ दिवसांनंतर जहाज लोयांग इथे पोचतं. जहाजावरचे चार धर्मोपदेशक एका चांगल्या धर्मोपदेशकाच्या शोधात असतात. जपानमध्ये बौद्धधर्माचा प्रसार करण्याचं काम त्याला द्यायचं असतं; पण अडचण म्हणजे खडतर प्रवास! चिन चेन हा तिथं पोचेपर्यंत आंधळा झालेला असतो!

## 'इन डिफेन्स ऑफ पीपल'
## इराणची समस्या

इराणी दिग्दर्शक रफीग पोया यांचा 'इन डिफेन्स ऑफ पीपल' हा मात्र चित्रपट–माध्यमाला एक वेगळी कलाटणी देणारा चित्रपट वाटला. इथं इराणच्या राजक्रांतीच्या घटनांचं आर्थिक, सामाजिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातून विश्लेषण केलेलं आहे. संपूर्ण चित्रपटात आपल्याला प्रसिद्ध कवि खोसरो गोलेसोरकी आणि केरमट डॅनीशाह्न यांच्या कोर्टातील खटल्याचे संवाद ऐकायला मिळतात आणि जोडीला शहाचा सैनिकी न्यायाधीश आणि सत्तेमार्फत केलेली कत्तल पहायला मिळते. चित्रपटाची सुरवात प्रसिद्ध कवी खोसरो गोलेसोरकी आणि चित्रपटनिर्माता केरमेट डॅनीहरून याच्या मृत्यूपासून होते आणि शापूर बख्तियारचं राज्य ११ जानेवारी १९७९ मध्ये संपुष्टात येऊन यु. एस. एम्बसीचं राज्य सुरू होतं. यू. एस. एम्बसीमधील स्फोटक मुलाखत आणि यु. एस. रेस्क्यू मिशन यावरील दृश्यं चित्रपट संपवतात. फेस्टिव्हलच्या सर्व चित्रपटांमध्ये हा चित्रपट विचार करायला लावणारा आहे. वार्तापटाचं कौशल्य वापरून सत्यस्थिती आकर्षकपणे समोर मांडण्याचा पोयाचा प्रयत्न आहे. यात कोणतीही घटना चित्रपटासाठी रचलेली आढळत नाही. अशा प्रकारच्या चित्रपटाला 'सामुदायिक चित्रपट' संबोधणे योग्य ठरेल. कारण वेळोवेळी झालेल्या घटना निरनिराळ्या चित्रपटनिर्मात्यांच्या सहकार्याने एकत्रित करणे म्हणजे जणू इतिहास सलग समोर उभा करण्याची अवघड कामगिरीच आहे. अर्थात यासाठी त्याला बऱ्याच निर्मात्यांची मदत झाली. हा चित्रपट अजून इराणमध्ये प्रदर्शित झाला नाही. इराणी लोकांचं प्रतिबिंब या चित्रपटातून साकार होत, असं समजायला हरकत नाही.

## अवास्तव 'स्ट्रॅंगलिंग'

जपानी चित्रपटांपैकी कानेटो शींदो याचा 'स्ट्रॅंगलिंग' हा चित्रपटपण बराच गाजला. वडील आपल्या मुलाचा गळा घोटून मृत्यु घडवून आणतात आणि आई या खुनामागचं कारण काय असावं हे शोधून काढण्याचा प्रयत्न करते. हा चित्रपटाचा कथाविषय असा–मुलासाठी नवीन धंदा उघडून देण्याचा वडिलांचा विचार असतो. मुलगा एका मुलीच्या प्रेमात पडलेला असतो. त्या मुलीचे तिच्या सावत्र पित्याबरोबर अनैतिक संबंध असतात आणि त्याचा खून करण्यासाठी ती या मुलाची मदत घेते. या घटनेमुळे मुलाच्या मनावर परिणाम होतो. मानसोपचाराचा उपयोग होत नाही म्हणून वडील शेवटी त्याचा खून करतात. त्याच्या आईच्या असं लक्षात येतं की, तिला मुलाशिवाय जगण्याचं कोणतंच साधन नाही आणि म्हणून मुलाला भेटण्यासाठी ती गळफास लावून आत्महत्या करते! चित्रपट पूर्णपणे निराश करणाराच आहे. यात होणाऱ्या घटना अवास्तव, काल्पनिक वाटतात. फक्त मुलाची विकृत अवस्था अभिनयातून उत्तमपणे साकार केली गेली आहे.

रस्त्यावर गाणाऱ्या पाच गायकांवर

आधारित मोरावकोचा चित्रपट 'ट्रान्सेस' हा लक्षात राहतो, तो त्यातल्या लोकसंगीतामुळे आणि त्याला लोकप्रिय करणाऱ्या गायकांमुळे. अहमद इल मनोऊनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट म्हणजे संगीत मेजवानीच! यातले गायक साध्यासुध्या वाद्यांतून जीवनाची सर्व अंगं दाखवितात.

न्यूझीलंडच्या मायकेल ब्लॅक यांनी दिग्दर्शित केलेला 'पिलपर्स' हा चित्रपट पूर्णपणे मानववंशशास्त्राशी निगडित होता. वॉल्टरने काही कैद्याची उत्कृष्ट चित्रं घेतलेली असतात. घनदाट अरण्यात कैद्यांना दिल्या जाणाऱ्या हालांचं चित्रण इतरांना दाखविण्यास बंदी केली जाते; पण 'माओरी' जमातीवर कॉलनीतील सोल्जर्सनी केलेल्या अत्याचारापेक्षा त्याच्या सौंदर्याची चित्रं जास्त पुढं येऊ लागतात; पण वॉल्टरची आदिवासी जमातीतील भन्नाट भटकंती आणि त्यांचं खरंखुरं जीवन वॉल्टरनं चित्रित केलेलं असतं. शेवटी वॉल्टर आपलं काम लोकासमोर आणण्यात यशस्वी होतो.

## कथा अंत्यविधीच्या खर्चाची!

स्वित्झर्लंडच्या पाच चित्रपटांपैकी झेव्हियर कोलेर दिग्दर्शित 'फ्रोझन हार्ट' हाही एक सुंदर चित्रपट होता. दोन खेड्यांमध्ये जंगल पसरलेलं असतं. त्यात छत्र्या दुरुस्त करणारा म्हातारा, त्याला त्याचा टोपली विणणारा मित्र भेटतो; पण अतिशय कडाक्याच्या थंडीमुळं तो गोठून मरतो. टोपली विणकर म्हातारा आपल्या मित्राच्या मृत्यूची बातमी व्होरडेक्ष या खेड्यातील पोलिसास देतो; पण मृत माणसाजवळ काहीच नसल्यानं त्याच्या अंत्यविधीचा खर्च आपल्या गावाला होऊ नये म्हणून त्याचं प्रेत रात्रीतून दुसऱ्या गावाच्या हद्दीत टाकलं जातं. अशा रीतीनं दोन रात्रीत प्रेताची हलवाहलव या दोन्ही गावांतून एकमेकांकडे होते. कफल्लक प्रेतासाठी अंत्यविधीचा खर्च कोण करणार, हा इथे महत्त्वाचा मुद्दा!

याच गोष्टीचा फायदा घ्यावा असा विचार चलाख टोपली-विणकर करतो आणि शेवटी छत्री दुरुस्त करणाऱ्या म्हाताऱ्याचा विधिपूर्वक थाटामाटाने अंत्यविधी हीनतेरूच्या गावकऱ्याकडून घडवून आणतो. या दरम्यान टोपली–विणकर, छत्री दुरुस्त करणाऱ्या म्हाताऱ्याच्या प्रेयसीशी भेटतो आणि सर्व परिस्थिती लक्षात आल्यावर टोपली–विणणाऱ्या म्हाताऱ्यास स्त्रीचं प्रेम लागतं. या चित्रपटात सुरवातीस छत्री दुरुस्त करणारा म्हातारा आपल्या प्रेयसीचं वर्णन करतो, तर टोपली–विणकर स्त्रियांपासून दोन हात दूर राहण्याचा सल्ला देतो. या म्हाताऱ्याचा अभिनय अप्रतिम झाला आहे. विशेषतः मृत म्हाताऱ्यास सन्मान मिळावा यासाठी त्यानं योजलेली क्लृप्ती एकदम फर्मास! मेलेल्याच्या खिशात पाकीट ठेवायचं, त्यात त्याच्या सर्व इस्टेटीची माहिती द्यायची आणि माझं दफन जो अमाप पैसा खर्च करून करेल त्याला त्याची सर्व संपत्ती मिळेल, अशी अफवा पसरवून पाकिटात कोरा कागद ठेवून पाकिट सील करतो. मग मृताचा पैसा आपणास मिळेल या आशेनं त्याच्या प्रेताचा जो अलिशान अंत्यविधी होतो, ते पाहण्यात मजा आहे. माझ्या कफल्लक मित्राच्या प्रेताला तरी सन्मान मिळावा, या छोट्या विषयावरील शंभर मिनिटांचा हा चित्रपट धमाल आणतो!

ख्रिस्तोफर माइल्सनं दिग्दर्शित केलेला डी. एच्. लॉरेन्स यांच्या जीवनातल्या अखेरच्या काही काळावरचा 'प्रीस्ट ऑफ लव्ह' हा चित्रपट शेवटपर्यंत खुर्चीत खिळवून ठेवायला समर्थ आहे. त्यातून डी. एच. लॉरेन्सच्या जीवनावरचा चित्रपट पाहणे हा एक आनंद मिळतो तो वेगळाच! हा चित्रपट तसा व्यक्तिनिष्ठ असला तरी त्याच्या जीवनातलं नाट्य इथे पहायला मिळतं. गे हॅमिल्टन दिग्दर्शित 'दि मिस्टर क्रूकड्' म्हणजे अॅगाथा ख्रिस्तीच्या क्राइम थ्रिलर कादंबरीचं चित्र-रूपांतर. यात एलिझाबेथ टेलर, टोनी करटीस, रॉक हडसन इत्यादी प्रसिद्ध कलाकारांचं दर्शन आपल्याला होतं.

## दोन अमेरिकन प्रतिबिंबं

'हॉकी टॉक फ्री वे' हा यू. एस. ए. च्या जॉन स्पेलिनसिगरनं दिग्दर्शित केलेला असाच एक चित्रपट. नवीन बांधल्या जाणाऱ्या हायवेमुळं एका खेड्याचा आर्थिक समतोल ढासळण्याची शक्यता असते; पण खेडूत तो पूल उडवितात आणि वाहतूक खेड्यातून चालू ठेवतात. वाहतूक नवीन हायवेवरून पुन्हा चालू करण्यासाठी मेयरतर्फे केलेले प्रयत्न आणि मधल्या वेळेत पहायला मिळणारे माणसांचे अनेक नमुने यामुळे हा चित्रपट मनोरंजक झाला आहे. यातील छायाचित्रण आणि ट्रिक फोटोग्राफी डोळ्यांचं पारणं फेडते. निरनिराळ्या व्यक्तिरेखा अतिशय फिट्ट बसतात. कोणतेही पात्र सलग एक मिनिटापेक्षा जास्त वेळ पडद्यावर कधीच दिसत नाही. असं असतानासुद्धा चित्रपट केव्हा संपला हे लक्षात येत नाही.

यू. एस. एस. आर. चा 'मेन विदाउट वुमेन' हा चित्रपट लक्षात राहतो तो त्याच्या भव्य चित्रीकरणामुळं. विडचूगिटीस याने दिग्दर्शित केलेला हा चित्रपट. पर्वतावर असणाऱ्या हाय व्होल्टेज वायर्स तुटून पडतात आणि सर्व दरीत वीज जाऊन अंधार होतो. त्या वायर्स जोडण्यासाठी तिघांची टोळी निघते आणि ते काम पूर्ण करताना त्यांना आलेल्या अडचणी आणि त्यावरील मात यांचे प्रत्यक्ष चित्रीकरण चकित करून टाकणारे आहे. हे सर्व करत असताना त्यांच्या आवडत्या व्यक्तीच्या आठवणीच त्याना अवघड काम करायला स्फूर्ती देतात. हा चित्रपट आवर्जून पाहण्यासारखा आहे.

## फिल्म इन्स्टिटयूटची हजेरी

या वेळी भारतीय चित्रपटविभागात २१ चित्रपट दाखविण्यात आले. फिल्म इन्स्टिटयूटच्या अशोक आहुजाने दिग्दर्शित केलेला 'आधारशिला' चित्रपट बऱ्याच प्रमाणात आशा व्यक्त करून गेला. १५४ मिनिटांचा हा हिंदी चित्रपट एका तरुण चित्रपट-दिग्दर्शकाच्या जीवनावर आहे. अजय आपल्या चित्रपट–व्यवसायाची नुकतीच सुरवात करत आहे आणि चित्रपट-दिग्दर्शक म्हणून त्याचे शिक्षण पूर्ण झाले आहे. तो आपल्या आशा या नूतन पत्नीला फिल्म इन्स्टिटयूट दाखवायला आणतो आणि स्टुडिओ पहात असताना प्रभातची कहाणी सांगत शेवटी त्याची फिल्म अँड टी. व्ही. इन्स्टिटयूट कशी झाली हे सांगतो. या ठिकाणी अनेक तरुणांनी स्वप्ने पाहिली; पण फारच थोड्याजणांची स्वप्नपूर्ती झाली. इतर कालाच्या ओघात विस्मृत झाले.

सुदैवानं अजय आणि आशा यांना स्वतःचं घर आहे. त्या घराच्या भिंती रंगविणं, घराची स्वच्छता करणं, शिवाय वात्सल्य आणि प्रेम यामुळं त्यांना दुःखी होण्याचं तसं कारण नाही. आशा शाळेत शिक्षिका आहे. अजयला नोकरी मिळाली आहे. नवीन मित्रमंडळी आहेत. वरवर पाहता अजय सुखी आहे; पण स्वतःची कला आपल्या कामातून समोर मांडता येत नाही, याचं दुःख मनाला बोचतंच. एका वेगळ्या मानसिक पातळीवर हा चित्रपट मनाला विरंगुळा देऊन जाणारा आहे. गतीनं थोडासा संथ असला तरी चित्रपट सावरला तो नसिरुद्दीन शहानंच! अनिता

कंवरचा अभिनय अजून फुलायला हवा होता. सदैव आपल्या मनाजोगते काम करायला मिळत नाही या आंतरिक वेदनेनं अस्वस्थ झालेला अजय नसिरुद्दीननं मस्त वठविला आहे. देवकीनंदन पांडे, मधुमालती यांनी तसा फारसा वाव नाही; पण या चित्रपटानं अशोक अहुजाला चित्रपट माध्यमाची उत्कृष्ट समज आहे, हे लक्षात येतं.

## बंगाली चित्रपटांचा ठसा

बंगाली चित्रपट 'आज कल पारशूर गाबा' हा लक्षात राहतो तो त्याच्या विषयामुळे. नबेंदू चटर्जी दिग्दर्शित हा चित्रपट बंगालमधील गोलपारा या खेड्याभोवती १९३९ च्या आसपास रेंगाळत राहतो. १९३९ च्या वेळच्या युद्धाचे परिणाम काही प्रमाणात जाणवतात. घनश्यामदास यांच्या जमिनीवर मजुरी करणारा रामपदा गरीब असूनसुद्धा भवितव्याविषयी आशा बाळगून आहे; पण १९४३ च्या दुष्काळाने गावे ओसाड पडू लागली आणि गोलपाराची पुरुषमंडळी जगण्याची धडपड करू लागली. स्त्रिया घरी राहू लागल्या. घनश्याम आपल्या वर्तनाने स्त्रियांत नकोसा झालेला होता. अशातच शाळेतील शिक्षकाची मुलगी दुर्गा हिच्याशी असभ्य वर्तन करायचा तो प्रयत्न करतो; पण यशस्वी होत नाही. म्हणून तिच्यावर खोटा आळ आणून तिची चौकशी करायचा घाट तो घालतो. या धक्क्याने दुर्गेचे वडील मरतात आणि नाइलाजाने दुर्गा आपल्या आईसह गाव सोडून जाऊ लागते. इकडे रामपदा बाहेर गेलेला असताना रामपादांची भुकेलेली बायको आपल्या मुलाच्या आजारपणासाठी मदत मागायला म्हणून घनश्यामदासकडे जाते आणि त्याच्या कचाट्यात सापडते रामपादा परत आल्यावर आपल्या पत्नीला हुडकून काढतो, तेव्हा ती पूर्णपणे भग्न मनोवस्थेत आढळते

चित्रपटाचे कथानक तसे परिणामकारक नाही; पण यातला दिग्दर्शनाचा भाग कौशल्यपूर्ण वाटतो. अशा प्रकारच्या विषयावर बरेचसे चित्रपट पाहण्यात आले; पण यात दाखविलेली पात्राची निवड, त्यांचे हावभाव प्रसंगानुरूप वाटले. शिवाय चित्रपट कृष्णधवल असल्याने सत्यघटनेवर आधारित असल्याचा भास होतो.

बंगाली चित्रपटात 'अदालत ओ एकटी मेये' उत्कृष्ट वाटला. तपन सिन्हाने दिग्दर्शित केलेला हा चित्रपट कायदा आणि स्त्री यांच्याविषयी बरेच सांगून जातो. उर्मिला नावाच्या शिक्षिकेवर समुद्रकिनारी एका गटाकडून सामूहिक बलात्कार होतो. कार्यक्षम पोलीस अधिकारी ज्यांनी बलात्कार केला त्यांना पकडतो; पण हे सर्वजण श्रीमंतांची मुले असतात. कोर्टात केस होऊन गुन्हेगारांची कारागृहात रवानगी होते; पण उर्मिला यामुळे दुःखी होते. कारण तिच्या मैत्रिणी, तिचा वाग्दत्त वर सर्वजणच तिच्याशी संबंध तोडून टाकतात. याशिवाय वर्तमानपत्रांनी दिलेली भडक प्रसिद्धी तिच्या नोकरीवर गदा आणायला कारणीभूत होते. तिचे वडील जरी मनातून घाबरलेले असले तरी शाळेच्या कार्यकारिणी समितीविरुद्ध केस करण्याची ते धमकी देतात. इकडे गुन्हेगार हायकोर्टाकडे अपील करतात आणि त्यांच्यातील एकाचे वडील खोटा आळ आणून पोलीस अधिकाऱ्यास निलंबित करायला लावतात यामुळे उर्मिला शाळा सोडून जाणार असते; पण मुले तिला जाऊ देत नाहीत. या चित्रपटाविषयी बोलताना तनुजा म्हणाली की, तपनने या समस्येला प्रामाणिकपणे व्यवस्थित न्याय दिलेला आहे, आणि म्हणूनच मी ही भूमिका करायला तयार झाले. या चित्रपटात दोन वैशिष्ट्ये दिसून आली. एक म्हणजे, दिग्दर्शकाने कोठेही अवास्तव चित्रीकरण केलेले नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे तनुजाचा अभिनय -विशेषतः, कोर्टातील दृश्याच्या वेळीचा तिचा चेहरा अतिशय बोलका वाटला. बऱ्याच वेळेस तिचे डोळे अभिनय करून जातात. या प्रकारची सामाजिक समस्या समतोलपणे पडद्यावर मांडली याबद्दल दिग्दर्शक तपन सिन्हांचं अभिनंदन करायला हवं.

कलकत्त्याच्या पार्श्वभूमीवर तयार केलेला व्हिक्टर बॅनर्जी याचा 'ऑगस्ट रेक्वियम' एक स्मरणीय चित्रपट. कलकत्त्यातील उच्चभ्रू लोकांविषयीची ही गोष्ट. एका फर्मचा पार्टनर प्रताप दत्त एक निष्ठुर असा माणूस. फक्त आपल्या धंद्यातच लक्ष देणारा. पत्नीकडे लक्ष द्यायला अजिबात वेळ नाही असा आहे त्याला रेस आणि ऑफिसमधील सेक्रेटरीशी लफडी करण्याचाच छंद आहे. त्याच्या ऑफिसमधील राचेल नावाच्या मुलीचे अपघाती निधन होते. प्रतापचे तिच्याबरोबर संबंध असतात म्हणून तो तिच्या नवऱ्याला आपल्या फर्ममध्ये नोकरी देतो. कालांतराने प्रतापची पत्नी रीना आणि राचेलचा पती डंकन यांचे एकमेकांशी सूत्र जमते; पण राचेलवरील प्रेमामुळे डंकनला रीनाशी संबंध ठेवणे प्रशस्त वाटत नाही. त्याला मग राचेल आणि प्रताप यांच्या संबंधाचे गुपित कळते आणि पूर्णपणे कोलमडलेला डंकन रीनाला नकार देऊन परत जातो. रीना परत प्रतापकडे येते; पण तिला सुख शेवटपर्यंत मिळतच नाही. या चित्रपटाचे एका वाक्यात व्हिक्टरने वर्णन केले ते 'वैफल्यावस्थेतील प्रयोग!' एक तनुजाचा अभिनय सोडला तर या चित्रपटात फारसा दम नाही.

## ग्रामीण भागातील राजकारण

एम. एस. सथ्यू दिग्दर्शित 'बारा' हा चित्रपट बराच उजवा वाटला. खेड्यातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर हा चित्रपट आहे. कर्नाटकातील बीदर हा एक दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. डेप्युटी कलेक्टर सतीशचंद्र लोकांना मदत करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत आहे; पण जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय मतभिन्नतेमुळे त्याचे सर्व प्रयत्न वाया जातात. राज्यपातळीवर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री रुद्रप्पा यांच्यात बीदार हा जिल्हा कोणाच्या दबावाखाली येईल याविषयी राजकीय डावपेच चालू आहेत. हे लोण बीदारमध्ये पोचते. रुद्राप्पाला सुपरिंटेंडेंट पोलीस श्री. नागराजन आणि धान्य सहकारी सोसायटीचे अध्यक्ष श्री. गंगाधरस्वामी यांचा पाठिंबा आहे, तर मुख्यमंत्र्याला स्थानिक राजकीय कार्यकर्ता भीमोजीचा पाठिंबा आहे. भालोजी गंगाधरच्या प्रत्येक चालीस योग्य उत्तर देण्यास समर्थ आहे. डे. कलेक्टर चंद्राला मदत करायला त्याची पत्नी रेखा तयार होते. पिण्याचे पाणी हुडकण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न जेव्हा वाया जातात तेव्हा चंद्रा अर्धवट वेडा समजल्या जाणाऱ्या पाणी शोधणाऱ्या स्थानिक गावकऱ्याची मदत घेण्याचे ठरवितो आणि त्याच्या मदतीने पाणी हुडकून काढतो; पण एव्हाना भीमोजी गंगाधरच्या जमिनीचा ताबा घेण्याचा कट रचतो आणि धान्यपुरवठा बंद करतो. या सर्व गोष्टींमुळे जातीय दंगल सुरू होते. म्हणून एस. पी. गोळीबार करायचा आदेश देतात. या सर्व घटनांमुळे रुद्राप्पाला राजीनामा द्यावा लागतो. रुद्राप्पाचा राजीनामा मंजूर होताक्षणीच मुख्यमंत्री बिदारला धान्यपुरवठा करतात. या चित्रपटात ग्रामीण भागातील राजकारण कसे चालते याची खरी झलक पहायला मिळते. यातील अनंत नाग, निनिन सेठी, वीराज ब्यादको यांनी सुरेख अभिनय केला आहे. चित्रपट पूर्णपणे बीदारमध्येच चित्रित केला असल्याने कथानकाची विश्वासार्हता वाढलेली आहे. छायाचित्रण उत्कृष्ट आहे.

अरविंद श्यामशर्मा दिग्दर्शित 'इमाणी नीजेयेम' हा मणिपुरी चित्रपट. खेड्यात जाऊन शिक्षकी पेशा चालू ठेवायचा या उद्देशाने धानी खेड्यात येते. तेथे सहा वर्षांच्या योइयोइ नावाच्या मुलाची भेट होते. हा मुलगा आपल्या आजोबाजवळ राहत असतो. योइयोइचे आजोबा इन्स्पेक्शन बंगल्याचे चौकीदार म्हणून काम करतात. त्यांची मुलगी मेमतोंबी. तिच्यावर दीनचंद्र नावाच्या अधिकाऱ्याने बलात्कार केलेला असतो आणि तिचा मुलगा म्हणजेच हा योइयोइ. पुढे धानीला कळते की, दीनचंद्र म्हणजे तिची चुलती एकशीनीचा पती. एकशीनीला आपल्या पतीचे कारस्थान कळल्यानंतर ती

थोइथोइचा मुलगा म्हणून स्वीकार करते दीनचंद्रास आपली चूक कळून येते. 'अनाथ मूल' खरे अनाथ केव्हा होते, सनाथ कधी होते याचे विश्लेषण या चित्रपटात उत्कृष्ट केलेले दिसते. एकशीनी जेव्हा थोइ-थोइला भेटते आणि तो जेव्हा तिला 'आई' म्हणतो तेव्हाचे तिचे उद्‌गार अर्थपूर्ण वाटतात. 'मला मूल बिलगते आणि आई म्हणून हाक मारते तेव्हा काय मी त्याला दूर करू? तुम्ही ते करू शकाल. कारण तुम्ही मोठे लोक ना, मला ते शक्य नाही! मुलानी तुमचं काय घोडं मारलं आहे?' लायकेनद्रो या बाल-कलाकाराने अतिशय उत्तम अभिनय केला आहे. ६ वर्षांच्या मुलाकडून असा अभिनय करवून घेणे यातच दिग्दर्शकाचे कौशल्य दिसून येते.

के. एस सेतुमाधवन दिग्दर्शित मल्याळी चित्रपट 'ओपल' म्हणजे अप्पू नावाच्या सहा वर्षाचे मुलाची गोष्ट. अप्पू हा मुलगा मालूलाच मोठी बहीण म्हणून ओळखतो, पण अप्पू हा तिचाच मुलगा आहे. रोज त्याचे शाळेतून आल्यावर स्वागत करणारी मालू एक दिवस दिसत नाही, म्हणून तो तिला शोधत शोधत देवळात येतो. तिथे मालूचा गोविंद-नशी विवाहविधी होत असतो. गोविंदन अप्पूला घेऊन आपल्या गावी येतो. पण त्याला गोविंदनचा बडेजाव मनापासून आवडत नाही म्हणून तो त्याला उलट बोलतो; तेव्हा मालू अप्पूला रागवते. अप्पू घरातून पळून जातो. आणि आदिवासी मित्र नंबी बरोबर राहू लागतो. शेवटी मालू गोविंदनला सोडून अप्पू बरोबर रहायचे ठरविते.

या चित्रपटाला १९८० मध्ये उत्कृष्ट चित्रपटाचे दुसरे बक्षीस मिळाले. याचा कथाविषय अतिशय स्पष्टपणे मांडला आहे. स्त्रीचे स्वतःच्या अनैतिक अपत्याविषयी प्रेम दाखविणारा चित्रपट म्हणून त्याचे कौतुक केले गेले. अशा प्रकारच्या सामाजिक समस्याची कौशल्यपूर्ण हाताळणी या चित्रपटात दिसून येते. मूल आणि आई यांच्या प्रेमाला एक नवीन व्यापक अर्थ देण्याचा प्रयत्न म्हणूनही हा चित्रपट बघायला हवा.

सत्यजित रे च्या 'पिकू' आणि 'सद्‌गति' या दोन छोट्या चित्रपटांनी बहार आणली. उच्चभ्रू समाजातील ६ वर्षांचा पिकू आपल्या भोवतालच्या मोठ्यांच्या वातावरणाबद्दल पूर्णपणे अनभिज्ञ आहे. आई-वडील विभक्त होण्याच्या स्थितीला आलले आहेत. वडलांना सापत्तिक दुर्दशा भेडसावते आहे. आईचे दुसऱ्याच एकावर प्रेम आहे, आजोबा नुकतेच हृदयाचा एक झटका येऊन आजारी आहेत. दुसऱ्या झटक्यात त्याची काही शाश्वती नाही, पण ते पिकूचे मात्र खरे दोस्त आहेत.या २७ मिनिटांच्या लघुपटात आपल्याला लवकरच दुःखाला तोंड द्यावे लागणार आहे याची पुसटशी जाणीवही पिकूला नाही, हे दिसून येते. विशेषतः आजोबा आणि पिकू या व्यक्तिरेखा अतिशय समर्थपणे साकार केलेल्या आढळून आल्या.

रेचा दुसरा लघुपट म्हणजे 'सद्‌गती'. हा मुन्शी प्रेमचंद यांच्या कथानकावर आधारित हिंदी भाषेत आहे. अस्पृश्य दुखी घाशीराम ब्राह्मणाकडे आपल्या मुलीच्या लग्नाचा मुहूर्त काढण्यासाठी येतो. ब्राह्मण त्याला भरपूर काम करायला लावतो आणि आपण व्यवस्थित जेवतो व विश्रांती घेतो. नुकताच आजारातून उठलेला दुखी अपार कष्टांमुळे मरण पावतो. पोलीस पचनामा होईल ह्या भीतीने त्याच्या प्रेताला, कोणी हात लावण्यास तयार होत नाही. प्रेताच्या समोरच पिण्याच्या पाण्याची विहीर असते. शेवटी काहीच मार्ग न मिळाल्याने ब्राह्मण स्वतः प्रेताच्या घोट्याला दोर बांधून प्रेत दूर नेऊन टाकतो आणि तिथली जागा तीर्थ टाकून पवित्र करून घेतो. यात ओमपुरी आणि स्मिता पाटील यांनी अप्रतिम अभिनय केला आहे. प्रत्येक दृश्य विचारपूर्वक चित्रित केलेले आहे. प्रकाशयोजना आणि अभिनय याची उत्तम सांगड दिग्दर्शकानी घातली आहे.

के. बालचंद्र दिग्दर्शित 'थानीर थानीर' हा एक उत्कृष्ट राजकीय चित्रपट म्हणता येईल. हा तामीळ चित्रपट खेड्यातील पिण्याच्या पाण्याविषयी आहे. अथपिट्टाई म्हणजे तामिळनाडू प्रांतातले छोटे गाव. पाण्याचा जवळचा झरा गावापासून २० मैलावर आहे. अधिकाऱ्याकडे अर्ज वगैरेच्या बाबतीत गावकऱ्यांना पूर्णपणे निराशा मिळालेली आहे. त्यांच्या अर्जांची दखल घेतली जात नाही, म्हणून सर्वजण निवडणुकीमध्ये मतदानावर बहिष्कार टाकतात. वेलायचम्मी नावाचा एक खुनी तुरुंगातून पळून येतो आणि गावात राहायचे ठरवितो. गावकऱ्यांना विनंती करून एक बैलगाडी तयार करवून घेतो आणि २० मैलावरून त्यांना पाणी आणून देण्याचे काम स्वेच्छेने पत्करतो. पाणी देणाऱ्या वेलायचम्मीला तो तुरुंगातून पळून आलेला आहे, हे लक्षात येऊनसुद्धा गावकरी आसरा देतात. मतदानात भाग न घेतल्यामुळे चिडलेले राजकीय पुढारी त्याची बैलगाडी तोडून टाकतात. वेलायचम्मी डोंगर फोडून नदीचा प्रवाह गावाकडे वळविण्याची योजना लोकांपुढे मांडतो, पण सरकारी जमिनीवर अनधिकृत आक्रमण होते, या सबबीखाली अधिकारी ते काम बंद करायला लावतात. शेवटी ही गावच्या पोलिसपाटलांची बायको, पूर्वीप्रमाणे २० मैलाची श्रमंती पाण्यासाठी करू लागते. तिचा पती अलगिरी वेलायचम्मीला पकडण्यासाठी गावी येतो, पण शेवटी पतीचा प्रयत्न हाणून पाडते. अलगिरी पोलिसांची कुमक घेऊन पुन्हा येतो. गावकरी वेलायचम्मीला जंगलात पळून जायला सांगतात अन् तेथे तो पाण्याअभावी मरण पावतो!

सध्याची शासकीय यंत्रणा, शासनातील भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता, कलुषित जाहिरातबाजी यावर सडेतोड वास्तव टीका करणारा चित्रपट म्हणजे 'थानीर थानीर' होय! सध्या चित्रपटप्रदर्शनाच्या धोरणामध्ये अशा प्रकारच्या चित्रपटास परवानगी दिली याचाच अर्थ सेन्सॉर बोर्डातसुद्धा थोडीशी सुधारणा होऊ लागली आहे.

मुझफ्फर अली यानी दिग्दर्शित केलेला हिंदी चित्रपट 'उमराव जान' गाजला आणि रेखाचा अभिनय यासाठी सरस वाटला. यात नसीरुद्दीन शाहला थोडीशीच भूमिका, पण त्याचाही अभिनय लाजवाब आहे! कोठीवर नाच–गाणे यांच्या संगतीत उमरावला आणले जाते. नर्तकीचे नवाब सुलतानवर प्रेम बसते; पण ते अयशस्वी होते. पुढे फैज अली नावाचा डाकू तिला पळवून नेऊन स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न करतो; पण तोही मारला जातो. 'गबन' काढणारा मुझफ्फर अली 'उमराव जान' सारखा लखनवी संस्कृतीशी संबंधित चित्रपट काढू शकतो हे पाहून बरे वाटते. यातल्या गजला म्हणजे अप्रतिम आहेत! 'दिल क्या चीज है जान लीजिए' एकदम मस्त!

## अपर्णा सेनची सलामी

इंडियन पॅनोरमामध्ये स्त्रीदिग्दर्शकाचा एकमेव उत्कृष्ट चित्रपट म्हणजे '३६ चौरंगी लेन!' बंगालची गाजलेली अभिनेत्री कु. अपर्णा सेन, उत्कृष्ट दिग्दर्दशक आहे हे या चित्रपटावरून सहज लक्षात येईल. '३६ चौरंगी लेन' म्हणजे एका वृद्ध शिक्षिकेची गोष्ट. ती आपल्या विद्यार्थ्यांना शेक्सपियर शिकवते. तसं पाहिलं तर शेक्सपियरवर तिचं मनापासून प्रेम आहे! आणि त्यामुळंच तिच्या एरवी नीरस वाटणाऱ्या जीवनाला काही तरी अर्थ आहे. दोन प्रेमी तिच्या घरात येतात आणि तिचा दैनंदिन ठराविक साचाचा दिनक्रम पूर्णपणे बिघडवून टाकतात. नंदिता आणि समरेश यांना एकमेकाला भेटायला जागा मिळते आणि साहजिकच या दोघांचा या वृद्ध शिक्षिकेशी संबंध वाढतो, पण या दोघांचा विवाह होतो त्यामुळ त्यांना आता एकमेकाला भेटण्यासाठी जागा हुडकण्याची गरज नसते. त्यांचे स्वतःचे घर असते. ही वृद्धा मात्र, ते पुन्हा येतील या आशेवर पूर्वीचा दिनक्रम सुरू करते; पण शेवटी त्यांना आपली गरज नाही, हे नाताळच्या दिवशी तिच्या लक्षात येते आणि विमनस्क अवस्थेत मोठ्याने 'किंग लिअर'मधील संवाद म्हणत ती आपली रात्र घालविण्याचा प्रयत्न करते. तिचे संवाद ऐकायला रस्त्यावरच्या कुत्र्याशिवाय कोणताही श्रोता नसतो! □